यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# वार्तापत्र

१२ मार्च २०१६

।। १०३ वी जयंती ।।






## यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१५

पुरस्काराचे मानकरी

## मा. डॉ. विजय केळकर

कुशल अभियंता आणि अर्थतज्ज्ञ. भारतातील अनेक सहकारी संस्थांसह विविध नामांकित संस्थांच्या माध्यमातून भरीव कार्य. आतापर्यंतच्या भरीव योगदानाबद्दल भारत सरकारद्वारा पद्मविभूषण बहाल.




यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक - श्रीमती अरुणिमा सिन्हा यांना प्रदान...

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. नं. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. नं. एम.एम.एच./बी.ओ.एम.-५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी क्रमांक : २२०२८५९६, २२८५२०८१, २२०४५४६० ● फॅक्स : २२८५२०८१/८२


## ● विश्वस्त मंडळ सदस्य ●

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर | |
| ७. | मा. श्री. राम प्रधान | |
| ८. | मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| ९. | मा. श्री. बी. के. अग्रवाल | |
| १०. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील | |
| ११. | मा. श्री. अजित निंबाळकर | |
| १२. | मा. श्री. अमित डहाणूकर | |
| १३. | मा. श्री. डॉ. समीर दलवाई | |
| १४. | मा. श्री. ना. धों. महानोर | |
| १५. | मा. सौ. प्रभा कुलकर्णी | |

### महाराष्ट्र शासन प्रतिनिधी

१६. मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

१७. मा. श्री. एन. जे. जमादार
सचिव व वरिष्ठ विधी सल्लागार

## ● कार्यकारिणी मंडळ सदस्य ●

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरुण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. लक्ष्मण माने
१०. मा. श्री. विनायकराव पाटील
११. मा. श्री. के. बी. आवाडे
१२. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१३. मा. श्री. जीवनराव गोरे
१४. मा. श्री. विजय शिर्के
१५. मा. श्री. जयराज साळगांवकर
१६. मा. श्री. गणपतराव अप्पासाहेब पाटील
१७. मा. श्री. अंकुशराव टोपे
१८. मा. श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पां. पाटील
१९. मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील
२०. मा. श्री. चंद्रशेखर मारुतराव घुले-पाटील
२१. मा. अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिध्द)

### महाराष्ट्र शासन प्रतिनिधी

२२. मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

## ● कार्यकारी समिती ●

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. अजित निंबाळकर | विश्वस्त सदस्य |
| ७. | मा. श्री. जीवनराव गोरे | सदस्य |
| ८. | मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील | सदस्य |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## विभागीय केंद्रे

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कराड | अध्यक्ष | श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पां. पाटील |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| विभागीय केंद्र, रत्नागिरी | अध्यक्ष | श्री. राजाभाऊ लिमये |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. नंदकिशोर कागलीवाल |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | श्री. डॉ. जनार्दन वाघमारे |
| विभागीय केंद्र, अमरावती | अध्यक्ष | |
| विभागीय केंद्र, अहमदनगर | अध्यक्ष | श्री. यशवंतराव गडाख |
| विभागीय केंद्र, सोलापूर | अध्यक्ष | श्री. गो. मा. पवार |
| विभागीय केंद्र, अंबेजोगाई | अध्यक्ष | डॉ. द्वारकानाथ लोहीया |

## विविध विभाग

| | | |
|---|---|---|
| सृजन | संकल्पना व संयोजक | सौ. सुप्रिया सुळे |
| शिक्षण विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | प्रमुख संयोजक | डॉ. वसंत काळपांडे |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| | सहसंयोजक | श्री. विश्वास ठाकूर |
| | संघटक | श्री. निलेश राऊत |
| अपंग हक्क विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |
| वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजक | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजक | श्रीमती ममता कानडे |
| कृषी व सहकार व्यासपीठ | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |
| यशवंतराव चव्हाण सभागृह व कलादालन रंगस्वर | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय | ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी | श्री. अनिल पाझारे |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर श्री. सुशील गुप्तन |

## मुख्य कार्यालय

| | | |
|---|---|---|
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | कार्यक्रम संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | लेखाधिकारी | श्री. महेश चव्हाण |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएटस |
| सांविधिक लेखा परिक्षक | | मे. सी.व्ही.के. असोसिएटस, मुंबई |
| अंतर्गत हिशेब तपासनीस | | मार्क ॲण्ड असोसिएटस् चार्टर्ड अकाउंटंट |

# वेदना अन् संवेदना ...

यशवंतराव चव्हाण साहेबांच्या १०३ व्या जयंतीनिमित्त 'वार्तापत्रा'चा हा अंक आपल्या हाती सोपवताना दुष्काळाच्या कचाट्यात सापडलेला महाराष्ट्र डोळ्यासमोर आहे. संपूर्ण राज्यात, विशेषत: मराठवाड्यात पाण्याची उपलब्धता ही अत्यंत चिंतेची बाब बनली आहे. शहरं आणि गावं सोडून माणसं मुंबई-पुण्याकडे आणि जनावरं चारा छावण्यांकडे निघाली आहेत. अशा वेळी तुलनेने सुस्थितीत असलेल्या भागातील मंडळींनी मदतीचा हात पुढे करण्याची गरज आहे. अनेक संस्था, संघटना आणि व्यक्ती आपापल्या परीने या दुष्काळ-निवारण्याच्या कार्याला हातभार लावत आहेत. प्रतिष्ठाननेदेखील काही सहयोगी संस्थांच्या सहकार्याने आणि अंबाजोगाई केंद्राच्या पुढाकाराने २५ व २६ मार्च २०१६ रोजी एका शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिरात दुष्काळाची नेमकी स्थिती आणि त्याबाबत सुरु असलेल्या उपाययोजना याबाबत तज्ञ व कार्यकर्ते माहिती देतील. पुढील दोन-तीन महिन्यांच्या कालावधीसाठी करावयाच्या कामाचे आवश्यक नियोजन आणि त्याच्या जबाबदाऱ्या याची निश्चिती केली जाईल. औरंगाबाद विभागीय केंद्राचे कार्यकर्ते याविषयीचे नियोजन करीत आहेत.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. शरदराव पवार यांच्या अमृतमहोत्सवानिमित्ताने आयोजिलेल्या चर्चासत्र मालिकेतील उर्वरीत आठ चर्चासत्रांचा अहवालही या अंकात दिला आहे. या एकूण १३ चर्चासत्रांच्या स्वतंत्र पुस्तिकांचे संपादन सुरु असून या चर्चासत्रांतील मांडणीतून एक ग्रंथ प्रकाशित करण्याचाही मानस आहे. त्याचप्रमाणे मा. पवार साहेबांच्या विधीमंडळ आणि संसदेतील भाषणांचेही संपादन करुन हा महत्त्वाचा दस्तऐवज येत्या वर्षभरात जाणकार वाचकांना, अभ्यासकांना उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न आहे. आज मा. यशवंतराव चव्हाण यांच्या 'कृष्णाकांठ' या आत्मकथनाची ध्वनीमुद्रिका (ऑडिओ सीडी) प्रकाशित करत आहोत. दृष्टीहीन बंधु-भगिनींसह सर्वांनाच या सीडीद्वारे आता 'कृष्णाकांठ' ऐकण्याची सोय उपलब्ध झाली आहे.

**आज प्रतिष्ठानचा राष्ट्रीय पुरस्कार ज्येष्ठ अर्थतज्ञ पद्मविभूषण मा. डॉ. विजय केळकर यांना प्रदान करण्यात येत आहे. गेल्या तीन दशकांत देशहिताच्या पारदर्शी,**

**प्रामाणिक जाणीवेने आणि कुशाग्र बुध्दी व दूरदृष्टीने त्यांनी दिलेले भरीव योगदान अतिशय मौलिक स्वरुपाचे आहे. त्यांचा गौरव हा एका नितळ, निगर्वी आणि स्नेहार्द्र व्यक्तीमत्त्वाला, त्यांच्या थोरपणाला दिलेली दाद होय. त्यांचे सन्मानपत्र वाचताना याची पुरेपूर खात्री आपल्याला होईलच.**

प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. पवार साहेबांच्या 'राजहंस प्रकाशना'च्या वतीने प्रसिध्द झालेल्या सामाजिक-राजकीय चरित्राचे (लोक माझे सांगाती) मराठी वाचकांनी उत्तम स्वागत केले असून आता दहावी आवृत्ती प्रकाशित झाली आहे. तर याच आशयाचा इंग्रजीतील 'On My Terms' हा ग्रंथ Speaking Tigers या दिल्लीतील प्रकाशन संस्थेने प्रकाशित केला असून त्याचेही चांगलेच स्वागत देशभरातील वाचकांनी केले आहे.

प्रतिष्ठानच्या क्रियाशील दहा केंद्रांमधून अनेक विषयांवर विविध स्वरुपाचे उपक्रम सुरु असल्याचे आपणांस या कार्यवृत्तांतून वाचावयास मिळेलच. यातील 'शिक्षण कट्टा' हा उपक्रम उत्तम प्रतिसादात सुरू आहे. त्याच धर्तीवर 'शेती कट्टा' असा नवा उपक्रम सुरू करण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यातील यावर्षी औरंगाबाद येथे आयोजिलेले अपंग साहित्य संमेलन, मुंबईतील यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. दरवर्षीप्रमाणेच सामाजिक व क्रीडा क्षेत्रांतील उभरत्या प्रतिमेला युवा पुरस्काराने जालना येथे गौरविण्यात आले. त्यांच्या भाषणांमधून त्यांच्या अभिमानास्पद कामगिरीचा प्रत्यय आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनाच्या (१४ जानेवारी) निमित्ताने यावर्षी सरस्वती भुवन या संस्थेच्या सहयोगाने सामाजिक न्यायाच्या दृष्टीने नव्या दिशेचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्यांस खूपच उत्तम प्रतिसाद लाभला.

यावर्षीपासून प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राच्या वतीने विभागीय पातळीवर उत्तम काम करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना पुरस्कारित करण्यास सुरूवात केली आहे.

या चार महिन्यांच्या कालावधीत प्रतिष्ठानच्या परिवाराशी व विचारांशी निगडीत काही व्यक्तींचे निधन झाले. त्यांच्या स्मृतीस प्रतिष्ठान परिवाराचे विनम्र अभिवादन.

**- मानद संपादक**

# वार्तापत्र

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई. स्व. यशवंतराव चव्हाण यांना १०३ वी जयंती दिनानिमित्त विनम्र अभिवादन.
वर्ष : २० वे ✦ अंक ३७ वा ✦ प्रकाशन : १२ मार्च २०१६

✦
सल्लागार
**मा. शरद काळे**
**मा. हेमंत टकले**
✦
मानद संपादक
**सुप्रिया सुळे**
✦
कार्यकारी संपादक
**दत्ता बाळसराफ**
✦
सहसंपादक
**सुरेश पाटील**
**निलेश पुराडकर**
✦
विशेष सहाय्य
**पद्मभूषण देशपांडे**
✦
सहाय्य
**अनिल पाझारे**
**रमेश मोरे**
**मीनल सावंत**
✦
**केंद्रातील सहकारी :**
संजय बनसोडे, विद्याधर खंडे, संगीता गवारे, स्मिता रायकर, महेश चौधरी, यतीन घोडेकर, राजेंद्र रुपवते, निवृत्ती भोर, संजना पवार, शैलेश चव्हाण, मनिषा खिल्लारे, महेश साळवी, शोभा लोंडे, अनिल चिंदरकर, सुकेशनी मर्चंडे-शेवडे, सुहास बाभल, प्रियंका देसाई, विजय नागरे, जयेश गुजराथी, विश्वदत्त मुळे, सुरेश कोठावळे, महादेव सगरे, सुरेश सावंत, अशोक जाधव, मंगेश शिंदे, सतिश लाड यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार

## अनुक्रमणिका

- शिवछत्रपतींचे पुण्यस्मरण ६
- मा. डॉ. विजय केळकर - मानपत्र ९
- महाराष्ट्र २०२५ : चर्चासत्र मालिका ११

**मध्यवर्ती कार्यालय व विविध विभाग**

- नवमहाराष्ट्र युवा अभियान २२
- अपंग हक्क विकास मंच ३४
- शिक्षण विकास मंच ३७
- सृजन ४०
- वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान ४१
- कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम ४२
- महाराष्ट्र महिला व्यासपीठ ४६
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय ४८
- माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी ५०

**विभागीय केंद्र, कार्यवृत्त**

- कृषी व सहकार व्यासपीठ आणि विभागीय केंद्र, पुणे ५२
- विभागीय केंद्र, रत्नागिरी ५६
- विभागीय केंद्र, औरंगाबाद ६०
- विभागीय केंद्र, नागपूर ६४
- विभागीय केंद्र, कऱ्हाड ६८
- विभागीय केंद्र, नाशिक ६९
- विभागीय केंद्र, लातूर ७०
- प्रतिष्ठानची प्रकाशने ७९

रचना : अनोखी पब्लिकेशन्स, मुंबई, अक्षरजुळणी : मांढरे आर्टस्. हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-कार्यकारी संपादक श्री. दत्ता बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता, मयुर प्रिंटर्स, ५०६/मयुरेश, दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी, मुंबई-३३ येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई ४०० ०२१ येथे प्रकाशित केले. नोंदणी क्र. ७१५८७/९९

# शिवछत्रपतींचे पुण्यस्मरण

– मा. यशवंतराव चव्हाण

महाराष्ट्राच्या इतिहासांत आणि एका अर्थानें भारताच्याहि इतिहासांत आजचा हा दिवस सोन्याचा दिवस म्हणून गणला जाईल. आज प्रजासत्ताक दिन सबंध भारतभर साजरा केला जाईल. परंतु महाराष्ट्र राज्यांतील प्रजासत्ताक दिनाचा आजचा हा सोहळा, महाराष्ट्रांतील जनता छत्रपति शिवाजी महाराजांना प्रणिपात करून साजरा करीत आहे. छत्रपति शिवाजी महाराजांच्या ह्या मूर्तीची पश्चिम सागराच्या प्रवेशद्वारापाशीं स्थापना करून भारतनिष्ठेची आम्ही आज पुन्हा शपथ घेत आहोंत.

छत्रपति शिवाजी महाराजांची स्मृति ही भारताच्या सेवेची स्मृती आहे. छत्रपति शिवाजी महाराजांना मराठी मनानें निव्वळ महाराष्ट्राचे नेते मानले नव्हते. छत्रपति शिवाजी महाराज हे सबंध भारताचे नेते होते. मानव्याचा एक अत्यंत उत्कृष्ट आदर्श त्यांच्या जीवनामध्यें आपल्याला पाहावयास सांपडतो. छत्रपति शिवाजी महाराज झाले नसते तर भारताचें काय झालें असतें तें सर्व जगाला माहीत आहे. पाकिस्तानची सीमा शोधण्याकरितां फार लांब जावें लागलें नसतें. कदाचित् ती तुमच्यामाझ्या घरापर्यंतहि येऊन पोहोंचली असती. छत्रपति शिवाजी महाराजांनीं केलेली ही सेवा निव्वळ मराठ्यांचें राज्य निर्माण व्हावें म्हणून केलेली नव्हती. त्या वेळच्या मोंगली सत्तेशीं ते लढले, पण मुसलमानांशीं त्यांचें वैर होतें असें नव्हे. सामान्य माणसांना बरोबर घेऊन एक नीतीचें नवें राज्य उभारावें अशी त्यांची महत्त्वाकांक्षा होती. त्या वेळीं हिंदुस्तानांतील सगळी मनें दबलीं गेलीं होतीं. त्यांचा स्वाभिमान दुखावला गेला होता. त्याला वाचा फोडण्याचें काम कुठल्या तरी वाणीद्वारा होणें आवश्यक होतें. हें काम छत्रपति शिवाजी महाराजांच्या मुखानें सह्याद्रीला करावें लागलें. हा इतिहास आम्ही विसरूं इच्छीत नाहीं. दुर्दैवानें शिवाजी महाराजांचें नांव कांहीं प्रसंगीं आम्ही चुकीच्या अर्थानें घेतों आणि त्यामुळें कांहीं लोकांच्या मनांत गैरसमज निर्माण होतो. त्यांच्यासाठी मी सांगूं इच्छितों कीं, नव्या महाराष्ट्र राज्याची निर्मिति ही छत्रपति शिवाजी राजांची पुण्याई आहे असें आम्ही मानतों. त्याचा अर्थ आम्हांला प्रांतिक भावनेची वाढ करावयाची आहे असा मात्र नाहीं. महाराष्ट्राबाहेरच्या विचारी माणसांना मी सांगूं इच्छितों कीं, अशा तऱ्हेची कुठलीहि भावना आमच्या मनांत नाहीं. छत्रपति शिवाजी महाराजांची ही मूर्ती त्यांची निव्वळ प्रतिमा आहे असें आम्ही मानीत नाहीं, तर भारतामध्यें जी तेजस्विता आहे, भारताची जी अस्मिता आहे, भारताचा जो स्वाभिमान आहे, त्या तेजस्वितेचें, त्या अस्मितेचें आणि त्या स्वाभिमानाचें ही मूर्ती एक प्रतीक आहे, अशी आमची तिच्या पाठीमागची भावना आहे. आणि म्हणून आजचा हा दिवस निव्वळ महाराष्ट्राच्याच इतिहासांतील नव्हे, तर भारताच्याहि इतिहासांतील एक सोन्याचा दिवस आहे असें मी सुरवातीस म्हणालों.

छत्रपति शिवाजी महाराजांनीं त्या काळीं महाराष्ट्र राज्याची जी रचना केली तिच्यामध्यें त्यांनीं कांहीं मूलभूत गोष्टी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ज्यांचा आदर्श भारताच्या राज्यानें आजहि स्वीकारावा अशा त्या गोष्टी आहेत. पश्चिम समुद्राकडे तोंड करून मी असा उभा असतांना महाराजांनीं निर्माण केलेल्या मराठ्यांच्या आरमाराचा विचार माझ्या मनाशीं आला. आमच्या पश्चिम किनाऱ्यावरील गरीब जनतेच्या सामर्थ्यावर आरमार उभें करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. हा इतिहास मीं आज परत आपणांला सांगितला पाहिजे असें नाहीं. विजयदुर्ग आणि सिंधुदुर्ग त्याची साक्ष देत आजहि पश्चिम समुद्रामध्यें उभे आहेत. त्यांनीं जनतेचें राज्य रचण्याचे जे नवे नवे प्रकार अमलांत आणले ते तेव्हांच्या हिंदुस्तानच्या इतिहासामध्यें नवे होते. जुन्या सरंजामी सरदारांच्या मदतीवर शिवाजी महाराजांनीं आपलें राज्य उभे

केलें नाहीं. मावळच्या खेड्यांतील लंगोटी घालणाऱ्या साध्या शेतकऱ्याला त्यांनीं शूर शिपाई बनविला. मोडकीं तोडकीं भीमथडीचीं तट्टें त्यांनीं आपलीं विमानें बनविलीं आणि त्यांच्या बळावर आपली सेना त्यांनीं सबंध हिंदुस्तानभर विखुरली. असा हा सामान्य माणसांचा राजा होता. आणि तो नीतीचें प्रतीक होता, चारित्र्याचें प्रतीक होता. म्हणूनच महाराष्ट्रांतील लाख लाख मनें छत्रपति शिवाजी राजांच्या स्मृतीवर स्वत:ची कुरवंडी करण्यास तयार झालीं. त्याच्या पाठीमागची महाराजांची भव्य शक्ति आपण लक्षांत घेतली पाहिजे.

आणि त्याच छत्रपति शिवाजी राजांची प्रतिमा आमच्या डोळ्यांसमोर ठेवून महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतरचा पहिला प्रजासत्ताक दिन आम्हीं आज साजरा करतों आहोंत. तो साजरा करतांना छत्रपतींची पवित्र स्मृति ध्यानांत ठेवून आजच्या ह्या महान् प्रसंगीं महाराष्ट्र राज्यातर्फे मी जुन्या प्रतिज्ञांचा नव्यानें उच्चार करूं इच्छितों. हें मराठी राज्य समतेचें राज्य व्हावें अशी महाराष्ट्र राज्याची प्रतिज्ञा आहे. जनतेंतील साधुता वाढावी ह्या तत्त्वाशीं प्रतिज्ञाबद्ध झालेलें असें हें राज्य आहे. आणि म्हणून यापुढच्या कांहीं वर्षांत दारिद्र्य आणि अज्ञान यांच्याशीं झगडा करून स्वाभिमानी, साधुतेवर विश्वास ठेवणारा आणि नितिमत्तेनें आपलें पाऊल पुढें टाकणारा असा नवा समाज महाराष्ट्राच्या भूमीवर चालतांना, बोलतांना पाहण्याचें आमचें जें स्वप्न आहे तें पुरें करण्याची शपथ, शिवाजी राजांच्या स्मृतीला साक्ष ठेवून आज आम्ही पुन्हा घेत आहोंत.

शिवस्मारक समितीचें मला आज अभिनंदन केलें पाहिजे. या समितीचें काम माझे मित्र श्री. बाळासाहेब देसाई ह्यांनीं हातांत घेतल्यापासून, त्यांनी आणि त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनीं गेले कित्येक दिवस जे श्रम केलें त्या श्रमांबद्दल जाहीरपणें त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप मला टाकली पाहिजे. आज आपल्या सर्वांच्या वतीनें आणि माझ्यातर्फे मी त्यांचें अभिनंदन करतों आणि त्यांना धन्यवाद देतों. माझे मित्र श्री. बाबूराव अत्रे आतांच माझ्याजवळ म्हणाले कीं, बाळासाहेब देसाईनीं कुस्ती जिंकली. मी बाबूराव अत्र्यांना सांगूं इच्छितो, कीं आम्ही पुष्कळ कुस्त्या जिंकतों, पण तुम्ही त्या पाहात नाहीं. आज संयुक्त महाराष्ट्र समितीचे प्रतिनिधी म्हणून श्री. बाबूराव अत्रे आणि महाराष्ट्र राज्याचा प्रतिनिधी म्हणून मी एका व्यासपीठावर प्रेमानें बोलत होतों, हा माझा आनंदाचा भाग आहे हें मी आपणांला सांगूं इच्छितों. या आनंदाच्या क्षणीं सगळीं मराठी मनें आज जशी एकत्र आलीं आहेत, तशींच ज्या एका कठीण प्रयत्नांतून महाराष्ट्राला न्यावयाचा आहे त्या कामामध्यें तीं एकत्र यावींत व आमची एकमेकांची शक्ति एकमेकांना उपयोगी पडावी अशी शिवाजी महाराजांच्या जवळ आज मी प्रार्थना करतों. सुखाच्या वेळीं एकत्र येणारी माणसें दु:खाच्या आणि प्रयत्नाच्या वेळींहि एकत्र येतील तर दुनियेमध्यें कधीं कुणीं न पाहिलेला असा पराक्रम करून दाखवतील असा माझा विश्वास आहे, म्हणून मीं या गोष्टीचा उल्लेख केला. मला शिवस्मारक समितीचे आभार मानावयाचे आहेत, मराठी राज्यातर्फे आणि सबंध मराठी जनतेतर्फे तिचे आभार मानावयाचे आहेत. आज येथें अनेक व्यक्ति हजर नाहींत त्यांचेंहि मला अभिनंदन केलें पाहिजे, त्यांचेहि मला आभार मानले पाहिजेत. माझे मित्र श्री. तिरपुडे आज येथें हजर नाहींत. पण त्यांनीं या शिवस्मारक समितीची कल्पना काढली आणि प्रयत्नाला सुरुवात केली. आज ते येथे हजर नसले तरी माझ्यातर्फे आणि श्री. बाळासाहेब देसाई यांच्यातर्फे त्यांचे मी मनापासून आभार मानतों.

मुंबई शहरांतील एक मोठें काम पुरें झालें म्हणून माझ्या मनाला आज अतिशय आनंद होत आहे. मुंबई शहरांत आज हजारों पुतळे आहेत. त्यांमध्यें छत्रपति शिवाजी राजांचा पुतळा नाहीं याचें मनाला दु:ख होत होतें. पण इतिहास योग्य क्षणाची वाट पाहात असतो असेंच म्हटलें पाहिजे. शिवाजी महाराजांचा पहिला पुतळा या शहरांत उभा राहिला तो नव्या महाराष्ट्राच्या रचनेची वाट पाहत होता असेंच म्हणावें लागेल. आणि नव्या महाराष्ट्राच्या रचनेनंतरसुद्धां, त्यांतील भारतीय संदर्भ विसरला जाऊं नये म्हणून भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या सुमुहूर्तावर तो

येथें बसविला गेला. परमेश्वराला सुद्धां हेवा वाटावा अशा ठिकाणीं आज शिवाजी राजांची मूर्ती येऊन बसली आहे. परंतु एक गोष्ट अद्यापि अपुरी राहिली आहे. आज जसा येथें हा शिवाजी महाराजांचा पुतळा बसला आहे, तसाच त्यांच्या नावानें समरांगण झालेल्या शिवाजी पार्कमध्येंहि त्यांचा पुतळा बसविण्याचें काम अपुरें राहिलेलें आहे याची आठवण आज मी आपणांस देतों. पुऱ्या केलेल्या कामाची नोंद घेत असतांना अपुऱ्या राहिलेल्या कामाचीहि आठवण आपण एकमेकांना करून देणें आवश्यक आहे. थोड्याच दिवसांमध्यें आपण सर्वजण मिळून तें काम पुरें करण्याचा प्रयत्न करूं. या अपुऱ्या राहिलेल्या कामाची आठवण देऊन कोणाला हिणवावें अशा बुद्धीनें मीं त्याचा उल्लेख केलेला नाहीं. सबंध महाराष्ट्रीय जनतेची ती जबाबदारी आहे. त्यांतला माझाहि हिस्सा मीं उचलावयास तयार आहें या भावनेनें मीं त्याचा उल्लेख केला आहे.

आज सबंध मुंबई शहरांतील जनता, निव्वळ महाराष्ट्रीय म्हणजे महाराष्ट्रांत राहणारी जनताच नव्हे, निव्वळ मराठी भाषिकच नव्हेत, तर हिंदी भाषिक, गुजराती भाषिक आणि मुंबई शहरांत बोलल्या जाणाऱ्या सगळ्या भाषांचे प्रतिनिधी येथें हजर असलेले मला दिसत आहेत. त्यांत ख्रिश्चन आहेत, हिंदु आहेत, मुसलमान आहेत. आज शिवाजी महाराज हे कुठल्याहि एका धर्माचे, कुठल्याहि एका जमातीचे, कुठल्याहि एका भाषेचे प्रतिनिधि नाहींत. आणि म्हणून मुंबई शहरांतील शेंकडों जाति, शेंकडों भाषा आणि सगळे धर्म यांचे प्रतिनिधी आज छत्रपति शिवाजी राजांना प्रणाम करण्यासाठीं येथें एकत्र आले आहेत, हें पाहून मला अतिशय आनंद वाटतो. धन्य शिवाजी महाराजांच्या स्मृतीची आणि धन्य महाराष्ट्र भूमीची, कीं तिनें असा महापुत्र प्रसवला. मी माझ्यातर्फे आणि आपल्या सर्वांच्या तर्फे छत्रपति शिवाजी महाराजांना पुन्हा प्रणिपात करतों आणि माझ्या नव्या शपथेचा उल्लेख करून मी आपणां सर्वांची रजा घेतों.

- 'सह्याद्रीचे वारे' मधून साभार
(शिवछत्रपतींच्या पुतळ्याचें अनावरण
मुंबई, दि. २६ जानेवारी १९६१)

## YASHWANTRAO CHAVAN NATIONAL AWARD, 2015 FOR NATIONAL INTEGRATION, DEMOCRATIC VALUES OR, SOCIAL AND ECONOMIC DEVELOPMENT IN INDIA

### CITATION

Dr. Vijay Kelkar was born in Khamgaon, district Buldhana on 15th May, 1942, but he was brought up and educated in Pune. He graduated in electrical and mechanical engineering from the College of Engineering, Pune. Then he did M.S. in industrial engineering from University of Minnesota, USA. At that stage he decided to change tracks of his career and switched over to economics. He obtained Ph.D. in economics from University of California, Berkeley, USA in 1970. Since then he has been engaged in engineering the macro economy of the nation. Dr. Kelkar has made a name for himself by his innovative and creative contributions to economic policy in various fields of Indian economy.

He began by teaching at the Administrative Staff College of India at Hyderabad; Center for Development Administration at Kathmandu, Nepal; South Asia Institute, Heidelberg University, Germany and University of California, Berkeley. He might have been expected to be a distinguished professor. Instead he plunged into remaking of critical sectors of Indian economy and in the process, became a great teacher for other decision-makers in public and private sector. His pioneering work in several important areas of economy is based on his deep understanding and clear vision developed in the course of his career.

To highlight some of the positions held by him, it may be mentioned that he was Economic Advisor, Ministry of Commerce, Government of India from 1977 to 1981; Secretary, Economic Advisory Council to the Prime Minister, from 1985 to 1988; Chairman, Bureau of Industrial Costs and Prices from 1987 to 1991; Director and Coordinator, International Trade Division, UNCTAD, Geneva, Switzerland from 1991 to 1994; Secretary, Ministry of Petroleum and Natural Gas, Government of India, from 1994 to 1997; Finance Secretary, Government of India, from 1998 to 1999; Executive Director for India, Sri Lanka, Bangladesh and Bhutan at the International Monetary Fund from 1999 to 2002; Advisor to Minister of Finance, Government of India in the rank of a Minister of State, from 2002 to 2004; Chairman, Finance Commission in the rank of Union Cabinet Minister, from 2008 to 2010.

Notable in his tenure was the work he did in the Bureau of Industrial Costs and Prices, particularly in the field of drugs and pharmaceuticals. He found that though the control of government over the prices was motivated by considerations of public welfare, it was having a very adverse effect on availability of drugs because the policy tended to discourage competition and investment in that sector. After convincing the political leadership, he succeeded in reducing the number of drugs under price control from 384 to 78. Since then the pharmaceutical and drug industry in India has flourished and India is now known as the largest producer of drugs at competitive prices.

He brought about a similar change when he was Secretary, Ministry of Petroleum and Natural Gas. He formulated a policy for dismantling the system of administered prices of petroleum and succeeded in implementing it. He was also the architect of new exploration

licensing policy for hydro carbons. These changes in policy led to attracting new investment, accelerating the exploration of oil and natural gas and optimum use of petroleum by the consumers. He was a crucial member of the team which formulated and implemented fundamental financial reforms since 1991. His work led to the implementation of the Fiscal Responsibility and Budget Management Act. He has been a champion of the concept of tax on goods and services which would unify the country as a single market. He is of the view that in the next phase of economic reforms, due emphasis should be given to increasing productivity of agriculture, development of small and medium industry and meaningful decentralization of decision making. In the field of urbanization, he has advocated improvement of infrastructure in small and medium cities and empowerment of the urban local bodies in these cities.

In 2012, he was called upon by the then Union Finance Minister to prepare a road map for fiscal consolidation. His recent contribution is the Report on reviving the system of public-private partnership after removing the stress points which have developed due to uneven distribution of risks. In Maharashtra, he had headed the Committee which looked into the regional imbalance in development. The Committee recognized that it is a complex issue, partly inherited from the history of these regions. However, basic thrust of its recommendations was on high quality infrastructure facilities being provided in all the regions by the State Government. Up-gradation of these facilities in the so called backward regions will give an impetus to higher development. As Chairman of the 13th Central Finance Commission, he adopted 'inclusive and green growth' as the overarching vision. He devised an innovative approach to ensure that the amounts transferred to the local self-government institutions will grow along with increase in the tax revenue of the Central Government.

In 2011, his outstanding contribution to the Indian economy was recognized by conferment of Padma Vibhushan, the second highest civilian award. He continues to exercise influence in charting the course of Indian economy through several important positions which he holds. To mention a few of them, he is Chairman of the Forum of Federations, Ottawa; India Development Foundation, New Delhi; Chairman – National Stock Exchange of India Ltd.; Chairman, National Institute of Public Finance and Policy, New Delhi. He also serves as a member of the Board of Directors, Advisory Council and Board of Governors of various global companies and organisations including Tata Consultancy Services; Indian Council for Research on International Economic Relations, New Delhi and National Innovation Foundation, Ahmedabad.

The Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai feels privileged in conferring the Yashwantrao Chavan National Award 2015 on Dr. Vijay Kelkarfor his outstanding contribution to economic development in India.

Mumbai
12th March, 2016

Dr. Anil Kakodkar,
Chairman
Panel of Jury

Sharad Pawar
President
Yashwantrao Chavan Pratishthan,
Mumbai

# महाराष्ट्र २०२५ : चर्चासत्र मालिका

दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या विचार व कार्यातून प्रेरणा घेऊन प्रगतीशील व समतावादी महाराष्ट्र घडविण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई प्रयत्नशील आहे. महाराष्ट्राच्या जनमानसाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या प्रश्नांचा वेध घ्यावा आणि सामाजिक कार्य करणारी माणसे तयार व्हावीत या भूमिकेतून गेली ३० वर्षे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कार्यरत आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे अध्यक्ष मा. शरदचंद्र पवार यांनी १२ डिसेंबर २०१५ रोजी वयाचं ७५ वर्षे पूर्ण केली. या अमृत महोत्सवाचा योग साधून महाराष्ट्रासमोरील आगामी दशकातील काही कळीच्या प्रश्नावर चर्चा घडवून आणणारी 'महाराष्ट्र २०२५' या संकल्पनेवर आधारीत १३ चर्चासत्रे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे जून ते डिसेंबर या सहा महिन्यांत राज्यातील प्रमुख शहरांत आयोजित करण्यात आली.

त्या त्या क्षेत्रात आगामी दशकात महाराष्ट्रात कोणती महत्त्वाची आव्हाने उभी राहतील, त्यासाठी कोणत्या उपाययोजना आखता येतील तसेच येत्या दशकात संबंधित क्षेत्रातील चित्र नेमके कसे असेल, या संदर्भात या चर्चासत्रांतून मांडणी व्हावी, अशी कल्पना होती.

एका पूर्ण दिवसाच्या चर्चासत्रात साधारण ५ ते ८ वक्त्यांनी मांडणी केली. प्रत्येक सत्रात आपल्या विषयाची मांडणी करण्यासाठी वक्त्याला ४५ मिनिटे देण्यात आली होती. त्यानंतर १५ मिनिटे प्रश्नोत्तरांसाठी राखीव ठेवली होती. चर्चासत्रासाठी निवडण्यात आलेल्या विषयातील प्रश्नांमध्ये आस्था असलेल्या महाराष्ट्रातील सुमारे १५० ते ३०० मान्यवर, अभ्यासक, कार्यकर्ते, धोरणकर्त्यांना मुद्दाम या चर्चासत्रात आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या उपस्थितीत आणि सहभागाने हे चर्चासत्र अधिक फलदायी झाले. चर्चासत्रांतर्गत विषयानुरुप झालेल्या मांडणीचे स्वतंत्र व एकत्रित अशा दोन्ही स्वरूपातील ग्रंथ प्रकाशित करण्यात येणार आहेत.

### नागरीकरणाची आव्हाने

देशामध्ये एकूणच शहरीकरणाचा वेग प्रचंड वाढतो आहे. त्याबरोबर अनेक समस्या आणि आव्हानेही समोर उभी राहात आहेत. आधुनिक भारताच्या जडण-घडणीमध्ये शहरीकरण अत्यंत महत्वाचा टप्पा राहणार आहे. महाराष्ट्रात आजच ५०% शहरीकरण झाले असून पुढील दशकात ते अधिक वेगाने होईल असे दिसते आहे. पुढील दशकातील शहरीकरणासमोर असणाऱ्या मोठया समस्या आणि आव्हाने यावर विचारविनिमय व्हावा यासाठी 'महाराष्ट्र २०२५ : नागरीकरणाची आव्हाने' या विषयावर २४ ऑक्टोबर २०१५ रोजी नवी मुंबई स्पोर्टस् क्लब, वाशी, नवी मुंबई येथे चर्चासत्राचे आयोजन केले होते. सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत चर्चासत्र पार पडले.

कार्यक्रमा वेळी स्वागत करताना माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांनी गेल्या चाळीस वर्षातील शहरीकरणाच्या वाढत्या वेगावर चिंता व्यक्त केली आणि त्याची कारणे उपस्थितांसमोर मांडली. नवी मुंबई हे नियोजनबध्द शहर असले तरी प्रचंड स्थलांतरामुळे या शहरालाही आता विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे हे त्यांनी स्पष्ट केले.

या चर्चासत्रात नागरीकरणावरील सर्व समस्यांचा उहापोह करण्यात आला.

कार्यक्रमाची भूमिका मांडताना ज्येष्ठ पत्रकार सदा डुंबरे यांनी महाराष्ट्रात जवळजवळ सर्वत शहरांत उपजिवीकेकरीता स्थलांतराचा मोठा प्रश्न आहे, हे नमूद केले. आगामी १० वर्षात यामुळे शहरांसमोर जी अनेक आव्हाने उभी राहणार आहेत. त्यांचा आपल्यालाच करावा लागेल. हे चर्चासत्र पुढील दहा वर्ष महाराष्ट्राच्या नागरीकरणाला नक्कीच बौध्दिक खाद्य पुरवेल, अशी खात्री त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना शरद काळे यांनी 'हा

विषय खूप व्यापक आणि जटील आहे' हे स्पष्ट केले. नागरीकरणाच्या बाबतीमध्ये ज्या अनेक पैलूंचा आपल्याला विचार करायचा आहे, त्यामध्ये नगरांची उत्पत्ती, स्थिती, व्याप्ती, गती, दिशा आणि भविष्य एवढ्या पैलूंचा आपल्याला विचार करावा लागेल. कोणत्याही देशाला नागरी आणि ग्रामीण समाजामधल्या परस्परावलंबित्वाचा तोल सांभाळावा लागतो, असे सांगितले. 'तो सांभाळला नाही तर मग अडचणी निर्माण होतात. नागरीकरण आज दोन पध्दतीने होत आहे. एक आकर्षण म्हणून तर दुसरी गोष्ट म्हणजे ग्रामीण भागात जी अभावग्रस्तता आहे, आणि काही ठिकाणी अन्याय किंवा विषम समाजरचनेची जी झळ लोकांना लागते, त्यामुळे लोक गाव सोडून शहरांकडे धाव घेताना दिसत आहे, आणि यामध्ये आपण जर तोल राखू शकलो नाही तर मग शहरांमध्ये प्रश्न निर्माण होत राहणारच. फक्त गावातून होणारे स्थलांतर याला जबाबदार आहे, असे म्हणणे नक्कीच चुकीचे ठरेल. एका प्रक्रियेतून हे प्रश्न निर्माण होत असल्या कारणाने नागरीकरणाच्या आव्हानांचा विचार करताना फक्त शहरांचा विचार करुन चालणार नाही; तर संकलित समग्र विचार केला पाहिजे' असे मत श्री. काळे यांनी मांडले.

कार्यक्रमाचे उद्घाटन करताना माजी मंत्री गणेश नाईक यांनी नवी मुंबई हे नियोजित शहर घडविताना आलेले आपले अनुभव उपस्थितांसमोर मांडले. खेडेगावात राहून पोट भरत नाही म्हणून आज सारी शहरे वाढताना दिसत आहेत. यावर उपाय म्हणून सर्वांगीण विकासाची गरज आहे. असा विकासच शहरावरील ताण कमी करु शकतो. यशवंतराव चव्हाण तसेच श्री. शरद पवार यांसारखे अष्टपैलू तसेच विचार व दूरदृष्टी असणारी राजकीय फळी आज तयार झाली पाहिजे, असे विचारही त्यांनी व्यक्त केले.

आपल्या बीजभाषणात श्री. विद्याधर फाटक यांनी नागरीकरणाकडे आपण नेहमीच 'समस्या' या दृष्टीने पाहत आलो आहोत, पण पुढे बघायचे असेल, तर नागरीकरणाकडे एक संधी म्हणून बघणे अत्यंत आवश्यक आहे आणि त्या सकारात्मक दृष्टीकोनातून आपण बघितले तर कदाचित नागरीकरणाला आपण योग्य तऱ्हेने सामोरे जाऊ शकू, असे नमूद केले.

जस जसा आर्थिक विकास होत होता, तसे नागरीकरणही वाढत गेले. आज जे प्रगत देश आहेत, त्यांच्यातल्या नागरीकरणाचे प्रमाण साधारण ७० ते ८० टक्के आहे आणि जे देश अप्रगत किंवा मागासलेले आहेत, त्यांच्यामध्ये मात्र नागरीकरणाचे प्रमाण ४० ते ३० टक्क्यां पेक्षाही कमी आहे. आज भारतातल्या नागरीकरणाचे प्रमाण ३० टक्क्यांच्या आसपास आहे. आता आपण या अवस्थेपर्यंत आलो आहोत की, शहरांचा विकास झालाय, आणि ती शहरं वाढणार आहेत. त्याचे दुष्परिणाम नाहीत; तर तीच संधी आहे, आणि त्याकडे त्या दृष्टीनेसुध्दा बघता येईल.

मा. शरद पवार यांनी २००७ मध्ये असे म्हटले होते की, शेतीवर अवलंबून असलेल्या देशामधला शेतीवरचा अतिरिक्त बोजा कमी करणे, त्यातल्या लोकांना उत्पन्नाचा पर्याय उपलब्ध करुन देणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षणाचा विस्तार, गुणवत्ता आणि दर्जा महत्त्वाचा आहे. त्याचाही पुढे जाऊन असे म्हणता येईल की, त्याकरता नागरीकरणही तितकेच महत्त्वाचे आहे.'

श्री. माधव पै यांनी 'वाहतूक' या महत्त्वाच्या प्रश्नावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. रस्त्यावर दिवसागणिक येणाऱ्या वाहनांची संख्या वाढतच असल्याने वाहतूकीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शहरात शेवटी रस्तावाढीला काही मर्यादा असतातच; पण वाहनवाढीची मात्र आजच्या घडीला तशी काही व्यवस्था नाही. वाहतूक कोंडी आणि प्रदूषण; मग ते ध्वनी व हवेचे असो, हे प्रश्न खूप गांभीर्याने डोके वर काढत आहेत आणि त्यावर तोडगा काढणे खूपच जिकीरीचे आणि कटकटीचे आहे. कारण, आपली सरकारी वाहतूक व्यवस्था अत्यंत दयनीय आहे. तिच्यात अमूलाग्र बदल झाल्याशिवाय काहीच बदल होणे अपेक्षित नाही, दुसरा पर्याय आहे तो स्वयंप्रेरणेचा. नागरीक जोवार वाहन वापराला पर्याय शोधत नाहीत तोपर्यंत उपाय शक्य नाही. पण, यासाठी शहराचे Infrastructur ही तसेच develop करणे अत्यंत गरजेचे आहे, असे मत श्री. पै यांनी

मांडले.

प्रा. अमिता भिडे यांनी झोपडपट्ट्या, अनौपचारिक घरबांधणी आणि परवडणारी घरे या अत्यंत निकडीच्या विषयाची मांडणी केली. अनौपचारिक घरबांधणी हाच एक मोठा प्रश्न झाल्याने तो वेगवेगळ्या प्रश्नांची निर्मिती करत आहे आणि त्यामुळे त्याच्याबद्दल सांगोपांग चर्चा करण्याची खूप गरज आहे, असेही त्या म्हणाल्या.

जमिन, जमिनीचे नियोजन, बांधकाम (बांधणी) व Finance हे गृहनिर्माणामधले चार मुख्य घटक आहेत. त्यासाठी एक चांगले शासकीय धोरण खूपच गरजेचे आहे, असे प्रा. भिडे यांनी आपल्या मांडणीत सांगितले.

आपण शहर नियोजन करतो आहोत. पण, त्यात मुलभूत चुका झालेल्या आहेत. गेल्या ६० वर्षापूर्वी जगभरात जी शहर नियोजनाची तत्वे आणि पध्दती वापरल्या होत्या, त्या चुकीच्या होत्या असे आज लक्षात आले आहे. त्या चुका मुख्यत: अज्ञानामुळे, अवैज्ञानिक दृष्टिकोनामुळे आणि चुकीच्या नियोजन पध्दतीमुळे झाल्या आहेत. महाराष्ट्रात आपले शहर नियोजन ६० वर्षापूर्वीच्या कायद्यावर बेतलेले आहे.

नेहरुंच्या काळात आपण देशासाठी खाजगी आणि सरकारी उद्योगांची मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली होती. त्यानुसार महाराष्ट्र राज्य शासनाने अनेक शहरांजवळ पायाभूत सेवा देऊन औद्योगिक विकासाला चालना देण्याचे प्रयत्न केले. शहराचे नियोजन आणि औद्योगिक वसाहती यांची नीट सांगड घालता आली नाही. १९७०-८० च्या दशकात शहरांचे नियोजन करु शकणारे मनुष्यबळ नव्हते. आजही नाही.

शहरांचे विकास आराखडे, प्रादेशिक नियोजन, महाराष्ट्रातले असमान नागरीकरण, शहरांची वाढ, अशक्त नागरी प्रशासन संस्था, सार्वजनिक, समावेशक संस्कृतीचा अभाव, पर्यावरण आणि ऐतिहासिक वारशाची उपेक्षा, शहरातील असुरक्षितता, तोटाग्रस्त सार्वजनिक सेवा, वाहनाची वाढ आणि शहरांचा ऱ्हास, बदलती शहरे – आज आपले नियोजन कुठे चुकले आणि त्यासाठी काय करायला पाहिजे हे वरील मुद्यांचा अभ्यास केला तर निश्चित लक्षात येईल.

जगात शहर नियोजनाची दिशा बदलते आहे. 'जे नियोजन सामान्यातल्या सामान्य, गरीबातल्या गरीब नागरीकाची काळजी घेते तेच खरे नियोजन' हा नवीन दृष्टिकोन आता जगात मान्य होऊन बिघडलेली शहरे नव्याने घडवली जात आहेत. शहराचे चैतन्य, लोकांचे आरोग्य, सुरक्षितता आणि शाश्वत विकास हा नवीन शहरी मंत्र आहे. शहरांच्या समावेशक नियोजनाची ही नवीन भाषा आपण समजून घ्यायला पाहिजे. लोकांसाठी छान शहरे घडवणे जागतिक निकड आहे. आपणही त्यात भाग घ्यायला हवा,' असे प्रतिपादन श्रीमती सुलक्षणा महाजन यांनी केले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी आमदार संदिप नाईक यांनी राज्यकर्त्यांची इच्छाशक्ती, नागरीकांचा सहभाग आणि उत्तम प्रशासन नागरीकरणात महत्वाच्या बाबी आहेत आणि त्यांची योग्य सांगड घातली गेली तर शहराचा विकास उत्तम होणार यात शंका नाही. प्रत्येक नागरीकाचा सहभाग घेवून आपले शहर स्मार्ट कसे करता येईल यावर भर दिला, तर नागरीकांचाही उत्स्फूर्त सहभाग मिळाल्याशिवाय राहणार नाही असे वाटते.' हे शेवटी संदिप नाईक यांनी नमूद केले. यानंतर नवी मुंबईचे महापौर सुधाकर सोनावणे यांनी एखादे शहर स्मार्ट झाल्यावर जर गावेही स्मार्ट झाली नाहीत तर ते नक्कीच शहरांत स्थलांतर करत राहतील आणि त्यांना परवडणारी घरे दिली नाहीत तर झोपडपट्ट्यांचा प्रश्न हा कधीच निकालात निघणार नाही,' असे सांगितले. 'राज्यकर्ते आणि प्रशासन यांचा मेळ बसणे अत्यंत गरजेचे असून अशी चर्चासत्रे वारंवार झाली तर आम्हा राज्यकर्त्यांचा ब्रेन वॉशही होत राहील व खऱ्या अर्थाने विकास कशाला म्हणतात व आम्हाला कुठल्या दिशेने जायचे आहे हे आम्हाला कळेल', श्री. सोनावणे यांनी शेवटी स्पष्ट केले.

नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी नागरीकरणातील विविध समस्यांवर चर्चा करत त्यावर इतर ठिकाणी कसे कसे उपाय अवलंबिले गेले हे उदाहरणांसह मांडले. त्याचा अभ्यास करुन येथील समस्यांवरही तोडगा काढण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे, असे ते म्हणाले.

घनकचरा व्यवस्थापन या विषयावर श्री. शरद काळे

यांनी शहरांना कचरा समस्या, डंपिंग समस्या यावर कसा साधा सरळ मार्ग काढता येऊ शकतो याबद्दल मार्गदर्शन केले. अगदी आपल्या घरापासूनच जर कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन केले तर महानगरपालिकेवरील कचर्‍याचा भार कसा कमी येऊ शकतो, हे अगदी विस्ताराने समजाऊन सांगितले. जनप्रतिनिधींनी पुढाकार घेतल्यास नागरीकांचे समुपदेशन करण्याची तयारी श्री. काळे यांनी दर्शविली. घरातील कचरा जर घरातच शून्य केला, तर भारत्त एक दिवसात स्वच्छ करण्याची ताकत तुमच्यात आहे, असा उल्लेखही शेवटी त्यांनी केला.

**साहित्य, संस्कृती व कला :**
**सामाजिक पर्यावरण आणि शासकीय धोरण**

साहित्य - संस्कृती - कलेच्या संवर्धनासाठी समाजात पोषक वातावरण असणे व शासनाने योग्य सांस्कृतिक धोरण आखून अमलात आणणे आवश्यक आहे. या विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र २०२५ या संकल्पनेखाली १७ ऑक्टोबर २०१५ रोजी, नाशिक येथे 'साहित्य, संस्कृती व कला : सामाजिक पर्यावरण आणि शासकीय धोरण' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन कुसुमाजग्रज प्रतिष्ठानच्या सहकार्याने केले होते. नाशिकच्या कुसुमाग्रज स्मारकात हे चर्चासत्र पार पडले.

नाशिक विभागीय केद्रांचे अध्यक्ष विनायकदादा पाटील यांनी उपस्थितांचे स्वगत केले व कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. नंतर चंद्रकांत कुलकर्णी यांनी 'चित्रपट' या विषयाची मांडणी केली. चित्रपटाला आतापर्यंतच्या शासकीय रचनेमध्ये जसे यशवंतराव चव्हाणांनी करमाफी दिली तसेच कुठेतरी अनुदानाचे पाठबळ नक्कीच आहे. ते खूप कमी प्रमाणावर आहे. दुसरी महत्वाची गोष्ट, आता शासनाकडे ज्या प्रकारे सांस्कृतिक खात्याचा पैसा आहे त्याचा विनियोग मात्र नीट होत नाही. त्याचे एकच खात आहे आणि त्या खात्यावरची जबाबदारी जर तुम्ही बघितली तर तिथे कमीत कमी चार IAS माणसे नेमावीत एवढी त्याची जबाबदारी आहे. म्हणजे, लोक कलाकारांना, निवृत्त कलाकारांना पेन्शनपासून ते दिल्लीला २६ जानेवारीला चित्ररथाची निर्मिती करण्यापर्यंत सगळे आहे. मी याच नाशिकच्या नाट्यसंमेलनात, बोललो होतो की, श्राद्धपक्ष केल्यासारखे राज्य नाट्यस्पर्धा होते. एक चित्रपट महोत्सव होतो, एक बक्षीस वितरण समारंभ होतो, त्याला जो विनियोग पाहिजे, त्याला जे शासकीय धोरण पाहिजे पाच वर्षासाठी राबवण्याची काही तरी शिस्त पाहिजे, ती कुठेच होत नाही. शिवाय, मग ज्या पक्षाचे सरकार त्या पक्षाच्या जवळच्या माणसांच्या कमिट्या. आधीच्या केलेल्या सगळ्या कमिट्या लगेच रद्द. पुन्हा एकदा नवीन कमिट्या... हे शासकीय धोरण म्हणजे आपल्या लोकशाहीचे मांडलेले वगनाट्य आहे आणि त्या धोरणामध्ये कशी काय कुठे आपण मांडा-मांडी करणार असा प्रश्न त्यांनी विचारला.

'कुठल्याही प्रगल्भ समाजामध्ये लेखकाला, कलावंताला महत्व दिले जाते. अशी परिस्थिती आपल्याकडे आहे असे म्हणणे जरा कठीण आहे, म्हणजे लेखक काही म्हणतो आणि त्याची सर्वदूर प्रतिक्रिया समाजामध्ये घडते अशी परिस्थिती आपल्या भाषिक संस्कृतीमध्ये नाही आहे. मुद्दा माझ्या दृष्टीने असा महत्वाचा आहे की अशा समाजामध्ये जिथे लेखकाचा शब्द गंभीरपणे घेतला जातो, तिथे त्या संपूर्ण समाजामध्ये साहित्याची जागा अतिशय वर असते. कारण सामाजिक प्रश्नाच्या वातावरणाच्या संदर्भामध्ये समाज त्याला किती महत्व देईल? असे ते एक शस्त्र आहे आणि ते जबाबदारीने वापरले पाहिजे. त्याचा पूर्णत: परिणाम होईल अशा पद्धतीने ते वापरले पाहिजे. नुसता साहित्याचा विचार केला तरी साहित्य निर्मितीसाठी साहित्य म्हणजे फक्त कथा, कादंबरी नव्हे किंवा कविता नव्हे नाटक नव्हे. वैचारिक साहित्य, वैचारिक गद्य, कोषवाङमय या सगळ्या महत्वाच्या गोष्टी आहेत. चांगल्या प्रकारचे ललित साहित्य निर्माण होण्यासाठी ही ज्ञानाच्या क्षेत्रातली जी सगळी साधने आहेत, विविध ज्ञानशाखां मधले जे ज्ञान आहे, आपल्या भाषेतले असेल, इतर भाषेतले असेल, ते सातत्याने याच्यामध्ये येत राहाण्याच्यासाठी यशवंतरावांनी अतिशय उत्तम बैठक घालून दिलेली होती, असे मी म्हणेन. म्हणजे, नुसते साहित्य संस्कृती मंडळ नाही, विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ असेल, साहित्य संस्कृती मंडळ असेल, विश्वकोश मंडळ असेल हे सगळे यशवंतरावांनी सुरु केले. चांगल्या आणि गंभीर साहित्याचा वाचक जगभर सगळयाच भाषांमध्ये

कमी असतो, तो फक्त मराठीत कमी आहे, असा भाग नाही. पण त्याच वेळेला तो वाढला पाहिजे, ही एक सामाजिक भूमिका अत्यंत आवश्यक आहे', असे प्रतिपादन ''साहित्य'' या विषयावरील मांडणीत प्रसिद्ध साहित्यिक रंगनाथ पठारे यांनी केले.

चर्चासत्राचे बीजभाषण मा. संजय भास्कर जोशी यांनी केले. त्यांनी नमूद केले की, 'साहित्य, संस्कृती व कला : सामाजिक पर्यावरण आणि शासनाचे धोरण' हा जरी विषय असला तरी आता कला, साहित्य आणि संस्कृतीमध्ये नाट्य, चित्रपट संगीत, चित्रशिल्प म्हणजे, माणसाला माणूसपण देणाऱ्या सगळ्या गोष्टींचा समावेश आहे. आपण जगतो तेव्हा आपल्यातले माणूसपण खऱ्या अर्थाने जिवंत करणाऱ्या या गोष्टी आहेत. कला, साहित्य, आणि संस्कृती हा विषय अतिशय व्यापक आहे. त्यामुळे, या सर्व अंगाना स्पर्श करणे महत्वाचे आहे. पण, त्याचबरोबर त्यांनी हे ही आवर्जून सांगितले की, यामध्ये धर्म, अध्यात्म आणि राजकारण यांचा समावेश नाही. आजच्या चर्चासत्रा मध्ये आपण Specifically या कलांकडे, सांस्कृतिक अंगाने बघणार आहोत. कारण आज अशी अवस्था आहे की कुठल्याही विषयातून धर्म, अध्यात्म आणि राजकारण याकडे सहज जाता किंवा घसरता येते. तर ते आपण टाळूया. त्यामुळे, या गोष्टींचा आणि कला साहित्य आणि संस्कृती या विषयाचा जास्त खोलवरचा अभ्यास होईल, असेही मत त्यांनी मांडले. पुढे ते म्हणाले की, सामाजिक पर्यावरण आणि शासनाचे धोरण असे पुढचे जे कलम आहे यातले ते केवळ यमक नाही, तर त्या संस्कृतीचे समृध्द होण्याचे गमक आहे. थोडक्यात, समृद्ध संस्कृतीसाठी आदर्श सामाजिक पर्यावरण आणि शासकीय धोरण कसे असायला हवे ? What is ideal ? की, ज्या सामाजिक पर्यावरणामध्ये आणि ज्या प्रकारच्या शासकीय धोरणामुळे कला, साहित्य आणि संस्कृती खऱ्या अर्थाने समृद्ध होईल आणि खऱ्या अर्थाने आपल्या सर्वांचे जगणे समृद्ध होईल, ते काय असेल ? 'आदर्श सामाजिक पर्यावरण आणि शासनाचे धोरण' याविषयी प्रथम आपण विचार करावा. भोवतालचे पर्यावरण कसे, म्हणजे एकीकडे आपण आदर्श कसे असायला हवे, म्हणजे त्यात काय include आहे, Basically सामाजिक पर्यावरण मी म्हणतो तेव्हा त्यात कुठले कुठले घटक मला अपेक्षित आहेत ते सांगावे आणि मग भवतालचे आहे काय ? As against कुठले घटक, ते आदर्श कसे असावेत, आणि वास्तव काय आहे, याची मांडणी या वक्त्यांच्या भाषणातून होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. भोवताली जे पर्यावरण आहे, शासनाचे धोरण आहे, तिथून ते आदर्श पर्यावरणापर्यंत जाण्यासाठी काय करावे लागेल, की ज्यायोग्य आपले साहित्य, कला आणि संस्कृती खऱ्या अर्थाने समृद्धीकडे वाटचाल करेल, या तीन दिशांनी आपण चर्चा कराल, म्हणजे आदर्श काय असावे सामाजिक पर्यावरण आणि शासनाचे धोरण भवतालाचे वास्तव काय आहे आणि या दोघात जर काही gap आढळत असेल तर तो कसा भरून काढता येईल, यासाठी काही सकारात्मक सूचना देखील असाव्यात' अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

'नाटक' या विषयाची मांडणी करताना नाटककार सतीश आळेकर यांनी महाराष्ट्राच्या १८४३ पासूनच्या नाट्य इतिहासाचा आढावा घेतला. 'नागरी नाटकाची परंपरा नको इतकी नाटककारप्रधान राहिल्याने मराठी रंगभूमी अनेक वर्ष नाटककारांभोवतीच केंद्रीत झाली होती. गेल्या २५-३० वर्षात किंवा स्वातंत्र्योत्तर काळात विजया मेहता आल्यानंतर चंद्रकांत कुलकर्णी पर्यंत किंवा त्यानंतरची पिढी निपुण धर्माधिकारी किंवा आलोक राजवाडे यांच्या पिढीपर्यंत आता दिग्दर्शकीय दृष्टीकोनातून रंगभूमी दिसते आहे. संहितेला दिग्दर्शकीय दृष्टीकोनाचे कोंदण लाभल्याने एक वेगळे परिणाम नजरेस येतो आहे त्यामुळे, मराठी रंगभूमीचा डिंडीम सगळीकडे वाजतो आहे', असे ते म्हणाले. गेल्या ५०-६० वर्षामध्ये नाटकातल्या व्याकरणाच्या त्रुटींची संवेदना रंगभूमीला जाणवू लागली आहे. नाटकाचे एक व्याकरण सिध्द होण्याची गरज आहे, असेही आळेकर म्हणाले.

'चित्रकला, शिल्पकला' या विषयाची मांडणी करताना सुहास बहुलकर यांनी या दोन्ही कला वर्तमानात कशा मागे पडत चालल्या आहेत, याचा उहापोह केला. शासकीय आणि सामाजिक अशा दोन्ही स्तरांवर या कलांची उपेक्षा सुरु असल्याची व्यथा मांडून बहुलकर म्हणाले, 'गतकाळातील

मौल्यवान कला संपत्तीचे जतनही आज होत नाही आपण सिडी विकत घेतो, नाटक बघतो, आवर्जून सिनेमा बघतो, यासाठी तिकीट काढतो पण चित्रांच्या प्रदर्शनाला आवर्जून किती जण जातो ? आपण खरोखरच चित्रसाक्षर आहोत का ? हा विचार केला पाहिजे', असे ते म्हणाले. आपण लाखो रुपये खर्चून फ्लॅट घेतो, बंगले बांधतो, पण किती जणांनी चित्र विकत घेऊन घरात लावले आहे ? असा आणखी एक प्रश्न विचारुन बहुलकरांनी 'कलावंतांनीही लोकाभिमुखपणे आवश्यक आहे', असे सांगितले. समाज आणि कलावंतांमध्ये दरी दूर करताना सरकारी धोरण बदलण्यासाठी प्रयत्न करावे लागतील, असेही ते म्हणाले डॉ. सत्यशील देशपांडे यांनी संगीताबाबतचा विषय सप्रयोग, प्रभावीपणे उलगडून दाखवला. संगीत हे घोड्यांच्या शर्यतीसारखे नसते. त्यामुळे त्याची तुलना आणि सरस-निरस ठरवणेही अवघड असते, असे आवर्जून सांगितले.

'क्रीडा धोरण आणि क्रीडा संस्कृती' या विषयावर मुंबईत वानखेडे स्टेडियमच्या सभागृहात नामवंत खेळाडूंच्या उपस्थितीत २१ नोव्हेंबर २०१५ रोजी चर्चासत्र पार पडले. प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष हेमंत टकले यांनी श्री. शरद पवार साहेबांचा खेळाविषयीचा दृष्टिकोन आणि त्यासंबंधीच्या त्यांच्या आठवणी सांगत या चर्चासत्रामागील आयोजनाचा हेतू स्पष्ट केला. चर्चासत्राच्या नंतरच्या सत्रामध्ये क्रीडा विषयावर चर्चा झाली. 'क्रीडा हा शालेय शिक्षणाचा मूलभूत भाग झाल्याशिवाय आपल्याकडील क्रिडा क्षेत्राचा पाया विस्तृत होणार नाही,' असे प्रतिपादन प्रतिष्ठानचे सरचिटणीस शरद काळे यांनी प्रस्तावनेत केले.

श्री. भीष्मराज बाम यांनी आपल्या बीजभाषणात क्रीडा संघटनांना त्यांनी कशाप्रकारे काम करावे याचे दिशादिग्दर्शन केले. क्रीडा संघटना एखाद्या पेढीसारखी चालवायची नसते. पैसे अधिक राहायला लागले तर कार्य व्यवस्थित सुरु नाही, असे समजावे. कामासाठी पैसे जमवावेत आणि जमले की, ते त्या कारणासाठी खर्च करुन टाकावेत, असे ते म्हणाले. प्रत्येक जण आपलाच अहंकार जपत बसला तर क्रीडा क्षेत्रातील प्रगती होणे शक्य नाही. आपण एकत्र असलो तरच कार्य उभे राहते. श्री. शरद पवार यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त हा गुण क्रीडा संघटनांनी घेतला तरी या क्षेत्रात बरेच काम होईल, असेही श्री. बाम यांनी मांडले.

खो-खो खेळाच्या माध्यमातून भारतीय खेळाचे भवितव्य मांडताना श्री. सतिश देसाई यांनी भारतीय खेळांच्या मार्गदर्शकांना पुरेसे मानधन मिळत नाही, याबद्दल खंत व्यक्त केली. अनेक पक्ष छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावे चालतात, त्यांच्या जयंत्या साजऱ्या करतात, पण राज्यकर्त्यांना छत्रपतींच्या नावे असलेला पुरस्कार द्यायला तीन-तीन वर्ष वेळ मिळत नाही, पण त्याचे त्यांना काहीच वाटत नाही. ही अशी शोकांतिका फक्त याच राज्यात घडू शकते, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. दिवंगत यशवंतराव चव्हाण यांनी १९६८ मध्ये 'महाराष्ट्र हरला तरी चालेल, पण या खेळाचा प्रसार देशभरात झाला पाहिजे' असे विधान केले होते. त्याची आठवण देऊन श्री. देसाई यांनी 'गेल्या ४७ वर्षात खरेच तसे झाले का' ? असा प्रश्न उपस्थित केला. खो-खो ची आर्थिक ताकद कमी झाली आहे, या खेळाला राज्याश्रय मिळत नाही, संघाची अवस्था डबघाईला आली आहे, क्रीडा शिक्षक नाहीत, पुरस्कार नाहीत, असे असंख्य प्रश्न त्यांनी मांडले.

ज्येष्ठ ॲथलिट आदिल सुमारीवाला यांनी ॲथलॅटिक्स विषयाच्या अनेक बाजू या निमित्ताने मांडल्या. २०२० च्या ऑलिम्पिकमध्ये आपण २० सुवर्णपदके मिळवू हा पोकळ बडेजाव आहे. असे सुरुवातीलाच स्पष्ट करु ते म्हणाले आपण या खेळाच्या कोणत्याच अंगामध्ये अद्याप पर्यंत तेवढीच सुधारणा किंवा प्रगती केलेली नाही. खेळासाठी जो निधी असतो, तो नेमका कुठे जातो हाच प्रश्न आहे. पाच वर्षांपूर्वी जे क्रीडा धोरण जाहीर झाले होते, त्याचे पुढे काय झाले हे कुणालाच माहित नाही. क्रीडा क्षेत्रासंबंधी जी साधने आपल्याकडे येतात. त्याचा दर्जा अगदीच निराशाजनक असतो, जी इन्डोअर स्टेडियम म्हणून उभारले आहे ते हॉल खुशाल सभा समारंभांना वापरले जातात. मग खेळाडू तयार होणार कसे ?

ॲथलेटिक्समध्ये जगातील सर्वाधिक देश सहभागी असतात. या क्षेत्रात तीव्र स्पर्धा असते. त्यात यशस्वी व्हायचे,

तर आपण ग्रामीण भागातील, गरीब मुलांकडे पाहायला हवे. त्यातून चांगले ॲथलिट मिळतील. आज गल्लीबोळात मॅरेथॉनचे पेव फुटले आहे. परंतु त्याचा ॲथलेटिक असोसिशनला काहीही उपयोग नाही. शालेय स्पर्धा, महाविद्यालयीन स्पर्धा, विद्यापीठीय स्पर्धा हा कोणत्याही क्रीडा क्षेत्राचा कणा असतो. आपण त्याकडे गांभीर्याने पाहिले, पुरेसा निधी उपलब्ध करुन दिला, तरच या क्षेत्रात भवितव्य आहे, असे सुमारीवाला यांनी शेवटी सांगितले.

आंतरराष्ट्रीय नेमबाजपटू अंजली भागवत यांनी आपल्या अनुभवांच्या आधारे या क्षेत्रातील प्रश्न मांडले. २०२५ मध्ये नेमबाजीतील पदकांची संख्या सहावरुन वीसवर जावी अशी अपेक्षा असेल, तर सरकार आणि समाज यांनी एकत्रित प्रयत्न केले पाहिजे, असे मत त्यांनी मांडले. निवृत्त खेळाडूंना चांगले मानधन देऊन शालेय पातळीपासून प्रशिक्षक म्हणून नेमले पाहिजेत. त्यासाठी क्रिकेटचा आदर्श आपल्यासमोर ठेवला पाहिजे, असेही त्या म्हणाल्या. पालकांनी आपल्या मुलाच्या वाढीकडे आवश्यक तेवढेच लक्ष द्यावे, खेळाडूंना वेळच्या वेळी क्रीडा साधने, प्रोत्साहन आणि पुरस्कार मिळावेत, त्यांच्या रोजगाराचीही सोय व्हावी असे सांगून शेवटी श्रीमती भागवत यांनी क्रीडा विद्यापीठाची गरज बोलून दाखवली.

श्री. उमेश झिरपे यांनी 'गिर्यारोहण' या विषयाची मांडणी करताना या क्रीडा प्रकाराबद्दल सामाजिक जागृती आवश्यक आहे, असे सांगितले. गिर्यारोहण ही जीवनशैली आहे. एक गिर्यारोहक निसर्गाचे खूप मोठे संरक्षण करतो. एखादा अपघात होतो, आपत्ती कोसळते, जिथे अग्नीशमन दल किंवा पोलीस अपुरे पडतात. तिथे गिर्यारोहकच कर्तव्यबुध्दीने धावून जातात. या खेळाचे हे सामाजिक अंग लक्षात घेऊन अधिकाधिक लोकांना यात येण्यासाठी प्रोत्साहन द्यायला हवे असे ते म्हणाले.

प्रसिध्द कसोटीपटू पद्माकर शिवलकर यांनी क्रीडा धोरण आणि क्रीडा संस्कृती यात आधी काय ? असा प्रश्न उपस्थित केला. क्रीडा संस्कृती आधी येते आणि मग धोरण येते असे स्पष्ट करुन त्यांनी यासंदर्भात ऑस्ट्रेलियन क्रिकेटचे उदाहरण दिले. आपल्याकडे क्रिकेटला ग्लॅमर असल्याने बहुतेक पालक आपल्या पाल्यांना क्रिकेट खेळण्यासाठी प्रोत्साहन देतात. एवढ्या सगळ्या मुलांची निवड वरच्या दर्जाच्या संघामध्ये कशी होईल ? पण हे पालक समजून घेत नाहीत, कारण ते क्रिकेटकडे खेळ म्हणून पाहत नाहीत. आज क्रिकेट खेळताना मुलांसमोर पैसा असतो, कमाई असते, त्यामुळे खरे क्रिकेट मरते आहे, अशी खंतही त्यांना बोलून दाखवली.

या चर्चासत्रातील अखेरचे सत्र ग्रँड मास्टर प्रविण ठिपसे यांनी मांडले. त्यांनी अतिशय आग्रहपूर्वक आणि स्पष्टपणे क्रीडा संस्कृतीबद्दलची आपली मते मांडली. आपल्याकडे सरकार जिमखाना किंवा क्लबना भाडेपट्टीवर मैदाने देते. तिथे सर्वसामान्य मुलाला कधीच प्रवेश मिळत नाही. भारतातील क्रीडा संस्कृतीसाठी सर्वाधिक मारक असलेली अशी ही बाब आहे. युरोपीय देशामध्ये ९० ते ९५ टक्के नागरीक वेगवेगळ्या माध्यमातून खेळामध्ये सहभागी असतात. आपल्याकडे हे प्रमाण केवळ दिड ते दोन टक्के आहे, असे त्यांनी दाखवून दिले. शालेय स्तरावर खेळाला प्रोत्साहन देण्यासंदर्भात त्यांनी शिक्षण महर्षि दादा रेगे यांचे उदाहरण दिले तर, शासनाने द्यावयाच्या प्रोत्साहनाबाबत आंध्रप्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांचे उदाहरण दिले. क्रीडा धोरण हे केवळ क्रीडा क्षेत्रातील व्यक्तींच्या विचारविनिमयातूनच तयार व्हावे, त्यावर प्रशासकीय अधिकाऱ्यांचे नियंत्रण नसावे, असेही त्यांनी आवर्जून मांडले.

**व्यवस्था आरोग्याची**

याच चर्चासत्र मालिकेतील आरोग्यविषयक 'व्यवस्था आरोग्याची' हे चर्चासत्र नागपूरला १ नोव्हेंबर २०१५ रोजी पार पडले. नागपूरचे विभागीय अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांनी त्याचे आयोजन केले होते. आपल्या प्रास्ताविकात गांधी यांनी प्रभावी प्रशासनाची गरज मांडली. ते म्हणाले श्री. शरद पवार यांचा हा दृष्टिकोन लक्षात घेऊनच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे नागपूर केंद्र विविध क्षेत्रातील कार्यक्रम आणि उपक्रमांच्या आयोजनामध्ये पुढाकार घेत असते. आरोग्य क्षेत्रातील राष्ट्रीय प्रश्नांपासून स्थानिक पातळीवरील समस्यांचा उहापोह त्यांनी स्वागतपर भाषणात केला.

प्रतिष्ठानचे विश्वस्त डॉ. समीर दलवाई यांनी

प्रास्ताविकपर भाषणात 'सर्वांसाठी आरोग्य म्हणजे केवळ सरकारी दवाखान्यामध्ये औषध उपचारांची सोय करणे नव्हे', असे स्पष्ट केले. आपण जर पोलिओसारख्या आजाराचे उच्चाटन करु शकतो, तर या देशामध्ये आरोग्य सेवेचेही नियोजन होऊ शकते असे ते म्हणाले.

'दैनिक लोकमत'चे संपादक सुरेश द्वादशीवार यांनी 'कुपोषण सगळ्याच क्षेत्रामध्ये आहे. सर्वच क्षेत्रातील दारिद्र्य आणि आजारांकडे लक्ष देणे आवश्यक आहे', असे सांगून आरोग्य क्षेत्रात केवळ रुग्णाला बरे करणे हा दृष्टिकोन योग्य नसून रुग्णच निर्माण होणार नाही, याची काळजी घेणे जास्त आवश्यक असल्याचे सांगितले. समाजात एकारलेपण वाढते आहे आणि हाही एक मानसिक आजार आहे, अशी टिका त्यांनी केली.

महाराष्ट्रात गडचिरोली, नंदूरबार किंवा मेळघाटपेक्षा नागपूरमध्ये कुपोषण जास्त आहे. पण, शहरातील कुपोषणाची चर्चा होत नाही, अशी मांडणी 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी'चे डॉ. सतिश गोगुलवार यांनी केले. कुपोषणावर मात करायची असेल तर ती महिलांच्या माध्यमातूनच होऊ शकते, असे ते म्हणाले. 'जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार जगाला दरवर्षी २५ लाख कोटी रुपयांच्या औषधांची गरज आहे. मात्र यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात औषधे वापरली जातात आणि त्यामुळे आरोग्याला गंभीर धोके संभवतात', अशी धक्कादायक माहिती अन्न व औषध संचालनालयाचे माजी संचालक महेश झगडे यांनी दिली.

महाराष्ट्र हे प्रगतराज्य असले तरी आरोग्य आणि आरोग्य सेवांबाबत मागासलेले राज्य आहे. याबाबतीत महाराष्ट्राचा देशात तिसरा क्रमांक लागतो असे सांगून पुण्याच्या 'जनआरोग्य' चे सहसमन्वयक डॉ. अनंत फडके यांनी सार्वजनिक क्षेत्रांचे सक्षमीकरण झाले पाहिजे अशी भूमिका मांडली. सरकारने आपले औषध धोरण जाहीर करावे, असेही ते 'आरोग्य सेवा-आरोग्य जन चळवळ' या विषयावर बोलताना म्हणाले. डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी आरोग्य शिक्षण क्षेत्राविषयी आपले मत मांडले. या क्षेत्रामध्ये मनुष्यबळ वाढविण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.

सुरुवातीच्या बीजभाषणात डॉ. श्याम अष्टेकर यांनी प्रत्येक व्यक्तीला आरोग्य सेवा देणे हि त्या देशाची जबाबदारी आहे. आरोग्य सेवा हा नागरीकाचा मुलभूत न्यायिक हक्क व्हायला हवा, असे सांगून ते म्हणाले याऐवजी सार्वजनिक आरोग्याच्या मुद्यावरच अधिक भर दिला जातो. हे दुर्दैव आहे. भारतात शेजारील देशातही आरोग्यसेवेसाठी भारतापेक्षा अधिक खर्च केला जातो. पर्यावरणातील बदल लक्षात घेता भारताने आरोग्यसेवेवरील खर्च वाढविण्याची गरज आहे.

**उद्योग**

पुणे येथे १० नोव्हेंबर २०१५ रोजी 'उद्योग' विषयावर चर्चासत्र पार पडले. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रीजने चर्चासत्राच्या स्थानिक नियोजनाची जबाबदारी पार पाडली. 'शासनाचे उद्योगविषयक धोरण' या विषयावर बोलताना श्री. अच्युत देशमुख यांनी राज्य सरकारद्वारे उद्योग वाढीसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. महाराष्ट्राला आज या क्षेत्रात केरळ, तामिळनाडू, गुजराथ या राज्यांशी स्पर्धा करावी लागत असल्याची जाणीव त्यांनी उपस्थितांना दिली.

भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नामध्ये महाराष्ट्राचा वाटा सुमारे १५ टक्के आहे. महाराष्ट्र त्यात आता मागे पडतो आहे, अशी टीका होते. पण, मला तसे वाटत नाही. असे स्पष्ट करून श्री. देशमुख म्हणाले, आपल्याकडील पायाभूत सुविधा अन्य कोणत्याही राज्यापेक्षा चांगली आहे. इथल्या कामगाराची उत्पादकता, तंत्रज्ञ, उपलब्ध तंत्रज्ञान ही महाराष्ट्राची जमेची बाजू आहे. त्यामुळेच परकीय गुंतवणुक आकर्षित करण्यात महाराष्ट्र आघाडीवर असू. २०२५ मध्ये महाराष्ट्राची प्रगती यापेक्षा किती तरी अधिक झालेली असेल, अशी आशाही त्यांनी बोलून दाखवली.

'उद्योग व अर्थकारणाचे महत्व' या विषयावर बोलताना अनिल लांबा यांनी उद्योग चालविताना अर्थकारणाचे महत्त्व अधोरेखित केले. वाईट अर्थकारण चांगल्या उद्योगालाही दिवाळखोरीत नेऊ शकते, एखाद्य राष्ट्रही दिवाळखोरीच्या दिशेने

जाऊ शकते, हे त्यांनी समजावून सांगितले. उद्योग क्षेत्रात पैसा कसा जमवावा याबद्दलचे सविस्तर विवेचन त्यांनी केले. 'कौशल्य विकासातून मनुष्यबळाचा विकास' या विषयाची मांडणी करताना श्री. जे. पी. श्रॉफ यांनी मनुष्यबळ विकासासाठी आवश्यक शिक्षणपध्दतीतील बदल आणि प्रशिक्षकांच्या समस्या या विषयी सविस्तर विवेचन केले. लोकांच्या कौशल्याचा विकास ही उद्योगाची जमेची बाजू ठरेल. अशा पध्दतीने प्रणाली तयार व्हायला हवी असेही ते म्हणाले. राज्याचा औद्योगिक विकास होत असेल तर त्यासाठी कुशल मनुष्यबळाची गरज भासेल. ती सरकारची जबाबदारी ठरते, असेही श्री. श्रॉफ म्हणाले.

'कृषी आधारीत उद्योगांचे भवितव्य' हा विषय मांडताना श्री. यतिन पाटील यांनी महाराष्ट्रातील वाईन उद्योगाची रूपरेखा उपस्थितांसमोर मांडली. या उद्योगासमोरील आव्हाने, कररचनेतील किचकटपणा, सरकारकडून अपेक्षित असलेल्या मदत-सहकार्याचा अभाव त्यांनी मांडला. भारतीय बाजारात होत असलेल्या वाईनच्या पिछेहाटीच्या कारणांची मीमांसाही त्यांनी उपस्थितांसमोर केली. वाईन उद्योगाचा लाभ थेट द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनाच मिळणार असल्याने सरकारने या उद्योगाला प्रोत्साहन देणारे धोरण आखायला हवे. या उद्योगाचा विकास दर २५ ते ३० टक्के झाला तरच आपण या उद्योगामध्ये यशस्वी होऊ, असेही ते म्हणाले.

'औद्योगिक विकासाचे प्रादेशिक आणि सामाजिक संतुलन' या विषयावर बोलताना उद्योजक मिलींद कांबळे यांनी महाराष्ट्रातील सुरक्षित वातावरणाचा गौरवाने उल्लेख केला. महाराष्ट्र हे रोजगार उपलब्ध देणारे राज्य म्हणून देशात ओळखले जाते. महाराष्ट्राला सामाजिक सुधारकांची मोठी परंपरा आहे. त्यामुळे या राज्यातील औद्योगिक विकासाला गती आणि दिशा आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. वर्तमान परिस्थितीतील काही त्रुटींकडे लक्ष वेधून श्री. कांबळे यांनी महाराष्ट्रात उद्योजकतेचे प्रशिक्षण देणारी एकही संस्था महाराष्ट्रात नाही, याबद्दल खंत व्यक्त केली. ख्यातनाम उद्योजक प्रमोद चौधरी यांनी चर्चासत्राच्या सुरवातीला बीजभाषणामध्ये महाराष्ट्रातील औद्योगिक वाढ आणि स्थितीचा सार्थ आढावा घेतला होता.

**शालेय शिक्षण**

'महाराष्ट्र २०१५ : शालेय शिक्षण' या विषयावर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २८ नोव्हेंबर, २०१५ रोजी यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा येथे चर्चासत्र आयोजित करण्यात आले. डॉ. गणेश ठाकूर, सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी उपस्थितांचे स्वागत केले. शिक्षण विकास मंचचे संयोजक दत्ता बाळसराफ यांनी या कार्यक्रमामागची भूमिका विशद करून प्रास्ताविक केले. डॉ. अनिल पाटील, कार्याध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी बीजभाषण केले आणि परिषदेचे उद्घाटन केले. डॉ. वसंत काळपांडे, मुख्य संयोजक, शिक्षण विकास मंच यांनी 'शालेय शिक्षणाचा विस्तार, गुणवत्ता आणि समता' हा विषयावर प्रतिपादन केले.

यापुढील मुख्य सत्राचा विषय होता सत्र 'अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, अध्ययन-अध्यापन आणि मूल्यमापन प्रक्रिया' या विषयावर तीन तज्ज्ञांची व्याख्याने झाली. सुचेता भवाळकर 'अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके' या पैलूवर बोलल्या, तर डॉ. अ. ल. देशमुख 'अध्ययन-अध्यापन आणि मूल्यमापन प्रक्रिया' या विषयावर आणि डॉ. योगेश कुलकर्णी 'शालेय शिक्षणात कौशल्य विकास' या विषयावर बोलले.

दुपारच्या सत्रात डॉ. केशव साठ्ये यांनी 'शालेय शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर' या विषयावर अभ्यासपूर्ण मांडणी केली. 'शिक्षक-प्रशिक्षणाच्या नव्या दिशा' या विषयावर शिक्षण विकास मंचच्या विशेष सल्लागार बसंती रॉय आणि डॉ. दिगंबर दुर्गाडे टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणे यांची सादरीकरण झाली. ही सर्व सादरीकरणे झाल्यानंतर खुली चर्चा आणि प्रश्नोत्तरे झाली. डॉ. वसंत काळपांडे यांनी परिषदेचा समारोप केला. दत्ता बाळसराफ यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बसंती रॉय यांनी केले.

**विज्ञान आणि तंत्रज्ञान :**

मराठी विज्ञान परिषदेचे प्रमुख अ.पां. देशपांडे यांनी

या विषयासंबंधी प्रास्ताविकातून विवेचन केले. या चर्चासत्रामध्ये सहभागी झालेल्या सर्व विषयतज्ज्ञांची ओळखही श्री. देशपांडे यांनी करून दिली. प्रतिष्ठानचे सरचिटणीस शरद काळे यांनी उपस्थितांचे स्वागत करताना 'गहन मुलगामी विज्ञानाचे संशोधन आणि त्याचा रोजच्या जिवनामध्ये होणारा उपयोग यामुळे विज्ञान आणि तंत्रज्ञान अत्यंत निकट असतात', अशी मांडणी केली. विज्ञान हे गहनगंभीर असल्याने थोडे मागे रहाते मात्र तंत्रज्ञान डोळे दिपवून टाकणारे असल्याने त्याचीच चर्चा अधिक होते, असे विश्लेषण केले.

डॉ. एम. एम. शर्मा यांनी आपल्या बीजभाषणामध्ये ब्रिटीशकाळापासून देशात रूजत गेलेल्या विज्ञानतंत्रज्ञानाची माहिती देताना उद्योग क्षेत्रामध्ये त्याचा कसा वापर झाला हे सोदाहरण सांगितले. उच्च दर्जाच्या विज्ञानाशिवाय तंत्रज्ञान सहजसोपे होऊ शकत नाही, असेही ते म्हणाले. डॉ. हेमचंद्र प्रधान यांनी उपस्थितांसमोर वैज्ञानिक दृष्टीकोन म्हणजे काय याची तपशिलवार मांडणी केली. समाजाच्या भल्यासाठी विज्ञानाचा उपयोग घ्यायचा असेल तर नितीशास्त्र आणि विज्ञान यांच्यात सहकार्य आवश्यक आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर करताना सहमतीचे नितीशास्त्र आवश्यक असते, असेही डॉ. प्रधान यांनी सांगितले. समाजहितासाठी वैज्ञानिक विश्लेषणाला सहमतीच्या नितीशास्त्राची, शहाणपणाची आणि सुज्ञतेची जोड द्यावी लागते. जो समाज विज्ञान-तंत्रज्ञानाबरोबरच अशी परिपक्वता आणि सुज्ञता दाखवतो तोच समाज पुढे जातो, असेही डॉ. प्रधान यांनी अतिशय आकर्षकपणे मांडले.

'सौरउर्जा' या विषयावर बोलताना श्री. प्रभाकर देवधर यांनी आजही भारतात ५० कोटी लोकांपर्यंत वीज पोहचलेली नाही, या वास्तवाची जाणिव करून दिली. सौरउर्जेचा भारताने योग्यरीतीने उपयोग केला तर या सर्व वंचितांना वीज मिळेल आणि त्यांच्या जीवनात फरक पडेल असेही श्री. देवधर यांनी आकडेवारीसह सांगितले. नैसर्गिक साधनांची कमतरता, पर्यावरण, आधुनिक तंत्रज्ञान ते भू-संपादन अशा विविध प्रश्नांना सामोरे जात सरकारला कमी खर्चात वीज उत्पदानाचा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा लागतो, असेही त्यांनी बोलण्याच्या ओघात सांगितले.

'विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधन' या विषयाची मांडणी जे. बी. जोशी यांनी केली. जागतिक पातळीवर आघाडीवर नेऊन ठेवेल असे ज्ञान विद्यापिठाने द्यावे, त्यातून जे तंत्रज्ञान निर्माण होईल ते सोपे, स्वस्त आणि सर्व समाजाला उपयुक्त ठरणारे असावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. संशोधनातून येणारे उत्तर सोपे, सगळ्यांना परवडेल असे आणि लोकांपर्यंत पोहोचलेले असणे आवश्यक आहे हे सांगताना त्यांनी त्या संदर्भातील अनेक उदाहरणे उपस्थितांसमोर ठेवली. भारतामध्ये तरूण पिढीला योग्य मार्गदर्शन मिळाले तर ते अवघडातला अवघड प्रश्न सोडवतात. आपल्या चाळीस वर्षाच्या संशोधनाच्या कारकिर्दीमध्ये आपण एकही प्रश्न अनुत्तरीत ठेवलेला नाही, असे त्यांनी आवर्जुन सांगितले.

'विज्ञान आणि शिक्षण' या विषयावर बोलताना सुधीर पानसे यांनी विज्ञान शिक्षणाचे महत्व विषद केले. विज्ञान शिक्षणाची भारतात झालेली सुरवात, त्यातील महाराष्ट्राचे स्थान आणि आताची स्थिती याचा सुंदर विवेचन त्यांनी केले. शिक्षण हा आशेचा एकमेव तंतू आहे. पण सध्या 'शिक्षणसम्राटां'द्वारे होत असलेली वाताहात, हजारोंनी निघालेल्या संस्था आणि शेकडो विद्यापीठे यातून सकस शिक्षणाबाबत चिंता निर्माण झाली आहे, असे ते म्हणाले.

'पुढील दहा वर्षातील दिशा दर्शन' या विषयावर बोलताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ बाळ फोंडके यांनी आज वेगवेगळ्या क्षेत्रात असलेली प्रगती आणि मरगळीची स्थिती उपस्थितांसमोर मांडली. वैचारिक असहिष्णूता, भारनियमन, विकासविरोधी मानसिकता, आत्मकेंद्री विचार, शिक्षणाची पिछेहाट, राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि नैतिक अहंकार या वैगुण्यावर मात करण्यासाठी राष्ट्रीय आत्मपरिक्षणाची वेळ येऊन ठेपली आहे. ते केले, तरच 'महाराष्ट्र २०२५' चे स्वप्न आपण पाहू शकू, असे ते म्हणाले.

श्री. हेमंत लागवणकर यांनी 'देशी साधनांचा वापर' या विषयावर मार्गदर्शन करताना जे लौकीक अर्थाने शास्त्रज्ञ नाहीत अशा सामान्य माणसांनी केलेल्या संशोधनाचे दर्शन

उपस्थितांना घडविले. समाजात असलेल्या अशा धडपड्या व्यक्तींच्या कामाला प्रोत्साहन देण्याची गरज आहे. दैनंदिन जीवनातल्या समस्या सोडवितानाच हे संशोधक जन्माला येतात. त्यांच्या कल्पकतेचा वापर समाजाने आणि सरकारने करून घेतला पाहिजे, असे श्री. लागवणकर यांनी आग्रहपूर्वक सांगितले.

**देवस्थान न्यासांची जबाबदारी**

महाराष्ट्रामध्ये आज मोठी उलाढाल असलेले सार्वजनिक देवस्थान विश्वस्त न्यास आहेत. आपल्याकडील देणग्यांचा उपयोग हे न्यास विविध समाजोपयोगी कामांसाठी करत असतात. त्यामध्ये करूणेचा भाग अधिक असतो. या सार्वजनिक न्यासांकडे असलेल्या निधीतून अधिक उपयोगी समाज उपयोगी कामे सुरू करता येतील का, यावर विचारमंथन करण्यासाठी शेगाव येथील गजानन महाराज विश्वस्त न्यासाच्या मदतीने २० सप्टेंबर २०१५ रोजी चर्चासत्र पार पडले.

विविध धर्मिय आणि उपासनांच्या न्यासांच्या रचना, कार्य याबरोबरच चर्चासत्रामध्ये विविध धर्म कल्पना, त्यातील साम्य याविषयीही साहजिकच चर्चा झाली. या चर्चासत्राच्या बीजभाषणामध्ये श्री. अभय टिळक यांनी देवस्थान न्यासांची सामाजिक जबाबदारी सांगताना नैतिकता, चारित्र्य आणि प्रामाणिकपणा या दैवी भांडवलाविषयी कुणाच्याही मनात शंका असू नये, अशी अपेक्षा व्यक्त केली. या कार्याला क्षमता आणि नेटवर्किंगची गरज आहे. देवस्थानांनी आजवर सेवेचा जो भाविककेंद्री दृष्टीकोन ठेवला होता तो यापुढील काळात विस्तारावा लागेल. कारण, या क्षेत्रामध्ये देवस्थानांशिवाय कार्य करणारे आणखी कोणी नाही हे स्पष्ट केले. देवस्थानांकडे पैसा, बुद्धिमत्ता, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापनाचे जे संचयन आहे त्याचे अधिक योग्य संचलन होण्याची गरज त्यांनी स्पष्ट केली आणि शेगाव मध्ये जी दृष्टी दिसते, तशी इतरत्रही दिसावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी विविध धर्मप्रवाहातील उपासना, प्रवृत्ती आणि निवृत्ती मार्गाचा थोडक्यात आढावा घेतला. पाश्चिमात्यांची यंत्रसंस्कृती आणि भारतीयांची मंत्रसंस्कृती यांची तुलना त्यांनी केली. पाश्चात्यांचा प्रवृत्तीमार्ग आणि भारतीयांचा निवृत्तीमार्गाची तुलना करून पाश्चिमात्य अंतराळाचा तर भारतीय अंतरंगाचा शोध कसा घेतात, हे त्यांनी सांगितले. उद्याची भारतीय देवस्थाने कशी असावीत याचे शेगाव हे मॉडेल असल्याचे सांगून फादर दिब्रिटो म्हणाले ख्रिश्चन धर्मात सामाजिकतेशिवाय धर्माचा विचार होऊ शकत नाही. येत्या दशकाचा विचार करताना जागतिकीकरणाच्या आव्हानाला आपल्याला तोंड द्यावे लागेल.

पीर मकदूम साहेब अली माहिम दर्ग्याचे विश्वस्त नूर परकार यांनी दर्ग्याच्या माध्यमातून होणाऱ्या सामाजिक आणि धार्मिक ऐक्याची अनेक उदाहरणे दिली. या दर्ग्याच्या विश्वस्त न्यासाच्या माध्यमातून सर्व धर्मियांसाठी होणाऱ्या वैद्यकिय तसेच शैक्षणिक मदतीची माहितीही त्यांनी दिली. शेगावच्या श्री गजानन महाराज न्यासाचे प्रमुख शिवशंकर पाटील यांनी सर्व उपस्थितांचे सुरूवातीला स्वागत केले. श्री. सुदर्शन जैन यांनी जैन धर्मियांचे सामाजिक न्यास याबद्दल माहिती दिली. श्री संत तुकडोजी महाराज देवस्थान तसेच कागल येथील श्री काडसिध्देश्वर स्वामी मठाच्या प्रतिनिधीसह महाराष्ट्रातील बहुतेक सर्व प्रमुख न्यासांनी आपले प्रतिनिधी आवर्जुन पाठवले होते.

★★★

# नवमहाराष्ट्र युवा अभियान
## कार्यवृत्त

नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे काम संयोजक दत्ता बाळसराफ, सहसंयोजक विश्वास ठाकूर, संघटक निलेश राऊत हे पाहतात. विजय कान्हेकर आणि वैशाली मोटे समन्वयक आहेत, तर कार्यालयिन संघटक म्हणून सुरेश पाटील व सहाय्यक म्हणून मिनल सावंत, निलेश पुराडकर, रमेश मोरे, महेश साळवी हे काम पाहतात.

**जागर जाणिवांचा ...**

**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम**

सोमवार, दिनांक ४ जानेवारी २०१६ रोजी सकाळी नवमहाराष्ट्र युवा अभियान मुंबईच्यावतीने नाडकर्णी पार्क कल्याण केंद्र बी.पी.टी. वडाळा (पूर्व), मुंबई येथे बाल विकास प्रकल्प वडाळा-शिवडी विभाग यांच्या सहभागाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने 'जागर हा जाणिवांचा ... तुमच्या माझ्या लेकींचा' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास प्रा. डॉ. प्रभा तीरमारे (कॉलेज ऑफ सोशल वर्क, निर्मला निकेतन) या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात श्री. सुरज भोईर यांनी सावित्रीबाईंच्या गौरवार्थ ओव्यांचे गायन करुन केली. श्री. चंद्रशेखर भावसार (कल्याण अधिकारी, बी.पी.टी.) यांनी स्वागतपर भाषण करुन कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. श्री. प्रसाद मिरकले (बालविकास प्रकल्पाचे अधिकारी) यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य व्यक्त करुन बालविकास प्रकल्पातील अंगणवाडी सेविकांना या कार्यक्रमामध्ये समाविष्ट करुन घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले. यानंतर श्री. दत्ता बाळसराफ (कार्यक्रम संयोजक) यांनी 'जागर जाणिवांचा ...' या उपक्रमाबाबत सहभागींना माहिती देत, स्त्री-भ्रूण हत्या रोखण्यासाठी प्रतिष्ठानने केलेल्या कामाची व त्यात मिळालेल्या यशाचीही कल्पना दिली. विदर्भात शेतकऱ्यांनी इतक्या आत्महत्या केल्या पण त्यांच्या एकही पत्नींनी मात्र आत्महत्या केली नसल्याचे निदर्शनास आणून देत, स्त्रीमध्ये असलेल्या गुणांची स्त्रीयांनाच ओळख करुन दिली. त्याच्यामधील क्षमता पुन्हा एकदा त्यांच्यासमोरच श्री. दत्ता बाळसराफ यांनी मांडल्या.

यानंतर डॉ. अमोल लगड (सर जे. जे. समूह रुग्णालय) यांनी आरोग्य संदर्भात व श्री. तानाजी गायकवाड (वसाहत निरीक्षक बी.पी.टी. वडाळा) यांनी उपस्थित महिला व युवतींना समयोजित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अखेरीच्या सत्रात प्रा. प्रभा तीरमारे यांनी स्वाभिमान, समानता, सामंजस्य यांचा मेळ घालत उपस्थित महिलांशी संवाद साधला व मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक, स्वागत व सूत्रसंचलन श्री. विजय कसबे यांनी केले, तर संगीता खरात यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालविकास प्रकल्पाच्या मुख्यसेविका श्रीमती सोनाली गावडे, श्रीमती वागळे, श्रीमती कर्वे यांनी विशेष परिश्रम घेतले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने उमाकांत जगदाळे, अभिजीत देशमुख, रमेश मोरे, रमेश सांगळे, वृषाली जोशी, महेश साळवी आदींनी मनापासून कष्ट घेतले. तसेच श्रीमती निर्मला कसबे यांनी एकूणच कार्यक्रमाची रुपरेखा ठरवण्यात मोठा सहभाग दिला. सदर कार्यक्रमात सुमारे २५० महिला उपस्थित होत्या.

**यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार २०१५**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या नवमहाराष्ट्र युवा

अभियानातर्फे दरवर्षी दिल्या जाणाऱ्या 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक व क्रीडा पुरस्कार २०१५' वितरीत करण्यात आले. महाराष्ट्रातील उत्कृष्ट खेळाडूंच्या कार्याचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा आणि प्रोत्साहन मिळावे हे या क्रीडा पुरस्काराचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी युवा आंदोलनाच्या क्षेत्रात विधायक व रचनात्मक काम करणाऱ्या युवक-युवतींना हा पुरस्कार देण्यात येतो. पुरस्काराचे यंदाचे सतरावे वर्ष आहे. सदरील पुरस्कारांचे वितरण 'राष्ट्रीय युवा दिनी' मंगळवार, दि. १२ जानेवारी २०१६ रोजी मत्स्योदरी महाविद्यालय, जालना येथे नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या निमंत्रक खा. सुप्रिया सुळे, आ. राजेश टोपे, मा. नंदकिशोर कागलीवाल, कार्यक्रम संयोजक दत्ता बाळसराफ यांच्या प्रमुख उपस्थितित करण्यात आले.

२०१५ सालचा 'यशवंतराव चव्हाण विशेष युवा क्रीडा पुरस्कार' टेनिस या खेळामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टेनिसपटू प्रार्थना ठोंबरे, सोलापूर (टेनिस) यांना प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे स्वरुप ५१ हजार रुपये रोख, सन्मानपत्र असे होते. या वर्षीचा 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा क्रिडा पुरस्कार-युवक व युवती' क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल श्रीहरी तपकीर, पुणे (गिर्यारोहण) व स्नेहा भगत, पुणे (व्हॉलीबॉल) यांना तर सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सजल कुळकर्णी, नागपूर (महाराष्ट्र जीवन बँक-स्थानिक गुरांच्या वाणांचे संवर्धन) व मुमताज शेख, मुंबई (राईट टू पी चळवळ) यांना 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक पुरस्कार - युवक व युवती' देऊन सन्मानित करण्यात आले. सामाजिक व क्रीडा युवा पुरस्कारांचे स्वरुप प्रत्येकी २१ हजार रु. रोख सन्मानपत्र असे होते.

यासोबतच प्रतिष्ठानच्यावतीने घेण्यात आलेल्या यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेच्या विजेत्यांनाही पुरस्कार देण्यात आले. यात कन्नुवार कला, रतनलाल काबरा विज्ञान आणि बी.आर.मंत्री वाणिज्य महाविद्यालय, मानवत, परभणी यांच्या 'मानवता' या नियतकालिकास प्रथम पुरस्कार मिळाला. या पुरस्काराचे स्वरुप रु. १० हजार रोख, प्रमाणपत्र असे होते. अण्णासाहेब आवटे आर्टस्, कॉमर्स, हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज व सौ. कुसुमाबेन कांतिलाल शाह आर्टस्, कॉमर्स, सायन्स ज्युनिअर कॉलेज, मंचर, जि. पुणे यांच्या 'शिवनेरी' नियतकालिकास द्वितीय पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्काराचे स्वरुप रु. ७ हजार रोख, प्रमाणपत्र असे होते. अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, काटोल, नागपूर यांच्या 'दृष्टीक्षेप' नियतकालिकास तृतीय पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्काराचे स्वरुप रु. ५ हजार रोख, प्रमाणपत्र असे होते. तर कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर यांच्या 'कर्मवीर', श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजुरा, जि. चंद्रपूर यांच्या 'यशश्री' व कोल्हापूर इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नोलॉजी कॉलेज ऑफ इंजिनियरींग, कोल्हापूर यांच्या 'टेक्निकल - २०१५' नियतकालिकांस उत्तेजनार्थ पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्काराचे स्वरुप प्रत्येकी रु. ३ हजार रोख, प्रमाणपत्र असे होते.

यावेळी पुरस्कारार्थींनी जिद्द व आई-वडिलांच्या पाठबळावरच यशोशिखर गाठल्याची प्रांजळ कबुली दिली. पुणे जिल्ह्यातील चऱ्होळी गावातील शेतकरी कुटूंबातच पुढे आलेल्या श्रीहरी तापकीर या युवकाने थेट माऊंट एव्हरेस्ट सर करुन महाराष्ट्राचे नाव देशात नव्हे तर जगात उंचावले. निश्चय व जिद्द असल्यास काहीही शक्य होते. मोहिमेस २० लाखांचा खर्च आल्याचे सांगून एव्हरेस्टच्या इतिहासात आपली गिर्यारोहक म्हणून नोंद झाल्याचे सांगितले. गिर्यारोहण व आपत्ती व्यवस्थापनात सध्या ते कार्य करीत आहेत. गिर्यारोहणाचा शालेय अभ्यासक्रमात समावेश व्हावा यासाठी त्यांचा पाठपुरावा सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबई येथील मुमताज शेख यांनी स्त्री-पुरुष समानता व राईट टू पी चळवळीबाब आपले मत व्यक्त केले. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतागृहे असलीच पाहिजे असे त्यांनी नमूद केले.

ह्या चळवळीमुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागल्याचे त्यांनी सांगितले. स्वच्छतागृहाअभावी सार्वजनिक ठिकाणी महिलांची कुचंबना होत असल्यामुळे राईट टू पी चळवळीला गती आल्याचे सांगितले.

सजल कुलकर्णी म्हणाले, बालपणापासूनच पाळीव प्राण्यांवर त्यांचे प्रेम होते. आई-वडिलांनाही यासाठी प्रोत्साहन दिले. यातूनच देशी वाण संशोधन कार्यालयात गती मिळाली. मोठे संशोधन करु शकलो. या पुरस्कारातून मिळालेली रक्कम ग्रंथालय तसेच संशोधन संस्थेला देणार असल्याचे सजल यांनी सांगितले.

पाचही पुरस्कार्थींचे आई-वडिल तर आलेच होते शिवाय दोन पुरस्कारार्थींचे आजोबाही हा सोहळा पाहण्यासाठी आवर्जून उपस्थित होते. त्यांना आपल्या मुलांचे, नातवांचे कौतुक याची देही डोळा पाहिले. पुरस्कारर्थींसह सर्वांनीच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे आभार मानले.

## हेच शब्द ओठी...

नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि रंगस्वर यांच्यावतीने महाराष्ट्राचे, महाराष्ट्र भूषण, लोकप्रिय कवी आणि गीतकार दिवंगत मा. मंगेश पाडगावकर, यांच्या स्मृतीला आदरांजली वाहण्यासाठी त्यांनी लिहिलेल्या कवितांच्या वाचनाचा ''हेच शब्द ओठी'' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. रंगस्वरच्या वतीने रविवार दिनांक ७ फेब्रुवारी सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या, रंगस्वर सभागृहमध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमात पाडगांवकरांच्या परिचित असलेल्या व काही अपरिचित अशा कवितांचे वाचन मा. हेमंत टकले, मा. मानसी कुलकर्णी, मा. अस्मिता मोहिते आणि मा. दत्ता बाळसराफ ह्या मान्यवरांनी सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जेष्ठ पत्रकार, साहित्यिक मा. अंबरीष मिश्र यांनी केले. यावेळी प्रतिष्ठानचे सरचिटणीस मा. शरद काळे व इतर मान्यवर उपस्थित होते.

मंगेश पाडगावकरांच्या विविध पैलूंवर आधारीत कवितांचे वाचनाने रसिक भारावून गेले होते. भटके पक्षी, उत्साह, तुझे गीत गाण्यासाठी, त्रिवेणी, नवा दिवस, बोलगाणी, सूर आनंदघन तसेच अखेरची वही, अश्या वेगवेगळ्या विषयांवर आधारीत कवितांचे वाचन करण्यात आले. कवितेच्या वाचनासोबतच मा. हेमंत टकले यांनी मा. वसंत बापट, मा. कुसुमाग्रज, मा. पु. ल. देशपांडे तसेच मा. मंगेश पाडगांवकरांच्या आठवणींना उजाळा दिला. मा. अस्मिता मोहिते यांनी मंगेश पाडगांवकरांच्या बालपणावर आधारीत १९५४ ते १९६४ दरम्यान प्रकाशित झालेल्या 'पेन्सिल' या गद्यलेखनाचे वाचन केले ज्यामधून त्यांच्या बालपणातील अनेकानेक पैलूंच्या छटा दिसून आल्या. या कार्यक्रमासाठी १८० जण उपस्थित होते.

## युवा कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाणसाहेबांचे विचार व कार्यातून प्रेरणा घेऊन प्रगतीशील व समतावादी महाराष्ट्र घडविण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई गेली ३० वर्षे सतत प्रयत्नशील आहे. समाजापुढील महत्त्वाच्या मुद्यांवर साकल्याने विचार करता यावा याकरीता प्रतिष्ठानने चर्चेचे व्यासपीठ अनेक क्षेत्रात उपलब्ध करुन दिले आहे. महाराष्ट्राच्या जन-माणसाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या प्रश्नांचा वेध घ्यावा आणि सामाजिक कार्य करणारी माणसे तयार व्हावीत या भूमिकेतून नवमहाराष्ट्र युवा अभियानतर्फे राज्यभर विविध कार्यक्रम राबविले जातात.

नव्या तरुण पिढीतून नवे कार्यकर्ते घडावे याकरीता नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या वतीने 'युवा कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर' भिवपुरी रोड, ता. कर्जत, जि. रायगड येथील यादवराव तासगावकर इंजिनिअरींग कॉलेज येथे आयोजित करण्यात आले होते. दि. २३ व २४ जानेवारी २०१६ रोजी हे पार पडलेल्या या दोन दिवसीय निवासी शिबीरामध्ये रायगड, ठाणे, पालघर, मुंबई येथून सुमारे ८० कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**दिवस पहिला - २३ जानेवारी २०१६**

सदर शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी कर्जत शहराचे नगराध्यक्ष मा. राजेश लाड तसेच कर्जत मधील मान्यवर श्रीमती हिराताई दुबे, मा. सागरजी शेळके, मा. कैलासजी घारे, मा. काशिनाथजी पाटील उपस्थित होते. मान्यवरांनी सहभागींना मार्गदर्शन करीत कर्जत विभागात असे शिबिर पार पडत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच त्यांच्या विभागातील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे राबविण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमास त्याचे सहकार्य नक्कीच लाभेल अशी ग्वाहीही दिली.

शिबिराच्या पहिल्या सत्रात श्री. उमेश खाडे यांनी प्रेरणादायक गाण्यांनी सुरुवात करुन नंतर खेळकर वातावरणात सर्व सहभागींचे परस्पर परिचयाचे सोपस्कर पार पाडले. सर्वच सहभागींनी यात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

दुसरे सत्र 'सामाजिक कार्यात सोशल मिडियाचा वापर' या विषयावर पार पडले. सत्रास लाभलेले वक्ते श्री. पराग पाटील यांनी उपस्थित सहभागींना मार्गदर्शन केले. सोशल मिडियाचे फेसबुक, What's App, Twitter इ. विविध विभागांची ओळख उपस्थितांना करुन देत सोप्या सरळ व जनसामान्यांपर्यंत कसा संदेश पोहचवता येईल याबद्दल अत्यंत चांगल्या रीतीने मार्गदर्शन केले.

**दि. २४ जानेवारी २००९**

नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि अपंग कल्याणकारी संस्था, अर्नाळा यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. २४ जानेवारी २००९ रोजी अपंगासाठी वैद्यकीय दाखला शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरात १६० अपंग व्यक्तींसाठी प्रवेश असल्या कारणाने १६० जणांनीच याचा लाभ घेतला. अपंगांचा वैद्यकीय दाखला आणि जिल्हा सामान्य रुग्णालयाच्यावतीने अस्थिशल्य चिकित्सक डॉ. अनिल चव्हाण यांनी अपंगांची तपासणी करुन दिली. त्यांना कुळगाव बदलापूर नगरपरिषदेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश अंकुश यांनी सहकार्य केले. या शिबिराचे आयोजन श्री. शमीम खान यांनी केले होते. जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे अधिक्षक विलास सालोडकर, ग्रामविकास अधिकारी नितीन पवार, उपसरपंच भरत भोईर, माजी सरपंच देवराम भोईर, वसई प्रगती संस्थेचे रामचंद्र भोईर, वसई बहुजन महासंघाचे सुरेश तसेच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, नवमहाराष्ट्र युवा अभियानचे अनिल चाळके यांनी मार्गदर्शन केले.

हे शिबिर अर्नाळा ग्रामपंचायतीच्या सभागृहात सकाळी ११ ते ३ या वेळात घेण्यात आले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी भंडारे, रविंद्र पर्डिकर, हेमंत कोळी यांनी मोलाचे सहकार्य केले. मान्यवर आणि कार्यकर्त्यांना 'सह्याद्रीचे वारे' या पुस्तकाच्या प्रती सप्रेम भेट म्हणून देण्यात आल्या.

**यशवंत युवा फेलोशिप**

घसरलेली शैक्षणिक गुणवत्ता, अपुऱ्या शैक्षणिक सोयीसुविधा, शाळा गळतीचे वाढते प्रमाण, विद्यार्थी आत्महत्या, व्यावसायिक कौशल्याचा अभाव, वाढती बेरोजगारी, ढासळलेले शारीरीक व मानसिक आरोग्य, अपुऱ्या आरोग्य सुविधा, शेतकरी आत्महत्या, शेतीमालाला न मिळणारा भाव, वाढती रासायनिक शेती, नष्ट होत चाललेली जैवविविधता, वाढते तापमान, पाणी व विजेचा अनावश्यक वापर, वाढती व्यसनाधीनता जातीयता अशा एक ना अनेक समस्यांना अनेक सामाजिक संस्था, संघटना आपापल्या परीने उत्तरे शोधत आहेत. या संस्था संघटनेबरोबरच काही नव्या दमाचे युवकदेखील स्पर्धात्मक जगाच्या चाकोरीतून बाहेर पडून आपापल्या परीने धडपड करीत आहेत. खऱ्या अर्थाने सामाजिक बदलांची धुरा सांभाळणाऱ्या या युवांना आर्थिक सक्षम करण्यासाठी पुरेसे ज्ञान, आर्थिक पाठबळ व योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. युवांची ही गरज ओळखून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या वतीने यशवंत युवा फेलोशिप २०१० पासून सुरु करण्यात आली आहे.

समाजाला भेडसावणाऱ्या प्रश्नांवर मात करण्यासाठी

सामाजिक क्षेत्रात रचनात्मक कार्य सुरु केलेल्या युवांना मार्गदर्शन, आर्थिक पाठबळ व प्रोत्साहन देणे हा यशवंत युवा फेलोशिपचा उद्देश आहे.

**कार्यरत फेलो**

**१. श्री. सिध्दार्थ खरात -**

सामाजिक क्षेत्रामध्ये स्वयंसेवक म्हणून गेली अनेक वर्षे कार्यरत. दलित इलेक्शन वॉच व एस.सी./एस.टी. सबप्लॅन अमंलबजावणीकरीता काम, बांधकाम मजदूर सभा, महाराष्ट्र या संघटनेचे नितीन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सातारा जिल्ह्यातील ११ पैकी ८ तालुक्यातील असंघटीत कामगारासोबत काम सुरु आहे. असंघटीत कामगारांत त्यांचे हक्क आणि शोषणाबाबत प्रबोधन करणे, तसेच त्यांच्या न्यायिक आणि मुलभूत प्रश्नांवर काम.

**२. श्री. अमोल काटकर**

मौजे किरकसाल या गावी आदर्श गाव योजनेमध्ये डॉ. अविनाश पोळ आणि श्री. पोपटराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत. फेलोशिपच्या माध्यमातून वृक्षारोपण, जलसंधारण, मृदुसंधारण याबाबत जनजागृती करणे, किमान कौशल्यावर आधारीत व्यावसायिक शिक्षण क्षेत्रात कार्य व प्रसार, ग्रामीण भागातील नागरीकांचे स्थलांतर थांबविण्यासाठी संस्थात्मक कामे उभी करणे. याशिवाय आदर्श गाव निर्मितीसाठी विविध उपक्रम राबविण्याचा मानस. मौजे किरसाल या गावचा महाराष्ट्र शासनाच्या आदर्श गाव योजनेत समावेश होण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान.

**३. कु. अमृता ढगे**

'आनंदनिकेतन' या नाशिकमधल्या प्रयोगशील शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत. 'आनंदनिकेतन' या शाळेची प्रयोगशील शिक्षण पध्दती समजून घेऊन सर्जनशील काम करण्यासाठी फेलोशिपच्या माध्यमातून काम करीत आहे.

## वाहतूक सुरक्षा अभियान

**दिनांक : १२ जानेवारी २०१६**

११ जानेवारी ते २५ जानेवारी दरम्यान महाराष्ट्रभर "रस्ता सुरक्षा अभियान २०१६" राबविण्यात आले. या अंतर्गत नवमहाराष्ट्र युवा अभियान व विभागीय परिवहन कार्यालय, अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ते अपघात या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर चर्चासत्र पार्ले टिळक विद्यालय, विले-पार्ले येथे दुपारी ११.०० ते १.०० या वेळेत पार पडले. या प्रसंगी टिळक महाविद्यालयाचे प्राचार्या श्रीमती गजगौरी करंडे, अंधेरी विभागीय परिवहन अधिकारी श्रीमती सोनाली सोनार, प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ तसेच इतर मान्यवर व विभागीय परिवहन अधिकारी उपस्थित होते. पार्ले टिळक विद्यालयातील सुमारे ३०० विद्यार्थींनी या चर्चासत्रात सहभागी झाले होते.

रस्ते अपघात ही एक आता गंभीर समस्या बनत असून समाज म्हणावा तितका त्याबाबत संवेदनशील अजून होत नाही अशी भावना टिळक विद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडताना व्यक्त केली. आर्थिक सुबत्ता व मुलांचाही हट्ट यामुळे विद्यार्थी दशेतच शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडे वाहन उपलब्ध होत आहे. त्यामुळे रस्ता सुरक्षा या विषयावर गंभीरपूर्वक विचार करून विद्यार्थी दशेतच काही संस्कार विद्यार्थांच्या मनावर बिंबवण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रस्ते अपघात कमी करण्यासाठी अशा प्रबोधन शिबिरांची गरज असल्याचे सांगत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईतर्फे करण्यात येणाऱ्या या कामाबद्दल त्यांनी आंनदही व्यक्त केला.

यांनंतर श्रीमती सोनाली सोनार यांनी जर वाहतूक नियमांचे काटेकोर पालन केले तर रस्ते अपघातांचे प्रमाण खूप प्रमाणात कमी होवू शकते असे प्रतिपादन केले. वेगावर नियंत्रण हि एक महत्वाची गरज असून याकरीता प्रत्येक चालकामध्ये एक स्वयंशिस्तता असली पाहिजे असे त्यांनी सूचित केले.

यानंतर प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक मा. दत्ता

बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईची भूमिका सर्वासमोर मांडली. महराष्ट्रात वर्षभरात सुमारे १५,००० लोक रस्ते अपघातात मृत्यूमुखी पडतात व त्याहूनही अधिक कायमचे अपंग होतात आणि यात तरुणांचे (वय २५ ते ४५) प्रमाण जास्त असते हे नमूद करत सर्वानीच या विषयाबाबत अधिक संवेदनशील होण्याचे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले. तसेच आज जवळ-जवळ सर्वच घरात किमान एक तरी वाहन आहे. एरवी पालक पाल्याला धडे देतात पण रस्ते सुरक्षा या विषयावर आपण विद्यार्थ्यांचे चांगल्या रीतीने प्रबोधन केले तर ते याबाबत आपल्या पालकांना नक्कीच धडे देवू शकतील आणि पालकही अन्य कोणापेक्षाही वा नियमापेक्षा आपल्या पाल्याचेच जास्त गंभीरतेने ऐकतील असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यानंतर अन्य काही अधिका-यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करत रस्ता सुरक्षा या विषयासंदर्भात मार्गदर्शन केले व नियमही समजावून सांगितले आणि ते इतरांबरोबर शेअर करण्यास सांगितले.

नवमहाराष्ट्र युवा अभियानतर्फे कार्यक्रमाचे आयोजन श्री. सुरज चव्हाण यांनी केले होते. मीनल सावंत, रमेश मोरे, राकेश कांबळे, उमाकांत जगदाळे, विजय कसबे, महेश साळवी याचे त्यांना सहकार्य लाभले.

### रस्ता सुरक्षा मार्गदर्शन आणि आरोग्य तपासणी शिबिर

दिनांक : १५ जानेवारी २०१६

नवमहाराष्ट्र युवा अभियान व विभागीय परिवहन कार्यालय, अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमाने वाहन चालकांसाठी एक दिवसीय 'रस्ता सुरक्षा मार्गदर्शन आणि आरोग्य तपासणी शिबिर' दि. १५ जानेवारी २०१६ रोजी आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिर विभागीय परिवहन कार्यालय अंधेरी येथे पार पडले. या प्रसंगी अंधेरी विभागीय परिवहन अधिकारी श्री. विश्वंभर शिंदे. प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, विभागातील मोटर ट्रेनिंग शाळांचे संचालक, तसेच इतर मान्यवर व विभागीय परिवहन अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन श्री. विश्वंभर शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यांनी उपस्थित नवीन वाहन चालकांना अपघात रोखण्यासाठी चालकांनी स्वकर्तव्याचे कसे पालन केले पाहिजे याबाबत अतिशय चांगल्या रीतीने मार्गदर्शन केले. यानंतर जनजागृतीपर एक पथनाटय सादर करण्यात आले. प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ यांनी रस्ते अपघाताचा आलेख नवीन वर्षात वाढतच चालला असल्याचे सांगत यावर आवर घालण्यासाठी नक्कीच एक मोठे राज्यव्यापी अभियानाची गरज असल्याचे नमूद केले. वाहन चालकांचा जरासा निष्काळजीपणा कसा इतर निरपराधजणांचे बळी किंवा कायमचे अपंगत्व देऊन त्यांच्या कुटुंबावर एक प्रकारे आघातच करतो, हे विषद करत वाहन चालकांनी कसे जबाबदारीने व सावधानतेने ड्रायव्हिंग केले पाहिजे हे स्पष्ट केले.

उद्घाटन कार्यक्रमानंतर वाहनचालकांसाठी मोफत अयोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. यात वाहन चालकांची मधुमेह, नेत्र व रक्तदाब तपासणी करण्यात आली व त्यानुसार त्यांना आरोग्यासंदर्भात पुढील मार्गदर्शन करण्यात आले. सदर तपासणी शिबिराचा सुमारे ३०० जणांनी लाभ घेतला. याच दरम्यान परिवहन कार्यालयाच्या पटांगणात पथनाट्य कलाकारांनी आपले रस्ता सुरक्षा विषयक पथनाट्य सादर करत जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.

नवमहाराष्ट्र युवा अभियानतर्फे कार्यक्रमाचे आयोजन श्री. सुरज चव्हाण यांनी केले होते. श्रीमती मीनल सावंत, श्री. रमेश मोरे, श्री. महेश साळवी याचे त्यांना सहकार्य लाभले.



## यशवंतराव चव्हाण युवा सामाजिक पुरस्कार २०१५ (युवक)

# सन्मानपत्र

**• सजल सुरेश कुळकर्णी •**

आपला जन्म नागपूरचा, श्रीमती प्राजक्ता व श्री. सुरेश कुळकर्णी यांच्या पोटी जन्मलेले आपण संबंध समाजासाठी आदर्श ठरत आहात. बालपणापासूनच पाळीव प्राण्यांबद्दलचे प्रेम पुढे जाऊन आपले ध्येय बनले. पदवीचा अभ्यास करीत असताना 'निर्माण' मधील आपला प्रवेश आपणास दिशा दर्शक ठरला आणि आपल्या कर्तृत्वाला आकार मिळत गेला.

नागपूर विद्यापीठातून बी.एससी उत्तीर्ण झाल्यानंतर आपण निर्माणद्वारे मिळालेल्या फेलोशिपमध्ये 'बायफ' या संस्थेत ''बायोटेक्नॉलॉजीचा उपयोग करुन संकरीत जनावरांच्या पैदाशीसाठी प्रयत्न' या विषयावर अत्यंत महत्त्वपूर्ण असे संशोधन केले. पुण्यात जैव विविधतेतील पदव्युत्तर शिक्षण घेत असतांना, विदर्भातील 'गावरान' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गायींवरचा आपला सखोल अभ्यास गावरान वाण वाचवणे, वाढवणे याकरीता मोलाचे कार्य करुन घेण्यास उपयुक्त ठरला. आदिवासी, गोवारी, कोमटी यांचे परंपरागत पशूधन कोणते, त्यांची दुधाची व शेतीत काम करण्याची क्षमता यावर सखोल अभ्यास करुन आपण शोध निबंध लिहिला, ज्याची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नोंद घेतली गेली. सध्या विदर्भातील गोंड, नंदागौळी, गोलकार या पशूपालक जमातींबरोबर पशू संवर्धन व विकास यावर आपले कार्य सुरु आहे. 'पारंपारीक वनस्पती व त्यांचा जनावरांच्या आजारामध्ये उपयोग' यावरील आपला शोध निबंध सध्या चर्चेत आहेत. 'प्रयास' या पुण्यातील संस्थेबरोबर २०१२ साली, शासनाच्या केळकर समितीकरीता 'विदर्भातील असमतोल आणि विकास' यावर आपण अभ्यासपूर्ण अहवाल सादर केला. सध्या आपण 'बायफ' संस्थेमध्ये संशोधन अधिकारी या पदावर कार्य करीत आहात. 'महाराष्ट्र जिन बँक' या प्रकल्पात स्थानिक गुरांच्या वाणाचे संवर्धन हे आपले कार्य संपूर्ण राज्यभरात सुरु आहे.

आपल्या ज्ञानाचा उपयोग सुदृढ व निकोप समाज निर्मितीसाठी व पर्यायाने स्थानिक वाणांचे संवर्धन करण्यासाठी आपण करत आहात. पशू पालकांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचविण्याकरीता आपण सातत्याने कार्यरत आहात. शेतकरी, कष्टकरी व आर्थिक दुर्बल घटकांतील लोकांशी होणारा आपला सततचा संवाद, यामुळे आपल्या कार्यास सातत्याने ऊर्जा मिळत आहे. आपल्या कार्याची दखल 'सकाळ' सह 'तरुण भारत', 'लोकसत्ता' यांसारख्या नावाजलेल्या वृत्तपत्रांनी घेतली. 'आयबीएन लोकमत' सारख्या वाहिनीने 'एकला चालो रे' या कार्यक्रमास घेतलेली आपली प्रदीर्घ मुलाखत अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

हुंडा विरोधी चळवळ मुंबई, या संस्थेद्वारे दिला जाणारा राज्यस्तरीय 'साने गुरुजी युवा वैज्ञानिक पुरस्कार' आपणांस २०१४ साली मिळाला. त्याचबरोबर बायफ संस्थेच्या 'बेस्ट सायंटिफिक पेपर अ‍ॅवॉर्ड' या राष्ट्रीय पुरस्काराने आपण सन्मानित आहात. सर्वत्र आधुनिकीकरण आणि उत्पादनासाठी पर्यायाने अधिक आर्थिक मिळकतीसाठी संकरीत वाण किंवा बी-बीयाणे वापरण्याच्या काळात आपण शारिरीक प्रकृतीसह नैसर्गिक समतोलही साधला जावा, यासाठी देशी वाणांचा प्रसार प्रचार आणि त्यावर संशोधन करत आहात. सर्वांच्या शारिरीक स्वास्थ्याबरोबरच समाजोन्नती हे आपले ध्येय आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई नवमहाराष्ट्र युवा अभियान आपल्या कार्याची विनम्रपणे दखल घेते, देशी वाण वाचवून अधिक सकस उत्पादन घेण्याच्या आपल्या प्रयत्नांना निश्चित यश मिळणार आहे. या शुभेच्छांसह आपणांस हे मानपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| **सुप्रिया सुळे** | **शरद पवार** | **दत्ता बाळसराफ** |
| कार्याध्यक्ष, | अध्यक्ष, | संयोजक, |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई |



## यशवंतराव चव्हाण युवा सामाजिक पुरस्कार २०१५ (युवती)

# सन्मानपत्र

### • मुमताज अब्बु शेख •

१८ नोव्हेंबर १९८१ चा आपला जन्म, जन्मापासूनच मिळाले हे दारिद्र्य आणि कुटूंबकलह, आपल्या बालपणीच सोडून गेलेले वडील आणि त्यानंतरचा नातेवाईकांनी केलेला छळ वजा सांभाळ, या अनुभवांतून आपण जात राहिलात. खेळण्या-बागडण्याच्या म्हणजे अगदी वयाच्या चौदाव्या वर्षात झालेला विवाह आपल्या इयत्ता आठवीनंतरच्या शिक्षणास पायबंद घालणारा ठरला. मनात आकाशाची ओढ पण पंखांना धर्मसंस्काराची बंधनं, असा ओढाताणीचा जीवघेणा प्रवास, मुक्तीची अनिवार इच्छा आपल्या कृतीतून दिसायला लागली. संसाराची ओढाताण आणि आंतरीक घुसमट होऊ लागली. याच काळात 'कोरो'च्या कार्यकर्त्यांची झालेली आपली भेट मुक्तीची कबाडं किलकीली करणारी ठरली. इ. स. २००० मध्ये कोरोसोबत स्वत:ला जोडून घेऊन आपल्याच वस्तीतून अर्थात झोपडपट्टीपासून आपण आपल्या कार्याला सुरुवात केली. शिक्षणाचा अभाव हेच दारिद्र्य आणि सामाजिक दर्जास जबाबदार आहेत. हे आपण पुरते ओळखले होते. म्हणूनच सर्वप्रथम आपण साक्षरता वर्गापासून आपल्या कार्यास सुरुवात केली. तळागाळातल्या, झोपडपट्टीतल्या महिलांचे शिक्षण, कौटुंबिक हिंसाचार यांसारख्या विषयांवर आपले काम सुरु झाले. दारिद्र्यरेषेखालील महिलांच्या प्रश्नांच्या आपण केवळ साक्षीदारच नाही तर बालपणापासून तेच भोगणाऱ्या अनुभवीदेखील होतात. केवळ महिला म्हणून आपण खूप अन्याय, कुचंबना सहन केली, न राहवून शेवटी स्वत:साठी आवाज उठविला आणि त्या परिस्थीतीतून बाहेर पडलात. पुढे अनेक महिलांची साथ मिळत गेली आणि एकटीचे कार्य महिला मंडळ फेडरेशनच्या माध्यमातून सामूहिकरित्या सुरु झाले. अनेक वर्षांमध्ये झालेला महिलांच्या विविध प्रश्नांवरचा अभ्यास होताच, काम करत असतांनाच आपले लक्ष वेधले ते अशा एका प्रश्नावर जो आवश्यक तर होताच पण तितकाच दुर्लक्षित राहिला, तो म्हणजे महिलांच्या स्वच्छतागृहांचा ...

महिलांसाठी स्वच्छतागृहे असावित हा महिलांविषयीचा 'खाजगी' त गणला जाणारा विषय आपण इ. स. २०११ मध्ये सर्वप्रथम सार्वजनिक व्यासपीठावर उपस्थित करुन एका व्यापक चळवळीला सुरुवात केली. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतागृहे नसल्यामुळे महिलांच्या स्वतंत्रपणे वावरण्यावर गदा येते हे आपण अनुभवले आहे. नैसर्गिक गरज भागवताना सार्वजनिक ठिकाणी कुचंबना सहन करावी लागणे ही आपल्या हक्कांची पायमल्ली आहे अशा क्रांतीकारी आणि तितक्याच रास्त प्रश्नाने आपणांस झपाटून टाकले. महिलांसाठी सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतागृहे हा केवळ सुविधेचा नाही तर अधिकाराचा विषय आहे, ही संवैधानिक बाब आपल्या लक्षात आली. वस्तीतल्या झोपडपट्टीतल्या महिलांदेखील या प्रश्नाने जागृत केले आणि त्यांचादेखील या मागणीचा जोर वाढला. आत्मसन्मान, सुरक्षा, आरोग्य, भिती, लाज, कुचंबना आणि सामाजिक समता यासर्व बाबींचा विचार करुन उच्चभ्रू, सुशिक्षित आणि नोकरदार महिलादेखील आपल्या अभियानात सहभागी झाल्या. अनेक मोर्चे, आंदोलनानी आपण आपला आवाज सर्वांपर्यंत पोहचविलात. आझाद मैदानावरील आंदोलन, अनेक कलावंतांचा आपल्या अभियानातील सहभाग आणि महिला मंत्र्येंचे समर्थन त्याचबरोबर प्रसारमाध्यमांची साथ आपल्या अभियानास यशस्वितेच्या शिखरावर नेऊन पोहचविणारी ठरली. आपल्या रास्त आणि आठही मागणीमुळे मुंबई सुरुवातीला महिला स्वच्छतागृहांसाठी मिळालेला ७५ लाख रुपयांचा निधी वाढवून आज ५ कोटींच्याही पुढे जातो हे आपल्या आंदोलनाचे यश आहे.

धार्मिकतेच्या संस्कारात वाढलेली, बुरख्यात वाढलेली पण आतून मुक्त विचारांची, महिला स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी मुमताज शेख जेव्हा ब्रिटीश ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन (बी.बी.सी.) च्या जगभरातील शंभर महत्त्वाकांक्षी महिलांच्या यादीत येते तेव्हा जगभरातील सर्वच महिलांच्या नजरा भारतातील मुमताजकडे वळतात. भारतातील स्त्रियांना आत्मसन्मान मिळवून दिल्याबद्दल प्रत्येक भारतीय स्त्री आपल्या संबंध समूहाची ऋणी राहील. साक्षरता मोहिमेपासून सुरु झालेला आपला प्रवास इ. स. २०११ मध्ये घडलेल्या बलात्कारकांडातील आरोपींना शिक्षा देण्यापासून ते 'राइट टू पी' या आंदोलनापर्यंत येऊन थांबलेला नाही तर अखंडपणे विविध प्रश्न हाताळत सुरुच आहे.

क्रांतीज्योती सावित्रीबाईकडून सहनशीलता आणि शिकण्याची आस घेऊन आपण फातेमांचा वैचारिक वारसा चालवत आहात. महात्मा फुलेंच्या शिक्षणविचारांचे सत्व, बाबासाहेबांचे संविधानातील समतेचे तत्त्व आणि गाडगेबाबांनी सांगितलेले स्वच्छतेचे महत्त्व गाठीशी बांधून आपण परिवर्तनाचा प्रवास सुरु केलेला आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, नवमहाराष्ट्र युवा अभियान आपल्या या प्रवासाची विनम्रपणे दखल घेत आपणांस हे मानपत्र सन्मानपूर्वक प्रदान करत आहे.

| सुप्रिया सुळे | शरद पवार | दत्ता बाळसराफ |
|---|---|---|
| कार्याध्यक्ष, | अध्यक्ष, | संयोजक, |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई |



## यशवंतराव चव्हाण युवा क्रीडा पुरस्कार २०१५ (युवक)

# स | न्मा | न | प | त्र

### ● श्रीहरी अशोक तापकीर ●

मु. पो. वडमुखवाडी चऱ्होली, ता. हवेली, जि. पुणे येथील आपला जन्म, चऱ्होली या आपल्या छोट्याशा गावाचे नाव आपण एव्हरेस्टवर नेऊन पोहचवले आहे. आई सौ. सुशिला व वडील श्री. अशोक तापकीर या सर्वसामान्य मध्यमवर्गीय वारकरी दाम्पत्यांच्या पोटी झालेला आपला जन्म, 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा, ज्याचा तिन्ही लोकी झेंडा' या उक्तीस प्रत्यक्षात उतरवणारा आहे. आई-वडील एक भाऊ आणि दोन बहिणी असा आपला परीवार. हलाखीच्या आर्थिक परिस्थीतीमुळे आपणास वाणिज्य शाखेच्या द्वितीय वर्षापुढे शिक्षण घेता आले नाहीत, पण कर्तृत्वाला शिक्षण मर्यादा घालून शकत नाही हे आपण आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.

गिर्यारोहण हा आपला क्रिडाप्रकार इ. स. २००२ पासूनच आपण दुर्गम असे गडकोट, दुर्ग आणि जलदुर्गाच्या भ्रमंतीला सुरुवात केली. आजवर आपण १५० हून अधिक दुर्गम गडकोट व २०० हून अधिक लेण्यांव भटकंती केली आहे. याच दरम्यान इ. स. २००२ मध्ये आपली भेट रमेश गुळवे यांच्याशी झाली आणि इथूनच सुरुवात झाली एका नव्या अध्यायाला, गिर्यारोहण या क्रिडा प्रकाराविषयी माहिती आणि त्याबद्दलचे मार्गदर्शक, प्रेरक ठरले ते कै. रमेश गुळवे. २००७ साली आपण गिर्यारोहणातील बेसिक तर २००९ साली ॲडव्हान्स कोर्स पूर्ण केला. २०१० साली आपल्या सर्व सर्च ॲण्ड रेस्क्यू कोर्स नंतर खऱ्या अर्थाने आपल्या खेळास सुरुवात झाली. खरे तर गिर्यारोहण हा सहली क्रिडाप्रकार पण आपत्ती व्यवस्थापनामध्ये याच ज्ञानाचा वापर करता येतो या जाणिवेने शाळा आणि महाविद्यालयांमध्ये गिर्यारोहण विषय शिकवला जावा यासाठी आपले प्रयत्न सुरु आहेत.

एप्रिल २००९ मध्ये आपण माऊंट चंद्रभागा सर केले, ज्याची उंची समुद्रसपाटी पासून ६२४५ मी. आहे. त्यानंतर सप्टेंबर २००९ मध्ये ५७२० मी. उंच असणारे द्रौपदी तांडा तर २०११ मध्ये नेपाळमधील ६६५४ मी. उंच माऊंटमेरा सर केले. त्यानंतर नेपाळमधील माऊंट आयलँड, हिमाचल प्रदेशमधील माऊंच मेन्थोसा, माऊंट देवतिल्ला, जम्मू काश्मीर मधील माऊंट स्टोक कांगरी इ. सर करत मे २०१२ मध्ये आपण समुद्रसपाटीपासून ८८४८ मी. उंच असणारे जगातील सर्वोच्च शिखर माऊंट एव्हरेस्ट सर केले आहे. 'मिशन एव्हरेस्ट - २०१२' ही जगातील सर्वात पहिली व सर्वात कमी खर्चाची भारतीय नागरी मोहिम, साऊथ कोल या मार्गाने एव्हरेस्टवर चढाई करणारे आपण पहिले महाराष्ट्रीयन गिर्यारोहन आहात. याच क्षेत्रातील विविध चौदा विश्वविक्रम आपल्या समूहाच्या नावे आहेत हे विशेष. एव्हरेस्टच्या इतिहासात पहिला शुध्द शाकाहारी गिर्यारोहक म्हणून आपली नोंद झालेली आहे. आजवरच्या इतिहासातील आपण पहिले भारतीय आहात ज्याने १२ मे २०१२ रोजी एव्हरेस्टवर भारताचा तिरंगा फडकावून राष्ट्रगीत गायले त्यानंतरचे संबंध वर्षभर तिरंगा एव्हरेस्टवर फडकत राहिला तो केवळ आपल्यामुळेच. याचवेळी पहाटे साडे पाच वाजता सुर्यकिरणांच्या साक्षीने वैश्विक शांतीचा संदेश देणारे संत ज्ञानेश्वरांचे पसायदान आपण गायले. भल्या पहाटे सुर्य पहात असतांनाच 'विश्व स्वधर्म सुर्य पाहो' अशी आपली प्रार्थना निर्मिकापर्यंत पोहचविण्याच्या आपल्या प्रयत्नाला सलाम ...! पसायदान व हरीपाठासह मराठी मातीचा अभिमान असणारा भगवा ध्वज शिवरायांच्या प्रतिमेसह फडकविण्याचा बहुमान आपल्याला लाभला आहे.

चहा किंवा फारतर जेवण शेअर करण्याच्या आजच्या काळात आपण प्रत्यक्ष प्राणवायू (ऑक्सिजन) शेअर करुन जर्मन गिर्यारोहकाचे प्राण वाचविले. आपण केलेली निरपेक्ष मदत परदेशी नागरीकांनाही भावली आणि ते सदैव आपल्या ऋणात आहेत. 'मातीचे मार्दव सांगे कोंभाची लवलव' या संत ज्ञानेश्वरांच्या उक्तीनुसार आपले वर्तनच आपल्यावरील वारकरी संस्कारांचे स्पष्टीकरण देते.

आपल्यावरील संस्कारांसह आपल्या कामगिरीची यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई नवमहाराष्ट्र युवा अभियान विनम्रपणे दखल घेते. भविष्यातील आपल्या सर्व स्वप्नांना सत्यात उतरण्याच्या शुभेच्छांसह हे मानपत्र आपणांस सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

| सुप्रिया सुळे | शरद पवार | दत्ता बाळसराफ |
|---|---|---|
| कार्याध्यक्ष, | अध्यक्ष, | संयोजक, |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई |



## यशवंतराव चव्हाण युवा क्रीडा पुरस्कार २०१५ (युवती)

# स|न्मा|न प|त्र

### ● स्नेहा श्रीपाद भगत ●

आपला जन्म डोंबिवलीचा, पण आजवरचे सबंध आयुष्य आपण पुण्यातच आहात. व्यावसायिक असणारे आपले वडील व गृहिणी असणाऱ्या आपल्या मातोश्री यांचे आपण एकुलते एक कन्यारत्न आहात. आपल्या वडिलांची फुटबॉल खेळण्याची तीव्र इच्छा असूनही परिस्थितीमुळे त्यांना क्रिडा क्षेत्रात कर्तबगारी करता आली नाही. आपल्या घरातील एकतरी व्यक्ती खेळाडू म्हणून किमान राज्यस्तरापर्यंत जावी ही आपल्या वडिलांची इच्छा, आपण व्हॉलीबॉल या खेळ प्रकारात राष्ट्रीय स्तरापर्यंत जाऊन पूर्ण केलीत. इयत्ता ८ वी पासूनच आपण क्रिडा क्षेत्रात रस दाखवलात. कटारिया हायस्कूल पुणे, येथे आपले शालेय शिक्षण होत असतानाच आपले प्रशिक्षक श्री. विलास घोगरे यांनी आपल्यातील खेळाडू ओळखला. व्हॉलीबॉल या खेळातील आपले कसब आपल्या प्रशिक्षकांनी वाढवले. इयत्ता १० वी पर्यंत त्यांच्याच मार्गदर्शनाखाली आपण शिकलात. इयत्ता ११ वी पासून आजतागायत श्री. देवीदास जाधव आपणांस मार्गदर्शन करीत आहेत. दुर्गम्य इच्छाशक्ती, सातत्यपूर्ण सराव आणि आई-वडिलांचे पाठबळ या जोरावर आपण सतत आपले प्राविण्य दाखवत आहात.

आजवर आंतरशालेयसह इतर अशा एकूण ७० स्पर्धांमध्ये सहभागी होत सुमारे ४५ पारितोषिके आपण पटकाविली आहेत. अभिमानाची गोष्ट ही की, यातील सर्व पारितोषिके प्रथम किंवा द्वितीय अशीच आहेत. खेळांतील आपला मैदानावरील वावर इतर स्पर्धकांना तृतीय स्थानी आपोआपच नेऊन पोहचवतो. सध्या आपण पुणे विद्यापीठातून हिंदी विषयात पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेत असून त्याचबरोबरच क्रीडा व्यवस्थापन पदविकेचे देखील प्रशिक्षण घेत आहात.

आजवर आपण १६ राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होत दोन रजत पदकांसह एक सुवर्ण पदक मिळवले आहे. अनेक राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन २२ रजत पदकांसह १६ सुवर्ण पदक प्राप्त केली आहेत. दोन वेळेस आंतरराष्ट्रीय कॅम्पसाठी आपली निवड झाली आहे.

आपल्या वयाच्या सर्व व्यक्तींना आश्चर्यचकीत करायला लावणारा आपला प्रवास आहे. क्रीडा क्षेत्रातील सर्वांसाठी आपण आदर्श आहात. आपल्यासारख्याच तळमळ असणाऱ्या खेळाडूंना प्रशिक्षण देण्याचा आपला मानस आपल्या निगर्वीतेचा साक्षात्कार घडवतो. यशवंराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई नवमहाराष्ट्र युवा अभियान आपल्या क्रीडा कौशल्यासह आपल्या खिळाडू वृत्तीची विनम्रपणे दखल घेत आपणांस हे मानपत्र सन्मानपूर्वक प्रदान करत आहे.

| | | |
|---|---|---|
| **सुप्रिया सुळे** | **शरद पवार** | **दत्ता बाळसराफ** |
| कार्याध्यक्ष, | अध्यक्ष, | संयोजक, |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई |



## यशवंतराव चव्हाण युवा विशेष क्रीडा पुरस्कार २०१५

# स | न्मा | न | प | त्र

### ● प्रार्थना गुलाबराव ठोंबरे ●

बार्शी, जि. सोलापूर येथील आपला जन्म, आई-वडील आणि एक बहिण असा आपला परिवार. आपल्या क्रीडा प्रकारातील कोणत्याही सुविधा आपल्या शहरात नसतानाही आपण जागतिक पातळीवर कौशल्य दाखवत आहात.

वयाच्या आठव्या वर्षापासून आपण लॉन टेनिस या क्रीडा प्रकाराकडे आकर्षित होऊन खेळण्यास सुरुवात केली. आपले जवळचे नातेवाईक श्री. आप्पासाहेब झाडबुके हेच आपले पहिले गुरु. आपले कौशल्य जसजसे वाढत गेले तसतसे दिग्गज प्रशिक्षक आपणास लाभत गेले. राजीव देसाई, सुधीर सालगुडे यांनी देखील आपणास मार्गदर्शन केले. वयाच्या दहाव्या वर्षीपासून आजतागायत आपण महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकावर आहात याचा सर्वांनाच अभिमान आहे. पुणे येथील नंदन बाळ यांनी देखील एक वर्ष आपणास प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन केली आहे.

इ. स. २००५-०६ साली ५१ व्या नॅशनल क्रीडा स्पर्धेत आपण सुवर्ण पदक, २००६-०७ साली १ रजत पदक, २०१४-१५ साली १ रजत, २ कांस्य पदके तर एशियन गेम्समध्ये १ कांस्य पदक प्राप्त केले आहे. चौदा व सोळा वर्षाखालील टेनिस स्पर्धा मानांकनामध्ये आपण अखिल भारतीय पातळीवर प्रथम क्रमांकावर विराजमान होतात. ए.टी.एफ. स्पर्धा रँकींगनुसार २००७ साली चौदा वर्षाखालील वयोगटात आपण प्रथम क्रमांकावर होतात. आय.टी.एफ. महिला क्रीडा स्पर्धामध्ये बारा वेळा डबल्समध्ये प्रथम पारितोषिके मिळविली तर याच स्पर्धेमध्ये तीनवेळा आपण वैयक्तिक प्रथम पारितेषिके पटकाविली. या सर्व अभुतपूर्व यशाबद्दल भारताचे महामाहिम राष्ट्रपती व क्रिडा व युवक खात्याच्या मंत्रीमहोदयांनी व्यक्तीश: आपले अभिनंदनही केले आहे. २०१५ च्या महिला एकेरी रँकींग नुसार आपले भारतात द्वितीय स्थान आहे. महिला डबल्समध्येही अखिल भारतात आपली दुसरी रँकींग आहे तर जागतिक क्रमवारीत डबल्समध्ये आपले २८८ वे स्थान आहे. जिल्हा परिषदेत अभियंता असणाऱ्या आपल्या वडिलांनी केवळ आपल्याला मदत आणि सोबत व्हावी म्हणून आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन सतत आपणास साथ, प्रेरणा व मार्गदर्शन केले आहे. कुटुंबियांनी आपल्यावर टाकलेल्या विश्वास आपण सार्थ आहे. जागतिक किर्तीच्या क्रिडापटू सानिया मिर्झा यांच्या आपण सहकारी आहात. आपल्या खेळातील डबल्स या प्रकारात सानिया मिर्झाच्या पार्टनर म्हणून अनेकदा उत्तम कामगिरी दाखवली आहे. सानिया यांच्या नंतर भारतातील दुसऱ्या क्रमाकांच्या खेळाडू म्हणून आपलाच उल्लेख आहे. बी.ए. इंग्रजी हि पदवी प्राप्त केलेल्या आपण सध्या हैद्राबाद येथे सानिया मिर्झा टेनिस ॲकेडमीमध्ये श्री. इम्रान मिर्झा यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहात.

आपली जिद्द, सराव आणि कुटुंबुयांची साथ आपणास यशाच्या शिखरावर नेऊन पोचवते आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियान आपल्या कार्याची विनम्रपणे दखल घेत आपणास हे मानपत्र सन्मानपूर्वक प्रदान करत आहे.

| सुप्रिया सुळे | शरद पवार | दत्ता बाळसराफ |
| --- | --- | --- |
| कार्याध्यक्ष, | अध्यक्ष, | संयोजक, |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई |

# क्षणचित्रे



६ व्या यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा प्रसंगी ज्येष्ठ अभिनेत्री वहिदा रेहमान यांचा विशेष पुरस्काराने गौरव.



विभागीय केंद्र, नाशिक आयोजित पुस्तक प्रकाशन समारंभ.






'अपंग हक्क विकास मंच' द्वारा आयोजित ६वे अखिल भारतीय विशेष व्यक्ती (अपंग) साहित्य संमेलन, औरंगाबाद.



विभागीय केंद्र औरंगाबाद - विद्यापीठ नामविस्तार दिन कार्यक्रम. मा. खा. डॉ. भालचंद्र मुणगेकर, मा. सुप्रिया सुळे व मान्यवर.



कविवर्य बी. रघुनाथ स्मृतिनिमित्त आयोजित काव्यसंध्या.

# क्षणचित्रे





विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने आयोजित अभिनंदन सोहळा व पुरस्कार वितरण कार्यक्रम.





विभागीय केंद्र लातूर द्वारा आयोजित कार्यक्रम.




यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार (कोकण विभाग)
मा. अण्णासाहेब शिरगावकर यांना प्रदान करताना मा. प्रा. सुभाष देव.



विभागीय केंद्र कोकण द्वारा आयोजित
ज्येष्ठ नागरिक दिन कार्यक्रम.

# क्षणचित्रे





विभागीय केंद्र कऱ्हाडला मा. शरदचंद्र पवार यांची सदिच्छा भेट.
सोबत मा. अण्णा डांगे, मा. बाळासाहेब पाटील व इतर मान्यवर.

पुण्यतिथीनिमित्त अभिवादन यात्रा - कऱ्हाड.






शिक्षण विकास मंच आयोजित राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेत
पुस्तक प्रकाशन आणि 'ग्रंथ पुरस्कार' वितरण.





'जागर हा जाणिवांचा तुमच्या माझ्या लेकींचा....' या उपक्रमांतर्गत
मुंबईत वडाळा येथे आयोजित कार्यशाळा.

कविवर्य मंगेश पाडगावकरांचे स्मरण आणि
त्यांच्या कवितांच्या वाचनाचा कार्यक्रम.

# क्षणचित्रे





वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान द्वारा दापोडी, जि. पुणे येथे आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात स्थानिक गांवकरी व परदेशी (स्वीडन) पाहुणे.



विभागीय केंद्र, पुणेचे अध्यक्ष मा. अजित निंबाळकर वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र वितरण करताना.



वाहतूक सुरक्षा अभियानाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पथनाट्य कार्यक्रमातील सहभागी विद्यार्थी.



महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने आयोजित 'पेपर क्विलिंग' कार्यशाळेतील सहभागी महिला.



सृजन आयोजित कार्यक्रमात सहभागी झालेले विद्यार्थी.

महाराष्ट्र २०२५

## चर्चासत्र मालिका






देवस्थान न्यासांची सामाजिक जबाबदारी - दि. २० सप्टेंबर, शेगांव.







साहित्य, संस्कृती व कला : सामाजिक पर्यावरण आणि शासकीय धोरण, दि. १७ ऑक्टोंबर, नाशिक.






नागरीकरणाची आव्हाने - दि. २४ ऑक्टोबर, नवी मुंबई.

महाराष्ट्र २०२५


चर्चासत्र मालिका





व्यवस्था आरोग्याची - दि. १ नोव्हेंबर, नागपूर.





औद्योगिक विकास - दि. ६ नोव्हेंबर - पुणे.






क्रीडा धोरण आणि क्रीडा संस्कृती - दि. २१ नोव्हेंबर, मुंबई.

महाराष्ट्र २०२५

**चर्चासत्र मालिका**





शालेय शिक्षण - दि. २८ नोव्हेंबर, सातारा.





विज्ञान आणि तंत्रज्ञान - दि. ५ डिसेंबर, मुंबई.



साहित्य, संस्कृती व कला : सामाजिक पर्यावरण आणि शासकीय धोरण चर्चासत्रात उपस्थित निमंत्रीत.



नागरीकरणाची आव्हाने चर्चासत्रात उपस्थित निमंत्रीत.

YASHAWANTRAO CHAVAN PRATISHTHAN's
ACADEMY OF INFORMATION TECHNOLOGY

# FUNTIME

## KIDS COURSES FOR SUMMER VACATION

### Basics of Animation

Illustrator
Photoshop
Flash

### Basic Computing

Word
Powerpoint
Internet

### Web Designing

Computer Fundamentals
Adobe Photoshop
Adobe Flash
HTML Scripting
Adobe Dreamweaver



5th floor, Y.B. Chavan Centre,
Gen. J. Bhosle Marg,Opp. Mantralaya, Nariman Point,
Mumbai - 400021 Tel. No.- 22817975 / 22043617,19
E-mail - ycpait@vsnl.com Website - www.ycpait.org

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन नियतकालीक स्पर्धा : २०१५

## पुरस्कारप्राप्त नियतकालिकांची यादी

| अ. क्र. | नियतकालिकाचे नाव | महाविद्यालयाचे नाव | पुरस्कार क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | मानवता | कन्नुवार कला, रतनलाल काबरा विज्ञान आणि बी. आर. मंत्री वाणिज्य महाविद्यालय,मानवत, परभणी | प्रथम पुरस्कार |
| २. | शिवनेरी | अण्णासाहेब आवटे आर्टस्, कॉमर्स, हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज व सौ. कुसुमबेन कांतीलाल शाह आर्टस्, कॉमर्स सायन्स ज्युनिअर कॉलेज, मंचर, जि. पुणे | द्वितीय पुरस्कार |
| ३. | दृष्टीक्षेप | अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, काटोल, नागपूर. | तृतीय पुरस्कार |
| ४. | कर्मवीर | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर. | उत्तेजनार्थ प्रथम पुरस्कार |
| ५. | यशश्री | श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजुरा, जि. चंद्रपूर. | उत्तेजनार्थ द्वितीय पुरस्कार |
| ६. | टेक्निक - २०१५ | कोल्हापूर इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनियरींग, कोल्हापूर. | उत्तेजनार्थ तृतीय पुरस्कार |

★★★

# अपंग हक्क विकास मंच
## कार्यवृत्त

महाराष्ट्रातील अपंग व्यक्तींच्या विविध समस्या, संवाद व समन्वयाच्या भुमिकेतून सोडविण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती करण्यात आली. मंचाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे आहेत. मंचाचे संयोजक विजय कान्हेकर व दत्ता बाळसराफ तर समन्वयक सुहास तेंडुलकर, अभिजीत राऊत आणि संघटक सौ. सुकेशनी मर्चंडे-शेवडे हे काम पाहतात. या मंचामार्फत महाराष्ट्रातील विविध जिल्हयांत शिबिराचे आयोजन करुन सर्व प्रवर्गातील अपंगांना त्यांच्या आवश्यकतेनुसार कृत्रिम अवयव व साहित्य साधनांसाठीचे मोजमाप घेऊन साधने मोफत उपलब्ध करुन दिली जातात. या मंचामार्फत प्रत्येक अपंगांना त्यांच्या समस्येनुसार योग्य ती माहिती व सल्ला दिला जातो.

**कळंमनुरी, जिल्हा- हिंगोली , दिनांक २१ व २२ सप्टेंबर,२०१५: कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर :**

महाराष्ट्रातील विविध जिल्हयांत सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी,यांच्या संयुक्त विद्यमाने आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद हिंगोली यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत सर्व प्रवर्गातील अपंगांसाठी कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन श्रीमती रजनीताई सातव, खा. राजीव सातव, आ. डॉ. संतोष टारफे, पोलिस अधिक्षक कैलाश कणसे, डॉ. राजेंद्र दुबे, डॉ. दिपक गुप्ता आणि अपंग हक्काचे संयोजक विजय कान्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात एकूण १२५ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असुन १०० गरजु लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. यामध्ये १०० जयपूर फुट या साहित्याचे वाटप करण्यात आले.या शिबिरांच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघ, व अपंग हक्क विकास मंचाचे कर्मचारी व कार्यकर्ते आणि सहकारी यांनी परिश्रम घेतले.

**अपंग हक्क विकास मंच आणि साहित्य व सांस्कृतिक मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ६ वे अखिल भारतीय विशेष व्यक्ती (अपंग) साहित्य संम्मेलन, औरंगाबाद**

दिनांक १३ व १४ जानेवारी, २०१६ रोजी 'कविवर्य सुरेश भट साहित्यनगरी,' औरंगाबाद येथे साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले. याचा उद्घाटन सोहळा बुधवार दि. १३ जानेवारी, २०१६ रोजी सायंकाळी ५:०० वा. पार पडला. यावेळी विधानसभेचे अध्यक्ष मा. श्री. हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते सोहळयाचे उद्घाटन झाले. मा. प्रा. अशोक थोरात (ज्येष्ठ साहित्यिक) साहित्य संम्मेलन अध्यक्ष, यांच्या हस्ते चित्र व ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. यावेळी मा.ना. राजकुमार बडोले (मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य), मा. ओमप्रकाश ऊर्फ (बच्चू) कडू (आमदार, अचलपूर, अध्यक्ष प्रहार अपंग क्रांती आंदोलन, मा. रा.रं. बोराडे (ज्येष्ठ साहित्यिक), मा. अभिनंदन थोरात (अध्यक्ष, चिंतन ग्रुप, पुणे), मा. वैकुंठ कुंभार (अध्यक्ष, साहित्य व सांस्कृतिक मंडळ, पुणे आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

या साहित्य संमेलनात सौ. उषा शास्त्री (मुंबई), श्री. देव शर्मा (दिल्ली), श्री. मनी पानसे (पुणे), श्री. देवीदास आधीवार यांच्या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी नवोदित कवींचे कवी संम्मेलन आयोजित केले होते. तसेच विशेष व्यक्तींचे विविध सांस्कृतिक व मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यात विशेष (अपंग) व्यक्तींनी निरनिराळया गाण्यांवर नृत्याचे प्रदर्शन, मंजुळ आवाजातील ऑर्केस्ट्रा सादर करण्यात आला. मतिमंद मुलांचे राजे छत्रपती शिवरायांच्या 'जन्मसोहळा ते राज्याभिषेका पर्यंतचा जीवनपट' याचंही सादरीकरण करण्यात आले. यावेळी उपस्थित शिवशाहीर मा. विजय तनपुरे, राहुरी यांनी या मतिमंद मुलांचे व त्यांच्या शिक्षकांचे विशेष कौतुक केले. शिवशाहिरांनीही आपल्या दर्जेदार आवाजात पोवाडा गाऊन

कार्यक्रमाची रंगत वाढवली. संम्मेलनासाठी एकूण ७०० साहित्यप्रेमी उपस्थित होते. साहित्य प्रेमींच्या निवासाची, नाश्ता व भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

गुरुवार दि. १४ जानेवारी, २०१६ रोजी सकाळी दुस-या दिवशीच्या विविध कार्यक्रमांची सुरुवात झाली. देशातील विविध राज्यातील तसेच महाराष्ट्रातील विविध राज्यातुन आलेल्या मान्यवर कवींच्या कविसंम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कविसंमेलनात अध्यक्ष - मा. पियुष व्दिवेदी (चित्रकूट, उ.प्र.), मा. विजय आव्हाड (मुंबई), मा. नानाबेरगुडे (परभणी), मा. प्रकाश खोडके (हिंगोली), मा. गौतम राऊत (खामगांव), मा. राजन चव्हाण (मुंबई), मा. माधुरी भालेराव (नांदेड), मा. आकाश भैसारे (चंद्रपूर), मा. रामराव जोजार (नांदेड), मा. कृष्णा ठोंबरे (औरंगाबाद), मा. प्रा. नंदकिशोर सरोसे (सिल्लोड), मा. विभावरी साखरे (औरंगाबाद), मा. प्रा. राजाराम झोडगे (सेलू), मा. विजय साळुंखे (पुणे) देशभरातून आलेल्या कवींनी बहारदार पण तितक्याच चिंतनात्मक पध्दतीने विशेष व्यक्तींच्या वाटयाला आलेले दु:ख, त्यांचा संघर्ष यातून मिळणा-या त्यांच्या यशाचा प्रवास उत्सफूर्तपणे आपल्या कवितेतून सादर केल्या.

निमंत्रितांच्या कविसंमेलनानंतर संमेलनाचे विशेष सत्र सुरु झाले. या विशेष सत्रात राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री ना. राजमूमार बडोले, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष खा. सुप्रियाताई सुळे, मा.आ. हेमंत टकले या मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी विशेष व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. यात प्रामुख्याने गिर्यारोहक शिवाजी गाडे, दिपाताई क्षीरसागर, धर्मेंद्र सातव, बाजीराव जाधव, गणेश जहाँगीरदार, सैय्यद कौसर, हरिदास जोगदंड, पारसचंद साकला, संदीप ओसवाल यांचा सत्कार मा. मंत्रीमहोदय राजकुमार बडोले आणि मा. खा. सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते करण्यात आला.

संस्कारभूषण साहित्य व सांस्कृतिक मंडळ, पुणे यांच्या वतीने देण्यात येणा-या संस्कारभूषण पुरस्काराचे वितरणही यावेळी करण्यात आले. हा पुरस्कार मा. पियुष व्दिवेदी (चित्रकुट-उत्तरप्रदेश) यांना साहित्यासाठी, मा. गजानन वाघ (नागपूर) यांना प्रशासकीय सेवेसाठी, मा. कोमल बोरा यांना क्रिडा क्षेत्रासाठी आणि कोल्हापूरच्या चेतना अपंगमती विकास संस्थेला कार्याबद्दल संस्कारभूषण पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात आले.

कुसुमाग्रज प्रतिष्ठान (नाशिक) यांच्याकडून ब्रेल लिपीतील ग्रंथ पेटी आणि बोलकी पुस्तके प्रतिष्ठानचे विश्वस्त मा. आ. हेमंत टकले यांच्या हस्ते तारामती बाफना अंध विद्यालयास देण्यात आली. ही बोलक्या पुस्तकाची पेटी औरंगाबाद विभागातील सर्व शाळांमध्ये फिरेल अशी माहिती यावेळी देण्यात आली.प्रसिध्द ग्रामीण साहित्यिक आणि महाराष्ट्र राज्याच्या साहित्यिक, सांस्कृतिक मंडळाचे माजी अध्यक्ष रा.र.बोराडे यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त त्यांचा सत्कार मा. मंत्री महोदय राजकुमार बडोले यांच्या हस्ते यावेळी करण्यात आला.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष खा. सुप्रियाताई सुळे यांनी सर्वांशी संवाद साधला. विशेष व्यक्तींच्या विशेषत्वाचे त्यांनी कौतुक केले. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, विशेष (अपंग) व्यक्ती हा समाजाचा अविभाज्य भाग आहे म्हणून समाजानेही त्याची विशेष काळजी घेतली पाहिजे. त्यांच्या विकासासाठी पोषक असे वातावरण तयार करण्याची जबाबदारी समाजाची आहे आणि हीच गरज ओळखून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या अंतर्गत अपंगांसाठी कार्य करणा-या अपंग हक्क विकास मंचाने हे संमेलन भरविले असल्याचं त्यांनी सांगितलं.

चव्हाण सेंटरने अपंगांची विशेष तपासणी करण्यासाठी एक फिरती व्हॅन सुरु केली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. ही व्हॅन राज्यभर फिरत असून या व्हॅन मध्ये अपंगांना आवश्यक असणारे कृत्रिम अवयव व साधनांची निर्मिती त्यातच करता येते. लगेचच अपंगांना त्यांना आवश्यक त्या साधनांचे मोफत वाटप केले जाते. या फिरत्या व्हॅन मुळे तळागळातील विशेष व्यक्तींपर्यंत पोहचता येते. या व्हॅनच्या माध्यमातून आतापर्यंत हजारो विशेष व्यक्तींनी तपासणी करुन घेतली आहे. शिवाय केंद्र सरकारने या व्हॅनची पाहणी करुन अशीच व्हॅन देशभर अपंगांसाठी सुरु करण्याचा मानस व्यक्त केल्याची माहितीही यावेळी ताईंनी दिली.

अमेरीकास्थित स्टार्की फाउंडेशन यांच्या सहकार्याने आजपर्यंत तीन हजार कर्णबधिर लोकांना आपण डिजिटल श्रवण

यंत्रे दिल्याचं त्यांनी सांगितले. नॅबच्या माध्यमातून अंधांसाठी कार्य करणा-या मुंबई स्थित श्रीमती परीमला भट यांचे कौतुक करुन ताई म्हणाल्या की, स्वत: परीमला हया अंध आहेत. त्या नोकरी सांभाळून अंधांसाठी काम करीत असलेल्या नॅबसारख्या सेवाभावी संस्थेत त्या कार्यरत आहेत. या अशा संमेलनातून नवीन कार्याला दिशा मिळत असते शिवाय सर्व स्तरावर अपंगांच्या प्रश्नांवर चर्चा होत असते व ही चर्चा करण्यासाठी आपण सर्व साहित्य प्रेमी मोठया संख्येने देशभरातून उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांचे आभार त्यांनी मानले.

ना. राजकुमार बडोले यांनी विशेष व्यक्तींना आपण न्याय देण्याचा प्रयत्न करु असे सांगितले. शासनाकडून जशी अपंगांची उपेक्षा झाली तशीच उपेक्षा समाजाकडून सुध्दा झाली आहे. या वर्षात १ २ ३ विशेष अपंगांच्या शाळांना अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला. जे अपंग खेळाडू ज्यांनी विशेष नैपूण्य दाखविले आहे त्यांना शासकीय नोकरीत सामावून घेतले जाणार आहे. सध्या संजय गांधी योजने अंतर्गत अपंगांना ६०० रु. मासिक वेतन मिळते ते वाढवून १००० रु. करण्याचा निर्णय थोडयाच कालावधीत आपण घेणार आहोत, असे त्यांनी सांगितले. माननीय मंत्र्यांच्या भाषणानंतर आ. हेमंत टकले यांनी आगामी काळात होणा-या विशेष व्यक्तींच्या साहित्य संमेलनासाठी शासनाने अनुदान दयावे असा ठराव मांडला. उपस्थित प्रतिनिधींनी बहुमताने तो मंजूर केला. या ठिकाणी हे विशेष सत्र संपले.

**यशोगाथा सत्र :**

विशेष व्यक्तीच्या या साहित्य संमेलनात विशेष व्यक्तिच्या यशोगाथा हा प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. या विशेष व्यक्तींना अश्विनी दशरथे औरंगाबाद, यांनी संवाद साधून त्यांना बोलते केले. या प्रकट मुलाखतीमध्ये श्रीमती परीमला भट (मुंबई), मा. राजेश ठाकरे (नांदेड), मा. खंडेराव मुळे (उस्मानाबाद) या विशेष व्यक्तींनी आपल्या अंधत्वावर मात करुन त्यांनी मिळवलेल्या यशाच्या प्रवासाचे वर्णन या यशोगाथेच्या सत्रात केले. शिवाय सोबतच मा. पवन खेबूडकर यांनी मतिमंद विद्यार्थ्यांसाठी चेतना विकास संस्था, कोल्हापूर येथे कशी विकसित केली. या रोपटयाचे आज सुंदर वटवृक्षात कसे रुपांतर केले याचे मर्म त्यांनी सांगितले.

साहित्य संम्मेलनाच्या शेवटच्या भागात खुले चर्चासत्र, ठराव आणि समारोपीय आभार प्रदर्शनाचा कार्यक्रम संपन्न झाला. साहित्यउसंमेलनास उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांचे आभार स्वागताध्यक्ष सुहास तेंडुलकर यांनी मांडले. या संमेलनाचे अध्यक्षपद भुषविल्याबद्दल प्रसिध्द साहित्यिक प्रा. अशोक थोरात यांचे त्यांनी विशेष आभार मानून पुढील काळात आम्हाला आपण सहकार्य करावे अशी विनंती केली. हे संमेलन यशस्वीरीत्या संपन्न करण्यासाठी ज्यांनी-ज्यांनी योगदान दिले त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानून पुढील संमेलनासाठी आपण भेटणार आहोत असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**अंध प्रवर्गासाठी चर्चासत्र :**

अपंग हक्क विकास मंच आणि ब्लाइंड ग्रॅज्युएट फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या दोन वर्षापासून दर महिन्याच्या चौथ्या शनिवारी अंध प्रवर्गासाठी नियमितपणे चर्चा सत्राचा उपक्रम राबविला जातो. या सत्रात अंधांना विविध क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञांना बोलावून त्यांच्या संबंधित विषयावर मार्गदर्शनास्पद चर्चा केली जाते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षणातील झालेले बदल, नोकरीत, सामान्य जीवनात येणारे अडथळे अशा विषयांवर चर्चा केली जाते. यामुळे या प्रवर्गातील अपंगांना त्यांचे आयुष्य कसं सोप्या पध्दतीने जगता येऊ शकते याबद्दल विशेष मार्गदर्शन मिळते आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदतही होते. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अपंग हक्क विकास मंचाच्या संघटक सुकेशनी मर्चंडे-शेवडे विशेष परिश्रम घेतात.

★★★

# शिक्षण विकास मंच

## कार्यवृत्त

शिक्षण क्षेत्रात काम करण्यासाठी २००८ साली 'शिक्षण विकास मंच'ची स्थापना झाली. मा. सुप्रिया सुळे ह्या मंचच्या निमंत्रक आहेत. मुख्य संयोजक डॉ. वसंत काळपांडे, विशेष सल्लागार बसंती रॉय, संयोजक दत्ता बाळसराफ, समन्वयक सुरेश पाटील, प्रा. माधव सुर्यवंशी व सदस्य म्हणून नजमा काझी, शुभदा चौकर, विलास कांबळे हे मदत करतात. मिनल सावंत सहाय्यक म्हणून काम पाहतात. शिवाय राज्यातील शिक्षण तज्ञ, मुख्याध्यापक, शिक्षक हेही वेळोवेळी शिक्षण विकास मंचच्या कामात सहकार्य करीत असतात. शिक्षण विकास मंचच्या सुरुवातीपासूनच्या मार्गदर्शक डॉ. कुमूद बन्सल यांचे ५ सप्टेंबर २०१५ रोजी आकस्मिक दु:खद निधन झाले. त्यांनी घालून दिलेल्या वाटेवरच मंचची यशस्वी वाटचाल सुरु आहे. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कामामुळे राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रात एक वेगळा सकारात्मक कार्याचा ठसा शिक्षण विकास मंचने उमटविला आहे.

### राष्ट्रीय शिक्षण दिन

भारताचे पहिले शिक्षण मंत्री मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ११ नोव्हेंबर रोजी शिक्षण विकास मंच राष्ट्रीय शिक्षण दिनाचे आयोजन करीत आहे. आतापर्यंत राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या निमित्ताने दरवर्षी पुढीलप्रमाणे परिषदा आयोजित करण्यात आल्या होत्या.

- शिक्षण हक्क कायदा - २००९
- शाळांची परिणामकारकता - २०१०
- शालेय अभ्यासक्रमात उत्पादक कौशल्याचा समावेश - २०११
- शालेय विद्यार्थ्यांची वर्तनसंहिता - २०१२
- शालेय शिक्षणात माहिती आणि दूरसंचार तंत्रज्ञानाचा वापर - २०१३
- सरकारी आणि अनुदानित शाळांपुढील आव्हाने - २०१४

### राष्ट्रीय शिक्षण दिन २०१५ - (२५ नोव्हेंबर २०१५)

२०११ पासून दिनांक ११ नोव्हेंबर रोजी शासनामार्फतही शाळा-शाळांमध्ये कार्यक्रमाचे आयोजन होत असल्याने आणि याच कालावधीत बऱ्याचदा दिवाळीची सुट्टी येत असल्याने दरवर्षी ११ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्याऐवजी दिनांक २५ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्याचा प्रतिष्ठानने निर्णय घेतला. यावर्षी हा कार्यक्रम बुधवार, दि. २५ नोव्हेंबर २०१५ रोजी 'रंगस्वर' यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्र मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता. २५ नोव्हेंबर हा मा. यशवंतराव चव्हाण यांचा स्मृतिदिन ही आहे.

### परिषदेचा विषय : शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षितता

विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरणात शिकता येणे हा त्यांचा हक्कच आहे, परंतु विद्यार्थ्यांना अमानुष शारिरीक शिक्षा, मारहाण, शाळेच्या इमारती आणि विद्यार्थ्यांची ने-आण करण्यासाठी वापरली जाणारी वाहने यांचे अपघात. विद्यार्थ्यांचे लैंगिक शोषण, विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांकडे होणारे दुर्लक्ष, मादक द्रव्याचे सेवन, शाळेतील बेशिस्त, चोऱ्या, विद्यार्थ्यांचे अपहरण अशी अनेक उदाहरणे आपणांस रोजच्या बातम्यात वाचायला व ऐकायला मिळतात. याबाबत अनेक कायदे अस्तित्वात असले तरी याबाबत शिक्षक, पालक, मुख्याध्यापक, संस्थाचालक यांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. ही परिषद त्यादिशेने टाकलेले एक पाऊल आहे.

### परिषदेची उद्दिष्टे

१) शालेय विद्यार्थ्यांचे सर्वांगीण हित आणि सुरक्षितता यांवर परिणाम करणाऱ्या विविध घटकांवर चर्चा करणे.

२) या विषयांशी संबंधित कायदे, नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे यांचा आढावा घेणे.

३) या विषयाबाबत संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक,

पालक, अधिकारी आणि समाज यांमध्ये जागरुकता कशी निर्माण होईल, याबाबतच्या उपाययोजनांचा आढावा घेणे.

४) या विषयासंदर्भात शासनाकडे शिफारशी करणे.

या परिषदेत महाराष्ट्र शासनाचे शिक्षण विभागातील राज्य आणि जिल्हा स्तरावरील काम करणारे अधिकारी, प्राथमिक व माध्यमिक शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक, पालक, स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी, शिक्षण तज्ज्ञ, शिक्षण क्षेत्राचे अभ्यासक, पत्रकार यांनी या परिषदेत सहभाग घेतला होता.

या परिषदेला सुरुवात करीत असताना राज्यातील विविध भागातून आलेल्या प्रतिनिधींचे स्वागत प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी केले. प्रास्तविकाच्या माध्यमातून शिक्षण विकास मंचचे मुख्य संजोक डॉ. वसंत काळपांडे यांनी परिषदेमागील हेतू आणि उद्दिष्टे काय आहेत यांची मांडणी केली.

दरवर्षी 'राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त' उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथाला 'डॉ. कुमूद बन्सल शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार', उत्कृष्ट शैक्षणिक ब्लॉग/वेबसाईटला पुरस्कार आणि ई-लर्निंग या क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षक यांनाही पुरस्कार दिला जातो.

### डॉ. कुमूद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार - २०१५

२५ नोव्हेंबर २०१५ रोजी राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या शिक्षण परिषदेत डॉ. कुमूद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार डॉ.माधुरी शानभाग यांची अनुवादीत केलेल्या 'लेटर्स टू अ सायन्टिस्ट' या पुरस्कारास देण्यात आला. जगद् विख्यात शास्त्रज्ञ डॉ. एडवर्ड. ओ. विल्सन यांच्या मूळ इंग्रजी पुस्तकांचा मराठी अनुवाद डॉ. शानभाग यांनी केला आहे. या पुस्तकात करीअर म्हणून विद्यार्थ्यांना कोणते क्षेत्र निवडावे ? करीअर पूर्ण करीत असताना वाटेत कोणत्या अडचणी आपल्या वाट्यास येऊ शकतात. या संदर्भात डॉ. एडवर्ड यांनी आपल्या तरुणाशी केलेला संवाद या पुस्तकात दिला आहे. दुसरा डॉ. कुमूद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार 'आमच्या शिक्षणाचं काय?' हेरंब कुलकर्णी यांनी लिहीलेल्या आणि मनोविकास प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकांसाठी देण्यात आला. २००९ च्या शिक्षण हक्क कायद्यात ६ ते १४ वर्षे वयोगटातील एकही मूल शाळेबाहेर राहणार नाही, शाळेत न गेलेल्यांना किंवा शाळा मध्येच सोडलेल्या मुलांना वयानुरुप प्रवेश देण्यात येतील आणि इयत्ता आठवीपर्यंत कोणत्याही मुलास या इयत्तेत ठेवता येणार नाही. अशा महत्त्वपूर्ण तरतूदी आहेत. असे असूनही बालमजूर, रस्त्यावरची मुले, साखर कारखान्यात आणि वीटभट्ट्यांत काम करणाऱ्या पालकांची मुले, आदिवासी क्षेत्रातली आणि इतरही मुले मोठ्या संख्येने शाळांबाहेरच आहेत. त्यांचा हेरंब कुलकर्णी यांनी विदर्भ, मराठवाडा, आणि प. महाराष्ट्र जिल्ह्यात फिरुन आणि अभ्यास करुन घेतलेला आढावा या पुस्तकास आहेत.

### उत्कृष्ट ई-लर्निंग पुरस्कार - २०१५

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, परिंचे, ता. माढा, जि. सोलापूर येथील शिक्षक रणजितसिंह डिसले यांनी QR CODE चा वापर करुन एक अत्यंत सोपी आणि उपयुक्त प्रणाली तयार केली. मुलांना अभ्यासात उपयुक्त ठरेल, तसेच आशय असलेल्या संकेत स्थळांकडे त्यांना सहज जाता येईल, अशी त्याची रचना असल्यामुळे लहान वयोगटातील मुलांचाही ती वापरताना अडचण येणार नाही. ही प्रणाली ज्ञानार्जनासाठी मोबाईल उपकरणाच्या सहाय्याने अत्यंत प्रभावीपणे मदत करते. ज्यांच्याकडे इंटरनेच सुविधा नाही त्यांना Offline उपयुक्ततेची सोय यात असल्यामुळे सर्व आर्थिक गटातील मुलांना याचा फायदा घेता येईल. पालक व शिक्षक यांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आणि अडचणीचाही मागोवा या प्रणाकांतून घेता येऊ शकतो. उपलब्ध प्रणालीचा उपयोग अध्ययन अध्यापनात सृजनशील पध्दतीने करण्याचा श्री. डिसले यांचा हा उपक्रम अतिशय अभिनंदनीय आहे. यामुळे यांना ई. लर्निंगचा उत्कृष्ट पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

### काळानुरुप शिक्षणावर व्यापक चर्चा व्हावी - मा. सुप्रिया सुळे

'शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षितता' या विषयावरच्या परिषदा बोलत असताना शिक्षण विकास मंचच्या निमंत्रक खा. सुप्रिया सुळे यांनी काळानुरुप शिक्षणावर व्यापक चर्चा करण्याचे आवाहन उपस्थितांना केले. हल्लीचे युग माहिती तंत्रज्ञानामुळे

झपाट्याने बदलत आहे. त्यानुरुप वेगवेगळ्या समस्या गंभीर रुप घेऊन आपणांसमोर उभ्या आहेत यावर व्यापक चर्चा व्हायला हवी असे मत त्यांनी व्यक्त केले.

हल्लीची परिस्थिती आणि वाढते बलात्कार लक्षात घेता लैंगिक शिक्षणाची गरजआहे की काय ? असे वाटत आहे, त्यामुळे आता लैंगिक शिक्षणावर उघड चर्चा होण्याची गरज आहे. राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त घेण्यात आलेल्या परिषदेच्या दुसऱ्या सत्रात पुरस्कार वितरण समारंभानंतर त्या बोलत होत्या. एकीकडे पालकांनी आपल्या मुलांशी मोकळेपणाने चर्चा करावी. असे असताना प्रत्यक्ष पालक मात्र आपल्या मुला-मुलींशी शिक्षणावर फारसे उघडपणे बोलताना दिसत नाहीत. मात्र प्रसारमाध्यमे, व्हॉटस्ॲप, सोशल मिडीया आदी माध्यमातून आजची पिढी सर्व प्रकारची माहिती घेत असते. आजची किशोरवयीन पिढी तर मोबाईल इंटरनेटद्वारे खूपच फास्ट झाली आहे. हे विसरुन चालणार नाही. शाळकरी मुले अज्ञानी राहिलेली नाहीत, मात्र त्यांना योग्य वयात मार्गदर्शन करण्याची गरज आहे. प्रसारमाध्यमांकडून नको त्या गोष्टी आता चव्हाट्यावर आणल्या जात आहेत. त्याचे परिणाम विद्यार्थ्यांवर होत आहेत. सध्याच्या इंटरनेटच्या युगात विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिक्षणासंदर्भात नव्याने विचार करण्याची स्थिती तयार झाली आहे. मुलांची मानसिकता, त्यांना समाजात वावरताना पडणारे प्रश्न दरवेळी विचारात घेऊन त्या मुलांची सुरक्षितता पालकांनी लक्षात घेण्याची गरज असल्याचेही त्या म्हणाल्या. राज्यशासन आणि केंद्र सरकारकडून शिक्षणासाठी निधी कमी दिला जात आहे. शिक्षण हक्क कायद्यामार्फत मिळणारा प्राथमिकचा निधी आता माध्यमिक शाळांकडे वळवला जात आहे. शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार सर्वच शैक्षणिक स्तरावर करायला हवा. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यांसाठी शिक्षकांना प्रयोगशील उपक्रम राबविण्यासाठी खाजगी संस्थांची मदत घ्यावी लागत असल्याची खंतही सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली.

विद्यार्थ्यांची भावनिक आणि मानसिक सुरक्षितता या विषयावर समुपदेशक सुप्रिया नायर आणि मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आशिष देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. सुप्रिया नायर यांनी शालेय विद्यार्थ्यांचे सर्वांगीण हित आणि सुरक्षितता यांच्यावर परिणाम करणाऱ्या विविध घटकांवरचा उहापोह केला. डॉ. देशपांडे यांनी विद्यार्थ्यांच्या असुरक्षिततेमुळे विद्यार्थ्यांच्या मनावर आणि अभ्यासावर होणारा परिणाम या संदर्भात उपस्थितांना मार्गदर्शन केले. बालवयात नकळत बालकांकडून वारंवार होणाऱ्या चुका सुधारण्यासाठी शिक्षक आणि पालकांची भूमिका यासंदर्भात अनेक उपाययोजनांचा त्यांनी परिषदेत आढावा घेतला. प्रथमच्या विश्वस्त फरीदा लांबे यांनी बालहक्क संरक्षण कायदा यासंदर्भात माहिती दिली. पहिल्या सत्रात प्राथमिक विभागाचे संचालक महावीर माने, डॉ. मिनल नरवणे, सुचेता भवाळकर यांनी विद्यार्थ्यांची शालेय सुरक्षितता या विषयावर मार्गदर्शन केले.

परिषदेचा समारोप खुल्या चर्चेने झाला. परिषदेत उपस्थित असणाऱ्या प्रतिनिधींनी स्वत:चे प्रश्न, शंका या खुल्या अधिवेशनात उपस्थित केल्या. व्यासपीठावर असलेल्या तज्ज्ञांनी याला उत्तरे दिली. शिक्षण विकास मंचच्या विशेष सल्लागार बसंती रॉय यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### विशेष आढावा बैठक - २० जानेवारी २०१५

'शिक्षण विकास मंच'ची यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे विशेष आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मंचचे मुख्य संयोजक डॉ. वसंत काळपांडे हे होते. या बैठकीत राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त घेण्यात आलेल्या परिषदेच्या निर्णयांबाबत चर्चा झाली.

सद्यस्थितीत शासनाने शिक्षणासंदर्भात घेतलेले निर्णय, अंमलबजावणी यांचीही अनौपचारिक चर्चा यावेळी झाली. आगामी काळात पुणे, मुंबई येथे शिक्षण कट्ट्याचे आयोजन करण्याचे ठरले. शिक्षण कट्ट्याच्या विषयाबाबत तेथील प्रमुखांनी डॉ. वसंत काळपांडे सर यांच्या सोबत चर्चा करुन निवड करावी. नवीन वर्षात कोणकोणते कार्यक्रम घ्यावेत त्यांस किती आर्थिक सहाय्य लागेल यांची चर्चा झाली आणि निर्णय घेण्यात आले. या आढावा बैठकीस बसंती रॉय, दत्ता बाळसराफ, नज्मा काझी, सुरेश पाटील, मिनल सावंत, रमेश मोरे यांची उपस्थिती होती.

★★★

# सृजन
## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या 'सृजन' विभागातर्फे शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास आणि विविध कलांची तोंडओळख करुन त्यांचे विद्यार्थी जीवन समृध्द व्हावे याकरीता सृजन हा अभिनव उपक्रम चालविण्यात येतो. सर्जनशीलतेचा अविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्तकलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे.

सृजनची संकल्पना व संयोजन सौ. सुप्रियाताई सुळे यांची असून यामध्ये सुप्रसिध्द चित्रकार श्री. डग्लस जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंद जोग सन्माननीय सल्लागार म्हणून काम पाहतात. श्री. विद्याधर खंडे या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम करीत आहेत.

१३ सप्टेंबर २०१५ रोजी 'माती काम' या विषयावर सौ. समक्या आहिरे यांनी मुलांना मातीपासून विविध प्रकारची वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण दिले. मुलांनी या कार्यशाळेत मातीच्या छोट्या वस्तू आणि गणपती इ. प्रकारे बनविले.

४ ऑक्टोबर २०१६ रोजी शिटी वादन या विषयावर श्री. चैत्यन कल्याणपूरकर यांनी कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत शिटी वादनाचे अनेक प्रकारांबद्दल माहिती दिली. शिटी वाजवून अनेक गाणी कशी वाजवावी ही प्रात्यक्षिके दाखवून दिली.

आदरणीय श्री. शरद पवार साहेब यांचा अमृतमहोत्सवानिमित्त सृजन २०१५ च्या सांगता समारंभाच्या निमित्ताने ६ डिसेंबर २०१६ रोजी स्नेह संमेलनाचे आयोजन केले होते. यामध्ये श्री. प्रविण कामथे यांचा जादुचे प्रयोग आणि चार्ली चाप्लीन यांचा शो आयोजित करण्यात आला होता. मा. शरद पवार साहेबांवर आधारीत ६ मिनिटाची फिल्म यावेळी दाखविण्यात आली. कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेयपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले.

३ जानेवारी २०१६ रोजी योगाभ्यासावर कार्यशाळा आयोजित केलेली होती. श्री समर्थ व्यायाम मंदिरचे श्री. उदय देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना काही निवडक आसनाची प्रात्यक्षिके दाखवून विद्यार्थ्यांकडून ती करुन घेतली. अभ्यासामध्ये योगाची मदत कशी होईल हे ही यावेळी सांगितले.

मार्च ते मे या महिन्यात मुलांच्या वार्षिक परीक्षा आणि उन्हाळ्याची सुट्टी यामुळे तीन महिने सृजन कार्यशाळा आयोजित करण्यात येत नाही. सृजनाच्या कार्यशाळेत प्रत्येक सत्रात १२५ ते १५० च्या आसपास विद्यार्थ्यांचा सहभाग असतो.

★★★

# वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान
## कार्यवृत्त

**औषधी वनस्पती संवर्धन प्रकल्प (पुणे जिल्हा)**

पृथ्वीच्या वाढत्या तापमानामुळे हवामानात पराकोटीचे बदल होत आहेत. भारतात येणाऱ्या मोसमी पावसावर त्याचे विपरीत परिणाम आता दिसू लागले आहेत. महाराष्ट्राच्या मातीत वाढणाऱ्या आणि बदलत्या तापमानात टिकून राहणाऱ्या वृक्षवल्लींची लागवड करणे आणि गावा-गावात स्थानिक वनस्पतींच्या बियाणांचे जतन करणे हे वाढत्या तापमानाला आवर घालण्याचे थेट उत्तर आहे. या सर्व गोष्टींचा समग्र विचार करुन आपल्या भागातील खासदार, मा. सुप्रियाताई सुळे यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माध्यमातून औषधी वनस्पती संवर्धन प्रकल्प राबविण्याचा संकल्प केला आहे. याअंतर्गत, पुणे जिल्हा परिषदेच्या शाळा, खाजगी अनुदानित शाळा आणि महाविद्यालये तसेच नगरपालिका शाळांच्या परिसरात सावली देणाऱ्या आणि औषधी गुणधर्म असणाऱ्या वृक्ष-वनस्पतींची लागवड करण्यात येणार आहे. महाराष्ट्राचे भवितव्य घडविणारी विद्यार्थी पिढी अशा बहुगुणी सावलीत आणि निरोगी वातावरणात वाढावी हे या प्रकल्पाचे अंतिम ध्येय आहे. डिसेंबर महिन्यात या प्रकल्पाअंतर्गत पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये औषधी वनस्पतींचे वृक्षारोपण केले गेले. यासाठी पुणे जिल्ह्यातील दत्तक योजने अंतर्गत खासदार सुप्रिया सुळे यांनी दत्तक घेतलेल्या दापोडी या गावी दि. २६ डिसेंबर २०१५ रोजी वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याकरीता स्वीडन येथील फ्युचर अर्थ या संस्थेच्या कार्यकर्त्या श्रीम. एमिली या प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. त्यांनी वृक्षारोपणा सोबतच विद्यार्थ्यांना त्यांच्या देशाबद्दल माहिती दिली. शाळेतील विद्यार्थ्यांनी त्यांना विविध प्रश्न विचारुन स्वीडन या देशाबद्दल माहिती करुन घेतली. यावेळी कार्यक्रमात श्रीम. संगीता खरात यांनी औषधी वनस्पतींचे आपल्या आयुष्यातील महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाकरीता सरपंच, शाळा समितीचे अध्यक्ष, ग्रामसेविका यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाला कात्रज डेअरीचे अध्यक्ष मा. रामभाऊ दुले तसेच श्री. विलास लोंढे व इतर मान्यवर उपस्थित होते.

★★★

# कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम, मुंबई
## कार्यवृत्त

समाजातील गोरगरीब, दीनदुबळे व मागास वर्गाच्या लोकांना त्यांच्या आर्थिक अपात्रतेमुळे किंवा मागासलेपणामुळे अन्याय सहन करण्याची पाळी येऊ नये यासाठी उपाय योजावेत अशा प्रकारचे मार्गदर्शन आपल्या संविधानामध्ये करण्यात आले आहे. या तरतुदीला अनुसरुन भारतीय संसदेने १९८७ मध्ये विधी सेवा प्राधिकरण अधिनियम पारित केला आहे. त्या अधिनियमानुसार संपूर्ण देशामध्ये गरीब व तळागाळातील लोकांना मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला पुरविला जातो.

१९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमात अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने ''यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम' या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व समाजसेवक काम करीत असून ते आपली सेवा या योजनेसाठी देत आहेत.

**फोरमार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारची कामे केली जातात :-**

१. समाजातील गोर-गरीब व तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत तोंडी सल्ला देणे.
२. प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नांसंबंधी सखोल अभ्यास करुन गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.
३. काही वेळा पत्रव्यवहारद्वारे गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.
४. पक्षकाराच्या तंट्यामध्ये सामोपचाराने तडजोड घडवून आणणे.
५. विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा सूचविणे किंवा नवीन कायद्याचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.
६. कायद्यांची विशेष माहिति करुन देण्यासाठी तज्ज्ञांची विशेष व्याख्याने आयोजित करणे.
७. सामान्य लोकांना कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी राज्याच्या वेगवेगळया ठिकाणी वेळोवेळी विधी साक्षरता कार्यशाळांचे आयोजन करणे.
८. संबंधित न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या सहकार्याने लोकन्यायालयाचे आयोजन करणे.
९. विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मूट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे. तसेच अशा विद्यार्थ्यांसाठी वकिलांची व्यावसायिक नितिमत्ता या विषयावर परिसंवादाचे आयोजन करणे.

त्यानुसार गेल्या पाच महिन्यांत म्हणजेच १ सप्टेंबर २०१५ ते ३१ जानेवारी २०१६ या अवधीमध्ये फोरमकडून करण्यात आलेल्या कामांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**फोरमच्या बैठका :-** कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजनेच्या अंमलबजावणीबाबत विचार करुन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुसऱ्या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतल्या जातात. त्यानुसार गेल्या सात महिन्यांमध्ये दि. ११-९-२०१५, ०९.१०.२०१५, २०.११.२०१५, ११.१२.२०१५ व ०८.१.२०१६ अशा एकूण पाच बैठका झाल्या. सरासरी ९ सदस्य प्रत्येक बैठकीला उपस्थित होते. एकूण ८९ बाबींसंबंधी निर्णय घेण्यात आले.

**उपसमितीच्या बैठका :-** एखाद्या विषयासंबंधी सखोल अभ्यास करुन प्रस्ताव तयार करण्यासाठी वेळोवेळी फोरमच्या

वेगवेगळ्या उपसमित्या नेमल्या जातात व आवश्यकतेनुसार त्यांच्या बैठका घेतल्या जातात. त्यानुसार उपसमित्यांच्या बैठका झाल्या.

- **विभागांची बैठक** : दि. १४ जुलै २०१५ रोजी सकाळी ११.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत चव्हाण केंद्राच्या पाचव्या मजल्यावरील बोर्ड रुममध्ये मा. श्री. शरद काळे यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नागरीक आनंद मेळावा २०१५ च्या आयोजनासंबंधी विचार करण्यासाठी प्रतिष्ठानच्या सर्व विभागांची बैठक झाली. अंदाजे ३९ बाबीसंबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले. १५ प्रतिनिधी बैठकीला उपस्थित होते.

- **ज्येष्ठ नागरीक प्रतिनिधींची बैठक** : ज्येष्ठ नागरीक आनंद मेळावा २०१५ च्या आयोजनासंबंधी विचार करण्यासाठी दिनांक २२ जुलै २०१५ रोजी नेहरु नगर, कुर्ला (पूर्व), मुंबई येथे कुर्ला ते मुलुंड व नवी मुंबई या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरीक संघाच्या प्रतिनिधींची बैठक झाली. अंदाजे ३५ प्रतिनिधी उपस्थित होते. ४० बाबींसंबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले. बैठकीचे अध्यक्षपद श्री. विजय औंधे यांनी भूषविले होते.

**कायदेविषयक सल्ला केंद्र :-**

गोरगरीब व सामान्य लोकांना कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.३० वाजता चव्हाण केंद्राच्या दुसऱ्या मजल्यावर प्रतिष्ठानच्या ग्रंथालयामध्ये कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र चालविले जाते. गेल्या पाच महिन्यांमध्ये या केंद्राच्या २१ बैठका झाल्या. अंदाजे ३१ लोकांनी या केंद्रामध्ये येऊन मोफत सल्ल्याचा लाभ घेतला आहे. या केंद्राचे काम सर्वश्री म. बा. पवार, भूपेश सामंत व श्रीमती प्रितंदर सिंग इत्यादी वकिलांनी पाहिले.

**आपल्या कायद्याची माहिती करुन घ्या. (know your Law Lecture Series) :-** या व्याख्यानमाले अंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यातून एकदा कायदेपंडितांचे विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते.

**विधी साक्षरता कार्यशाळा :-**

लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधीत असलेल्या कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळ्या घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ - पौगंडावस्थेतील मुले व मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरीक, महिला, सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सदस्य, सार्वजनिक न्यासाचे विश्वस्त, सार्वजनिक संस्थांचे सदस्य आणि सर्वसामान्य जनता इत्यादी घटकांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गेल्या सात महिन्यांमध्ये अशा प्रकारच्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये खालील कार्यक्रमांचा समावेश आहे.

१. फोरम व ओरिएन्टल कॉलेज ऑफ एज्युकेशन, सानपाडा, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. १८ ऑक्टोबर, २०१५ रोजी ओरिएन्टल कॉलेज ऑफ एज्युकेशन, सानपाडा, मुंबई येथे बी.एड. च्या मुलींसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त मुली कार्यक्रमात उपस्थित होत्या.
२. फोरम व सक्षम सामाजिक संस्था, विक्रोळी (पश्चिम), मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुषांसाठी रविवार दि. १५ नोव्हेंबर २०१५ रोजी सक्षम सामाजिक संस्था, पार्क साईट, विक्रोळी (पश्चिम), मुंबई येथे एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० महिला व पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते.
३. फोरम व मैत्री संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुषांसाठी रविवार दि. २२ नोव्हेंबर २०१५ रोजी डॉ. शिरोडकर हायस्कूल, के.ई.एम. हॉस्पिटल जवळ, परेल, मुंबई येथे एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन

करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त स्त्री-पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते.

४. फोरम व राष्ट्रपिता महात्मा गांधी प्रतिष्ठान, बदलापूर (पूर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुषांसाठी रविवार, दि. २९ नोव्हेंबर २०१५ रोजी आदर्श विद्यालय, कुळगांव बदलापूर (पूर्व), ठाणे येथे एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त स्त्री-पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते.

५. फोरम व स्वयंम फाऊंडेशन, कामाठीपुरा, भायखळा (पश्चिम), मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुषांसाठी रविवार, दि. ३ जानेवारी २०१६ रोजी स्वयंम फाऊंडेशन, दुसरी कामाठीपुरा गल्ली, नागपाडा, भायखळा (पश्चिम), मुंबई येथे एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ९० पेक्षा जास्त स्त्री-पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते.

६. फोरम व रोटरी क्लब ऑफ डोंबिवली (पूर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी (मुले व मुली) रविवार, दि. १० जानेवारी २०१६ रोजी रोटरी क्लब ऑफ डोंबिवली, रोटरी भवन, पेंढारकर कॉलेजच्या समोर. एम.आय.डी.सी., डोंबिवली (पूर्व) येथे एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त महाविद्यालयीन विद्यार्थी (मुले व मुली) या कार्यक्रमाला उपस्थित होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते.

७. फोरम व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने महिला बचत गटातील महिला, महाविद्यालयीन शिक्षण व शिक्षिका, महाविद्यालयीन विद्यार्थी (मुले व मुली) यांच्यांसाठी रविवार, दि. १७ जानेवारी २०१६ रोजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे येथे एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. २०० पेक्षा जास्त महिला बचत गटातील महिला, महाविद्यालयीन शिक्षण व शिक्षिका, महाविद्यालयीन विद्यार्थी (मुले व मुली) कार्यक्रमाला उपस्थित होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते.

८. फोरम व जितेंद्र चौहान कॉलेज ऑफ लॉ, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने लॉ विद्यार्थ्यांसाठी (मुले व मुली) शनिवार, दि. २३ जानेवारी २०१६ रोजी जितेंद्र चौहान कॉलेज ऑफ लॉ, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई येथे एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त लॉ विद्यार्थी (मुले व मुली) या कार्यक्रमाला उपस्थित होते. व्याख्यानाचे इंग्रजी मराठी होते.

**शपथ कार्यक्रम** :- सर्व विधी साक्षरता कार्यशाळांमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेचे सांधिक वाचन करण्यात येते. तसेच संविधानातील मुलभूत कर्तव्य पालनासंबंधी शपथा घेण्यात येतात. त्याचप्रमाणे अविवाहित मुले व मुली यांच्याकडून हुंडाबंदीसंबंधी शपथा घेण्यात येतात. वरील सर्व कार्यक्रमांमध्ये हे सर्व काम करण्यात आले व शपथा घेण्यात आल्या.

**कार्यशाळेमध्ये शिकविलेले कायदे** :- विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यासंबंधी माहिती करुन देण्यात येते त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा समावेश असतो. (१) भारतीय संविधान, (२) विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७, (३) हुंडाबंदी अधिनियम १९६१, (४) भारतीय दंड संहिता १८६० (५) ग्राहक संरक्षण कायदा १९८६, (६) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (७) हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ व इच्छा पत्र कायदा, (८) गुंतवणूकीसंबंधीचे नियम, (९) कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५, (१०) माहितीचा अधिकार कायदा २००५, (११) हिंदू विवाह कायदा १९५५, (१२)

मुस्लीम कायदा, (१३) पोटगी संबंधीचे कायदे, (१४) महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३, (१५) हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६, (१६) हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम १९५६, (१७) संपत्ती हस्तांतरण अधिनियम १८८२, (१८) विशेष विवाह अधिनियम १९५४, (१९) बाल विवाह बंदी अधिनियम २००५, (२०) महाराष्ट्र विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी अधिनियम १९८८, (२१) न्यायालयांची बहुस्तरीय व्यवस्था (तालुका न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतची माहिती), (२२) स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिबंध) अधिनियम १९५६, (२३) विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम १९९५, The Persons with Disabilities (Equal opportunities, Protection of Rights and Full Participation) Act, 1995 (२४) स्वमग्न असलेल्या, मस्तिष्क घात झालेल्या, मतिमंद व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरीता राष्ट्रीय न्याय अधिनियम १९९९, (The National Trust for Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act, 1999) (२५) अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (The Immoral Traffic (Prevention) Act, 1956 (२६) राष्ट्रप्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१, (२७) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, (२८) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॉपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७, (२९) महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९, (३०) महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२, (३१) मुंबई विद्यापीठाचे अध्यादेश क्रमांक २२० (अनुचित प्रथा प्रतिबंध), (३२) मुस्लिम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम १९८६, (३३) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्रविकास) अधिनियम १९७१, (३४) भारतीय वारसा हक्क कायदा १९२५, (३५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, (३६) मुंबई मुद्रांक कायदा १९५८, (३७) गृहनिर्माण संस्थांचे विनियम, (३८) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९, (३९) मुस्लिम व्यक्ती विषयक विधी (शरियत) प्रयुक्ती अधिनियम १९३७, (४०) नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, (४१) भारतीय मुद्रांक कायदा १८९९, (४२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, (४३) प्रसूती विषयक लाभ अधिनियम १९६१, (४४) सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०, (४५) अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, (४६) मोटर वाहन अधिनियम १९८८, (४७) जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९, (४८) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, (४९) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९, (५०) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, (५१) माता पिता व ज्येष्ठ नागरीक यांची पोटगी व कल्याण अधिनियम २००७, (५२) मुंबई पोलीस अधिनियम, १९५० व (५३) कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारे लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा २०१४.

★★★

# महाराष्ट्र महिला व्यासपीठ
## कार्यवृत्त

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्यावतीने महिलांची शारिरीक, मानसिक, आर्थिक, सामाजिक विविध दृष्टीने सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, विविध कार्यशाळा आणि इतर कार्यक्रम यांच्या माध्यमातून कृतीशील प्रयत्न केले जातात. संयोजिका रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका ममता रमेशचंद्र कानडे महिला व्यासपीठाचे काम पाहतात. त्यांना संजना संतोष पवार यांचे सहकार्य असते.

स्त्रियांचा छंद, आवडीनिवडी लक्षात घेऊन व त्यातूनच तिला अर्थाजनाचे सहाय्य कसे मिळेल यासाठी व्यासपीठातर्फे विविध प्रशिक्षण व कार्यशाळांचे आयोजन केले जाते. आमच्या सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण अभ्यासक्रम या कार्यशाळेचे १६ वर्ग यशस्वी झाले व आतापर्यंत ५०० हून अधिक लोकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे. १७ व्या वर्गाची नोंदणी सुरु आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थाकडून त्यांच्या कामकाजाकरीता प्रशिक्षित व्यवस्थापकांची मागणी वाढू लागली आहे. त्यामुळेच पूर्णवेळ, अर्धवेळ व्यवस्थापक तसेच सल्लागार म्हणून या क्षेत्रामध्ये रोजगाराच्या अनेक संधी शिक्षित लोकांसाठी उपलब्ध आहेत. स्त्रियांचा त्याचबरोबर समाजाचा सर्वांगीण विकास हेच उद्दिष्ट समोर ठेवून आम्ही स्त्री व पुरुष ह्या सर्वांना उपयुक्त असे सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण सुरु केले. आज आमच्या इथून प्रशिक्षण घेतलेल्या स्त्रिया व पुरुष अनेक गृहनिर्माण संस्थेत व्यवस्थापक म्हणून काम पाहत आहेत. संस्थेचे हिशोब व इतर महत्त्वाच्या जबाबदाऱ्याही पार पाडत आहेत. आमच्या काही महिलांनी स्वत:ची सल्लेविषयक संस्था हि सुरु केली आहे. स्त्रियांसाठी सुरु केलेले हे प्रशिक्षण पुरुषांना हि मोलाचे ठरले. आतापर्यंत पाचशे लोकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. प्रशिक्षणानंतर परीक्षा घेतली जाते व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाते.

इकेबना, बोन्साय, वारली रंगकला तसेच मधुबनी रंगकाम या पारंपारिक कार्यशाळा तर आम्ही घेत असतोच पण या वर्गाबरोबरच इतर नवीन कला लोकांना शिकण्यास मिळावी असा आमचा प्रयत्न असतो.

श्री गणेश चतुर्थीच्या निमित्ताने वर्तमानपत्रापासून तयार केलेली बास्केट, टेराकोटा, दागिने व पेपर क्विलिंग कला या माध्यमाने गणेशाचे स्वागत आणि आरास कशी करावी या आगळ्या वेगळ्या प्रात्यक्षिकाचे आयोजन दिनांक २४ ऑगस्ट २०१५ रोजी करण्यात आले. ४६ महिलांचा या प्रात्यक्षिकाचा लाभ घेतला होता व त्याच दिवशी या प्रत्येक प्रात्यक्षिकासाठी महिलांनी नोंदणी केली.

दिनांक ३ व १० सप्टेंबर रोजी वर्तमानपत्रापासून दीर्घकाळ बास्केट ची कार्यशाळा घेण्यात आली. वर्तमानपत्राच्या ३०० ते ५०० सुरळ्या करायच्या व त्याचे नंतर बास्केट विणायचे, नंतर रंग लावून वॉर्निश लावले की झाले मजबूत बास्केट तयार.

दिनांक ४ व ९ सप्टेंबर रोजी पेपर क्विलिंग या कार्यशाळेचे वर्ग घेण्यात आले. रंगीत पेपरच्या पट्ट्यापासून वेगवेगळ्या वस्तू बनवण्याची ही कला आहे. कल्पकता वापरुन दिव्या भोवतालची आरास, दागिने, ग्रिटींग कार्ड सजावट, फोटो फ्रेम अश्या अनेक वस्ती महिलांनी बनविल्या.

दिनांक ५ व ८ ऑक्टोबर रोजी टेराकोटा या मातीपासून दागिने बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली. ही माती दोन प्रकारात उपलब्ध असते. एका प्रकारात या मातीला आकार देऊन हवेवर वाळविता येते. तर दुसऱ्या प्रकारात दागिने बनवून लाकडाच्या भुशामध्ये भाजायचे व नंतर हवा तो रंग द्यायचा व रंगीत मणी, तार वापरुन गंफून दागिने घालण्यास तयार महिलांना आपल्या कपड्याच्या रंगाप्रमाणे दागिने बनविता येतात. हे दागिने अतिशय कमी खर्चात तयार होतात व हे दागिने विकून चांगला फायदा मिळविता येतो.

दिनांक २०, २३ व २६ ऑक्टोबर रोजी गिफ्ट रॅपिंग या कार्यशाळाचे वर्ग घेण्यात आले. सात ते आठ प्रकारच्या

आकाराचे बॉक्स बनवून त्याला रंगीत पेपर लावून सुशोभित करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. गोल, लंबगोल, चौकोन, आयत, हार्ट शेप असे वेगवेगळे बॉक्स महिलांनी स्वत: करुन सुशोभित केले. बॉक्सेस बनविण्याचे काम बऱ्या कंपन्याकडून मिळू शकते व घरबसल्या महिलांना आर्थिक लाभ मिळू शकतो.

दिनांक २७ व २९ ऑक्टोबर रोजी ग्लास पेंटिंग ची कार्यशाळा घेण्यात आली. स्टेन ग्लास व खास प्रकारचे रंग हे माध्यम वापरुन महिलांनी चहाचे ट्रे व फ्रेम्स बनविल्या. हे ट्रे व फ्रेम्स मार्केटमध्ये वेगवेगळ्या प्रदर्शनात विक्रीस ठेऊन किंवा लग्नकार्य, वाढदिवस अश्या कार्यक्रमासाठी येणाऱ्या पाहुण्यांना एक चांगली रिटन गिफ्ट होऊ शकते.

ख्रिसमस या सणानिमित्त १० डिसेंबर रोजी एगलेस/ एग ब्राऊनिज, कप केक, कुकीज व आयसिंग चे एक दिवसीय प्रात्यक्षिक ठेवण्यात आले. या कार्यक्रमाला भरघोस प्रतिसाद मिळाला. हे सर्व पदार्थ सर्व मुलांना नाहीतर मोठ्यांनाही आवडीचे आहेत. त्यामुळे त्याची ऑर्डर घेऊन घरबसल्या महिला आपल्या संसाराला आर्थिक लाभ मिळवून देऊ शकतात.

ही वर नमूद केलेली प्रशिक्षणे अत्यंत माफक फी मध्ये ना नफा ना नोटा या तत्त्वावर सुरु आहेत. वेळोवेळी आम्ही नामांकित संस्था उदा. 'इकेनाबा' साठी 'बॉम्बे चॅप्टर स्कूल ऑफ ओहरा' व 'बोन्साय' साठी 'इंडो जपान असोसिएशन' यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम पार पडले आहेत. वरील विविध संपन्न कार्यशाळेला आम्हाला प्रियांका घरत या तरुण प्रशिक्षिकेचे मार्गदर्शन मिळाले व बेकरी प्रात्यक्षिके अंजुम पीरभॉय यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी झाले.

या सर्व प्रशिक्षणात आम्ही प्रशिक्षणार्थीची संख्या मर्यादित ठेवली आहेत. त्यांची यादी पुढीलप्रमाणे :

| अ. क्र. | प्रशिक्षणाचे नांव | सहभागी प्रशिक्षणार्थी संख्या | प्रशिक्षणाचे दिवस |
|---|---|---|---|
| १. | पेपर बास्केट | २३ | २ |
| २. | पेपर क्विलिन्ग | २० | २ |
| ३. | टेराकोटा | १८ | २ |
| ४. | गिफ्ट रॅपिंग | १० | ३ |
| ५. | ग्लास पेंटिंग | १५ | २ |
| ६. | बेकरी प्रात्यक्षिक | ६० | १ |

खूप मोठ्या प्रमाणात नाही पण ज्या समाजात आपण वावरतो व ज्याच्याकडून आम्हालाही खूप काही शिकायला मिळत, त्या समाजाचे देणे परत करणे, हा आमचा खारीचा नाही पण मुंगीचा वाटा नक्की आहे. आजही आमच्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीकडून आम्हाला आमच्या कामाची मिळालेली दाद व भविष्यासाठीच्या शुभेच्छा हेच आमचे उद्दिष्ट सफल करते.

★★★

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय
## कार्यवृत्त

डॉ. एस. आर. रंगनाथन हे भारतीय गणिततज्ज्ञ व ग्रंथालयतज्ज्ञ होते. भारतीयांमध्ये वाचन संस्कृती अधिकाधिक रुजावी म्हणून डॉ. रंगनाथन यांनी ग्रंथालय शास्त्र आणि त्यांच्या विकासात मोलाचे योगदान दिले. यांचा जन्म १२ ऑगस्ट १८९२ साली मद्रास येथील शियाली या गावी झाला. देशातील सर्वसामान्यांना ज्ञानाचे कवाड विनामूल्य खुली करण्याचा विचार सर्वप्रथम डॉ. रंगनाथन यांनी रुजवला. यांचा जन्मदिवस भारतभर ''नॅशनल लॉब्ररीयन डे'' म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालयाने प्रतिष्ठानच्या पुस्तकांचे प्रदर्शन केले.

२६ नोव्हेंबर रोजी संविधान दिवसांचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालकांच्या सूचनेनुसार राज्यभर जिल्हा ग्रंथालयाच्यावतीने संविधानात दिन साजरा केला गेला.

थोर नाटककार विल्यम शेक्सपिअर यांचा वाढदिवसाच्या दिवशी यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालयाच्या माध्यमातून ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले,

जीवनाच्या जवळजवळ सर्वच क्षेत्रात आता संगणकाचा उपयोग केला जात आहे. ग्रंथालयाच्या संगणकीकरणाचे तंत्र वेगळे आहे. ग्रंथालयातील दैनंदिन कामकाजाचा आढावा घेऊन त्याची निर्मिती करावी लागते.

**ग्रंथोपार्जन** : ग्रंथोपार्जन विभागासाठी तयार केलेली संगणक प्रणालीची रचना ही सेवक वर्गाला पुढील दैनंदिन कामे करण्यात मदत करते.

- पुस्तकांच्या मागणीचे व्यवस्थापन
- साहित्य प्राप्ती.
- दयेक अदा करणे व अंदाजपत्रकातील खर्चावर नियंत्रण करणे.
- विविध मास्टर फाईल्यचे व्यवस्थापन उदा. विनिमय दर टेबल पुस्तक विक्रेता प्रकाशक आणि त्याचे एजंटस इत्यादी.
- पुस्तक दाखल नोंद वही इत्यादी.

**तालिकीकरण :-**

तालिकीकरण ही संगणक प्रणाली वापरुन पुस्तकांचे पूर्वलक्ष तालिकीकरण करता येते. पुस्तकाचे ग्रंथोपस्कार केलेल्या कामाची छपाई पुस्तकांचा दाखला अंक व ग्रंथनामानुसार शोध घेणे प्रकाशकासाठी तसेच विषयक्रम यासाठी ॲथॉरीटी फाईल तयार करुन ओपॅक द्वारे वाचकांना उपलब्ध करुन देण्याचे काम ग्रंथालय करत आहे.

**Web OPAC ऑनलाईन :**

Web OPAC ऑनलाईन पब्लिक ॲक्सेस तालिका संगणक प्रणाली वापरुन ग्रंथालयाचे वाचन साहित्य पाहणे शक्य आहे. वाचकाभिमुख मेनुच्या मदतीने ग्रंथालयातील वाचन साहित्य हे लेखक, ग्रंथनाम, विषय, प्रकाशकाचे नाव, वर्गीकरण नंबर, वर्षे तसेच आयएसबीएन नुसार शोधण्याकरीता Web OPAC व्यवस्था करण्यात आली आहे.

**Classiffication (वर्गीकरण) :**

Classiffication (वर्गीकरण) - यशवंतराव चव्हाण ग्रंथालयामध्ये DDC-23 नुसार वर्गीकरण करण्यात आलेले आहे. त्यानुसारच पुस्तकांची तसेच वाहन साहित्यांची मांडणी करण्यात आलेली आहे. वर्गीकरण पध्दतीमुळे वाचन साहित्य शोधण्यास वाचकाला तसेच सेवक वर्गाला सोपे जाते.

**Barcoding (बारकोडींग) :**

Barcoding (बारकोडींग) ग्रंथालयात दाखल झालेल्या प्रत्येक पुस्तकाचे तसेच सदस्याचे ओळखपत्र बारकोड पध्दतीने तयार केले जात असल्यामुळे त्यात कोणत्याही प्रकारची त्रुटी

होत नाही. या पध्दतीत प्रत्येक वाचनसाहित्याला तसेच वाचकाला हा वेगवेगळा बारकोड असतो. त्यामुळे ग्रंथालयीन कामात दिरंगाई होत नाही. आणि देवघेव पध्दती सोयीस्कर होते.

**Scan (स्कॅन मशीन) :**

पूर्वी ग्रंथालयात महत्त्वाची कागदपत्र ही झेरॉक्स मशीनचा वापर करुन संग्रहीत केली जात होती. आता ती Scan स्कॅन मशीनच्या माध्यमातून संगणकात संग्रहीत केली जात आहे. त्यांना एक विशिष्ट क्रमांक देण्यात येतो. त्यामुळे गरजेच्या वेळी ती कागदपत्रे शोधतांना वेळ लागत नाही. यशवंतराव चव्हाण ग्रंथालयीन कमकाज पेपेरलेसकडे वाटचाल करत आहे. हा त्याचाच एक भाग म्हणून प्रयत्न केला गेला आहे.

**Delnet सुविधा :**

Delnet सुविधा यशवंतराव चव्हाण ग्रंथालयामार्फत वाचकांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामुळे वाचकांना हवी असलेली माहिती कमी वेळेत उपलब्ध होते.

★★★

# माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी
## कार्यवृत्त

१. ऑगस्ट २०१५ ते फेब्रुवारी २०१६ दरम्यान झालेल्या प्रशिक्षणाची गणती खालीलप्रमाणे :

**a. सी-डॅक - ०६**

**b. खास प्रशिक्षणे - ०५**

**सी-डॅक कोर्सेस**

२. Post Graduate Diploma In Advance Computering (PG-DAC) कोर्सची नवीन बॅच ऑगस्ट २०१५ पासून सुरु झाली. ७२ विद्यार्थी ह्या कोर्समध्ये सहभागी झालेत.

३. त्यांना वेगवेगळ्या विषयांवर व्याख्यानमाला आयोजित केल्या गेल्या. ज्याचा त्याना प्लेसमेंट प्रोग्रामसाठी फायदा झाला.

४. PG-DAC ऑगस्ट २०१५ बॅचचे विद्यार्थी Essel World सहलीसाठी गेले होते. सर्वांनी सहलीचा आनंद घेतला.

५. PG-DAC ऑगस्ट २०१५ बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी समारोप समारंभ ३१ जानेवारी २०१६ ला आयोजित केला होता.

६. ऑगस्ट २०१५ बॅचच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी कॉम प्लेसमेंट प्रोग्राम २ फेब्रुवारी २०१६ पासून सुरु झाला.

७. PG-DAC कोर्समध्ये अॅडमिशन मिळविण्याकरीता प्रवेश परीक्षा देणे आवश्यक असते. हि प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होता यावी म्हणून आपल्याकडे Pre-DAC कोर्स चालविला जातो. ह्या कोर्सची एक बॅच घेण्यात आली.

८. पूर्वपरीक्षा PG-DAC कोर्ससाठी ता. १३ डिसेंबर २०१५ ला घेण्यात आली. साधारण १४० विद्यार्थी या परीक्षेला उपस्थित होते.

९. Diploma In advance Computering (PG-DAC) या कोर्सची नवीन बॅच १६ फेब्रुवारी २०१६ ला सुरु झाली. त्यात ६७ अॅडमिशन झाले.

१०. Diploma in Advanced Computer Arts (DACA) कोर्सची नवीन बॅच ऑगस्ट २०१५ मध्ये सुरु झाली.

११. या बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळी मोडूलस घेतली आणि त्यात या मुलांनी चांगली कामगिरी दाखवली.

१२. ऑक्टोबर व नोव्हेंबर २०१५ मध्ये मल्टिमिडिया क्रिएशन कोर्सच्या नवीन बॅचेस सुरु करण्यात आल्या.

**वाय सी पी कोर्सेस :**

१३. Certificate Course inAdvance Computring (CCAC) या कोर्सची नवीन बॅच १८ ऑगस्ट २०१५ ला सुरु झाली. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रात चांगल्या हुद्यावर नोकरी मिळवण्यात ए.आय.टी. ला यश आले.

**एम. के. सी. एल. कोर्सेस :**

१४. प्रतिष्ठानतर्फे चालविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र ज्ञान महामंडळने खालील अभ्यासक्रम यशस्वी करण्यासाठी अकादमीने संपूर्ण सहाय्य केले. त्यात प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे:

a. MS-CIT 06
b. WAVE Course 06
c. KLic Diploma 03

१५. MS-CIT हा कोर्स लोकप्रिय असून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

१६. MKCL संयुक्त विद्यमाने MS-CIT, आणि WAVE KLic अभ्यासक्रम २०१६ मध्ये आपल्याकडे चालविण्याची परवानगी मिळाली. याचा भविष्यात अनेक विद्यार्थ्यांना फायदा होईल.

१७. MKCL चा KLic Diploma फेब्रुवारी २०१६ ला सुरु होणार असून हा कोर्स सहा महिन्यांचा (अर्धवेळ)

आहे.

१८. वेगवेगळ्या विषयांवर सेमिनार व कार्यशाळा घेऊन प्रतिष्ठानने MKCL नेटवर्कमध्ये नाव उज्ज्वल केले.

**मोफत कार्यशाळा आणि सेमिनार :**

१९. JAVA Technology वर मोफत एकदिवसीय कार्यशाळा दि. ११ सप्टेंबर २०१५ ला DATTA MEGHE COLLEGE OF ENGINEERING मध्ये आयोजित केले होते. त्याला कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.

**आगामी कार्यक्रम :**

२०. गरजू विद्यार्थ्यांना माफक दरामध्ये शिक्षण उपलब्ध करुन देण्याची संधी AIT ने दिली. अनेक कोर्सेसमध्ये अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांना पडताळणीनंतर माफक दरात प्रवेश देण्यात येतो. तसेच ज्येष्ठ नागरीक व शारिरीक अपंगत्व असणाऱ्या व्यक्तीसाठीही खास सवलत देण्यात येते. इच्छुक आणि शैक्षणिक पात्रता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हप्त्याने फी भरण्याची सुविधा देण्यात येईल.

२१. मोफत कार्यशाळा फेब्रुवारी व मार्च २०१६ ला इंजिनिअरींग कॉलेजमध्ये चालविण्यात येणार आहेत.

२२. उन्हाळी सुट्टीचे खास वर्ग प्रतिष्ठान आणि ए. आय. टी. तर्फे आयोजित करण्यात येत आहेत.

२३. कॉर्पोरेट क्षेत्रात उत्तरोत्तर प्रगती करण्याचा ए.आय.टी. चा मानस आहे.

**उद्देश :**

२४. AIT हि संस्था मुलांची गुणवत्ता धोरण ठरवून मुलांना सर्वोत्तम प्रशिक्षण वितरीत करण्यासाठी तयार असते.

★★★

# विभागीय केंद्र, पुणे
# कार्यवृत्त

### स्मार्ट सिटी पुणेकरांचीच

दि. २५ सप्टेंबर रोजी वरील विषयावर एक चर्चासत्र आयोजण्यात आले होते. त्यामध्ये चार्टेड अकौटंट, माजी प्राध्यापक, प्राचार्य, व्यवस्थापकीय संचालक (साखर कारखाना) सर्टिफाईड ऑडीटर्स, नागरी सहकारी बँक संचालक, शासकीय अधिकारी, इत्यादींनी सुचविलेल्या सुचना एकत्रित करुन त्याचा अहवाल आयुक्त पुणे, महानगरपालिका पुणे यांना सादर करण्यात आला.

### यशवंतराव चव्हाण विभागीय पुरस्कार

यंदापासून या पुरस्काराचे वितरण सुरु करण्यात आले असून त्यासाठी

१. मराठी साहित्य संस्कृती, कला, क्रिडा,

२. ग्रामीण विकास / आर्थिक - सामाजिक;

३. सामाजिक एकात्मका/विज्ञान - तंत्रज्ञान;

४. कृषी औद्योगिक समाज रचना/व्यवस्थापन-प्रशासन, या विषयावर ज्यानी (संस्था व व्यक्ती) कार्य केले आहे त्यांचेकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. एकूण १ ३ प्रस्ताव प्राप्त झाले. त्यांची छाननी करुन सदर प्रकरण योग्य त्या निवडीसाठी मुख्यालयास शिफारस करण्यात आले होते. त्यामध्ये परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात संस्था व व्यक्ती फारसा प्रतिसाद देत नाहीत असे आढळून आले आहे. शिफारशी नुसार निवडलेले साहित्यिक श्री. दिपक चैतन्य यांना दिनांक २५ नोव्हेंबर १५ रोज यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी दिनी रु. १५,०००/- चा पुरस्कार दिला. तसेच महात्मा जोतीबा सावित्री जीवन व कार्य या विषयावरील निबंध स्पर्धेतील पात्र शिक्षक व विद्यार्थी यांचे पारितोषिक वितरण शिक्षण तज्ञ डॉ. न. म. जोशी यांचेहस्ते; मा. अंकुश काकडे यांचे उपस्थितीत करण्यात आले.

### कार्यशाळा :

विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी मनशक्ती लोणावळा येथे 'परीक्षा यशप्राप्ती' यावर श्री. शर्वरी यांनी मार्गदर्शन केले. त्वचेची काळजी कशी घ्यावी यांचे विवेचन डॉ. धनश्री भिडे या त्वचा रोगतत्र यांनी करुन त्वचेचे आरोग्यासाठी काय उपाय करावेत यावर विवेचन केले. तर ब्रम्हविद्या प्रसारक श्री. मुंजाळ यांनी श्वसनाच्या व्यायामाची वेगवेगळी प्रात्यक्षिके उपस्थितांचे कडून करुन घेतली. भिडे परिवारतर्फे सर्व पारितोषिके विजेते तसेच स्पर्धा शिक्षक आणि अध्यक्ष व मान्यवरांनाही त्यांचे विनंतीनुसार कॉ. गोविंद पानसरे यांचे शिवाजी कोण होता ? ही पुस्तिका वाटण्यात आली.

### पर्वती चढणे उतरणे स्पर्धा

दरवर्षीप्रमाणे वरील स्पर्धा दि. १४ नोव्हेंबर रोजी घेण्यात आली. त्यामध्ये एकूण १२० नागरीकांनी सहभाग गेतला. बक्षीस समारंभ दि. ४ जानेवारी २०१६ रोजी झाला. त्यासाठी वयोवृध्द श्री. गणेश दिनकर तसेच जयप्रकाश सुराणा हे प्रमुख पाहुणे होते. यंदाचा पर्वतीभूषण पुरस्कार रमेश गोविंद देव यांना प्रदान करण्यात आला. या समारंभाचे आयोजन श्री. शांतिलाल सुरतवाला यांनी केले.

### राज्य जलसंपत्ती प्रारुर आराखडा (गोदावरी खोरे)

दिनांक ५ सप्टेंबर २०१५ रोजी, डॉ. दि. मा. मोरे माजी मुख्य अभियंता यांचे वरील विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. अध्यक्षस्थानी अरविंद कृषी (मुक्तभाषी) विद्यापीठ नागपूरचे कुलगुरु डॉ. मुकूंदराव गायकवाड हे होते. सदर व्याख्यानानंतर प्रारुप आराखड्यावर चर्चा झाली. या चर्चेचे अनुषंगाने चर्चेमध्ये आलेल्या सूचनांचे संकलन करुन तो सचिव जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन यांना पाठविण्यात आला.

**क व ड निवडणूक वर्गातील सहकारी संस्था निवडणूका**

दिनांक २ जानेवारी २०१५ रोजी वरील विषयाची चर्चा करण्यासाठी कृषी व सहकार व्यासपीठाची सभा आयोजित केली होती. सदर चर्चेस अनुसरुन भारतीय संविधान दुरुस्तीमुळे शासन यंत्रणेमार्फत सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्याचे बंधन आल्यामुळे, त्यामुळे होणारा खर्च शासनानेच उचलणे योग्य असल्याचे स्पष्ट करुन निदान ज्या संस्था तोट्यात आहेत व त्यांचेकडे निवडणूक निधी भरण्यास रक्कम उपलब्ध नाही त्यांचा खर्च शासनाने करण्याची तरतूद निवडणूक नियमांत Exemption च्या रुपाने करण्याचे सुचविण्यात आले. गृहनिर्माण संस्थासारख्या संस्थांत जेथे बिनविरोध निवडणूक होते तेथे रु. पाचशेपेक्षा जास्त फी आकारण्यात येऊ नये इत्यादी सूचनांना प्रस्ताव मा. मधुकरराव चौधरी, भा. प्र. से. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण पुणे यांना सादर करण्यात आला.

**सहकारी कायदा कलम १४ चे दुरुस्तीनुसार कार्यवाहीची मागणी**

दिनांक ८ ऑक्टोबर रोजी वरील विषयावर एक चर्चा मा. सहकार आयुक्त यांना सादर करण्यात आलेल्या गृहनिर्माण संस्थांचे प्रस्तावावर आयोजिण्यात आली होती. झोरास्ट्रीअन को.ऑप.हौ.सो., चे सर्वोच्च न्यायालयाचे निकालाप्रमाणे यापूर्वीचे १९२५ चे सहकार कायद्यानुसार नोंदविण्यात आलेले उपविधी नव्या दुरुस्त कायद्यात तशी स्पष्ट तरतूद नसल्यास बेकायदेशीर असणार नाही आणि त्यासाठी सहकार कायद्यांत स्पष्ट तरतूद करण्यात यावी, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. त्यास अनुसरुन संविधान दुरुस्ती नंतरच्या कायद्याचे दुरुस्तीमध्ये योग्य ते बदल करण्यात आले. त्यास अनुसरुन सालसट को.ऑप.हौ.सो. चे उपविधी दुरुस्तीबाबत प्रस्ताव आयुक्तांकडे २२ सप्टेंबर २०१५ रोजी सादर केला होता.

**खुल्या स्पर्धेतील सहकारी संस्थांचे अस्तित्व**

वरील विषयावर ५ जानेवारी २०१६ रोजी एक चर्चा आयोजित करण्यात आली होती. त्यावर सविस्तर चर्चा झाली. चर्चेचे अनुषंगाने हजर सभासदांना त्यांनी वरील विषयावरील प्रबंधही इंडिअन सोसायटीकडे सादर करता येतील असे सुचविले.

**कथा जोतिबा सावित्रीची, प्रश्न मंजूषा स्पर्धा**

दरवर्षी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान (कृषी व सहकार व्यासपीठ) वनराई व भिडे परिवार (मंगेशी) यांचे संयुक्त विद्यमाने लोकोत्तर व्यक्तींचे जीवन व कार्य या विषयावर स्पर्धा इयत्ता ८ वी व ९ वी चे विद्यार्थी आणि शिक्षक यांचेसाठी आयोजण्यात येतात. यातून लोकोत्तर विभूतींचे विचार बिंबवण्याचा प्रयत्न केला जातो. डॉ. गरुड यांचे कथा 'जोतिबा सावित्रीची' या पुस्तकाचे प्रकाशन वनराईच्या कार्यालयात करुन त्याच्या प्रती ८२ शिक्षकांना आणि १२० गुणवान विद्यार्थ्यांना मोफत उपलब्ध करुन त्यांना त्यांच्या शाळांमधून वरील स्पर्धा घेण्यास सुचविण्यात आले होते. त्या पुस्तकावर आधारीत प्रश्न मंजूषा स्पर्धेत २८७३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यातून निवडक गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करुन त्यांची कार्यशाळा दि. १२ सप्टेंबर २०१५ रोजी वसंतदादा पाटील विद्यानिकेतन सभागृहात घेण्यात आली. त्यामध्ये विद्यार्थ्यांना व शिक्षकांना आरोग्यम् धनसंपदा या विषयाखाली व्याख्यानाचे व प्रात्यक्षिकांचेद्वारे प्रार्थनेचे महत्त्व योगिक क्रिया यांची माहिती व अवयव दानाचे महत्त्व विषद केले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा डॉ. गरुड, डांगे, देशपांडे व शाळीग्राम यांचे सुपरव्हीजन खाली घेतली. विद्यार्थ्यांना प्रत्येक इयत्तेसाठी प्रथम, द्वितीय, तृतीय, अनुक्रमे रु. ५००/- रु. ४००/- रु. ३००/- आणि उत्तेजनार्थ रु. २००/- ची ७ पारितोषिके वाटण्यात आली. इयत्ता आठवीमध्ये कु. धनश्री विनोद जोशी, गेनबा सोपानराव मोझे माध्यमिक विद्यालय येरवडा आणि ९ वी मध्ये कु. सायली बापू ननावरे नुतन मा. विद्यालय या मुलींनी प्रथम क्रमांक पटकवला.

### निबंध स्पर्धा

महात्मा जोतीबा फुले आणि सावित्रीबाई फुले या विषयावर शिक्षकांकडून सर्व राज्यातून दोन हजार शब्दापर्यंत चे निबंध मागविण्यात आले. या कामी प्रतिष्ठानच्या अन्य केंद्राचेही सहाय्य प्राप्त झाले त्यात प्रामुख्याने कराड आणि रत्नागिरी केंद्राचा उल्लेख करावा लागेल. एकूण ४४ निबंध प्राप्त झाले. त्यापैकी उत्तम असे बावीस निबंध प्रसिध्द शिक्षणतज्ञ डॉ. न. म. जोशी यांचेकडून तपासून घेण्यात आले. पहिल्या तीन क्रमांकांना अनुक्रमे रु. १०००/- रु. ७५०/- रु. ५००/- व उत्तेजनार्थ रु. ३००/-ची आठ पारितोषिके देण्यात आली. त्याचप्रमाणे विद्यार्थी निबंध स्पर्धेचीही पारितोषिके दि. २५ नोव्हेंबर २०१५ रोजी कै. यशवंतराव चव्हाण पुण्यतिथीचे दिवशी पुरस्कार वितरण समारंभामध्ये डॉ. न. म. जोशी व श्री. काकडेसाहेब यांचे हस्ते वाटण्यात आली. ती खालीलप्रमाणे.

### निबंध स्पर्धा शिक्षक :

प्रथम पारितोषिक -
सौ. सुवर्णा शरद काळे, सौ. विमलाबाई गरवारे प्रशाला
द्वितीय पारितोषिक -
श्री. ली. मो. कुड, जिल्हा प. प्रा. शाळा आंबेरे रत्नागिरी
तृतीय पारितोषिक -
सौ. मृणालिनी निलेश सप्रे रामचंद्राठी म. मा. विद्यालय
तृतीय पारितोषिक -
श्री. योगेश तानु पेंढाबकर गद्रे इं. मि. स्कुल मार्कडी रत्नागिरी

याशिवाय उत्तेजनार्थ आठ पारितोषिके वाटण्यात आली. त्यातील कराड येथील शिक्षिकेचे पारितोषिक मा. शरद पवार साहेब यांच्याहस्ते कराड येथे वितरीत करण्यात आले. विद्यार्थी निबंध स्पर्धेत एकूण ७५ मुलांनी सहभाग घेतला ८ वी साठी कु. गौरी चं आंग्रे व्यंकटेश माध्यमिक विद्यालय आणि ९ वी चे विद्यार्थ्यांमध्ये कु. किमया मते रामचंद्राठी मा. विद्यालय यांनी पहिला क्रमांक पटकवला. ८ वी व ९ वी चे वर्गासाठी एकूण १० प्रत्येकी पारितोषिके अनुक्रमे रु. ५००/- रु. ४००/- रु. ३००/- आणि उत्तेजनार्थ रु. २००/- चे ७ पारितोषिके वितरीत करण्यात आली.

### वक्तृत्व स्पर्धा

महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे जीवन व कार्य या विषयावर दि. १८ डिसें. रोजी इयत्ता आठवी व नववीचे विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा सह्याद्री सदनात आयोजित केली होती. त्यामध्ये एकूण १५ शाळा आणि ९७ विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. त्यामध्ये ८ वी च्या विद्यार्थ्यांत कु. श्रिया की देशापांडे आहिल्यादेवी हायस्कूल पुणे व ९ वी मध्ये कु. गणेश खुटवड वामनराव ओतूरकर मा. विद्यालय यांनी प्रथम क्रमांक पटकवला. या स्पर्धेतही विद्यार्थी निबंध स्पर्धेप्रमाणेच बक्षिसांचे वाटप करण्यात आले. परिक्षक म्हणून माजी प्राचार्य गरुड व डांगे आणि श्री. देशपांडे उपनिबंधक व शिक्षिका सौ. शाळीग्राम यांनी काम पाहिले. मा. श्री. अजित निंबाळकर यांचेहस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. आभार श्री. भिडे यांनी मानले.

### बॉटल/कुंडी गार्डनिंग स्पर्धा

वनराई, प्रतिष्ठान व भिडे परिवार (मंगेशी) यांचे विद्यमाने १८ शाळातील ९० विद्यार्थ्यांना वरील स्पर्धेत सहभाग घेतला. बक्षिसाची रक्कम रु. पाच हजार श्री. भिडे यांनी उपलब्ध करुन दिली. तसेच अन्य पाच हजार व रु. सहा हजाराची पुस्तकेही पर्यावरण विषयक स्पर्धेसाठी श्री. भिडे यांनी शाळा व विद्यार्थ्यांना वाटण्यासाठी वनराईकडे उपलब्ध करुन दिली. बॉटल/कुंडी गार्डनिंगमध्ये १. डी. ई. एस. सेकंडरी स्कूल टिळकरोड २. चिंतामणी विद्यामंदिर थेऊर ३. लक्ष्मणराव आपटे प्रशाला पुणे ४. यांना अनुक्रमे रु. १०००/- रु. ७५०/- रु. ५००/- ची पारितोषिके अन्य १५ शाळांना उत्तेजनार्थ रु. २००/- बक्षिसे श्री. रविंद्र धारीया यांचेहस्ते वाटण्यात आली. त्याचप्रमाणे भिडे परिवार (मंगेशी) यांनी सर्व शाळांना भिम बुध्द संग्रह ही श्री. रिजय आनंदा चव्हाण यांची पुस्तिका मोफत वाटली.

बळीराजा, प्रतिष्ठान शेतकरी मंडळ व्याख्यानमाला

| तारीख | विषय | व्याख्याते |
|---|---|---|
| ५/९/१५ | गोदावरी खोरे राज्य एकात्मिक जलसंपत्ती प्रारुप आराखडा | डॉ. दि. मा. मोरे |
| ३/१०/१५ | वनशेती मध्ये चंदन लागवड | महेंद्र घागरे |
| ७/११/१५ | पाणी आडवा हावरटपणे वापरा विवेकाने | डॉ. दत्ता देशकर |
| ५/१२/१५ | शेतमाल बाजार सद्यस्थिती, सुधारणा आणि अंमलबजावणीतील आव्हाने | डॉ. गिरीधर पाटील |
| २/१/१६ | मातीविना परसबाग | कॅ. अच्युत परांजपे |

★★★

# विभागीय केंद्र, रत्नागिरी
# कार्यवृत्त

## शिक्षक दिन कार्यक्रम

कोकण विभागीय केंद्राचे वतीने दि. ५ सप्टेंबर रोजी 'शिक्षक दिन' कार्यक्रम सह्याद्री शिक्षण संस्थेच्या एम.बी.ए. कॉलेजच्या सभागृहामध्ये संपन्न झाला. त्यावेळी चिपळूणचे डॉ. धनंजय चितळे, पुण्याचे जडण घडण मासिकाचे संपादक श्री. सागर देशपांडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

मान्यवरांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी स्व. यशवंतराव चव्हाण, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व स्व. गोविंदराव निकम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री. सागर देशपांडे व डॉ. धनंजय चितळे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व 'यशवंतराव चव्हाण जीवनप्रवाह' हे स्व. चव्हाण साहेबांचे पुस्तक देवून सत्कार करण्यात आला.

जिल्हाध्यक्ष मा. श्री. प्रकाश काणे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यामध्ये त्यांनी प्रतिष्ठानच्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

आद्यतम गुरु भगवान श्रीकृष्ण यांचा तिथीप्रमाणे व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा तारखेप्रमाणे आज जन्मदिवस आहे, हा विलक्षण योग आहे. श्रीकृष्ण हे उत्तम ज्ञानी, उत्तम वक्ता होते. आपल्या हक्काचे जे जे काही चांगले आहे, उत्तम आहे, पौष्टिक आहे ते मिळविण्याकरीता आपल्याला संघर्ष करावा लागतो हे श्रीकृष्ण चरित्रातून दिसते. 'शिक्षक दिन' हा संकल्प दिन आहे. या दिवशी शिक्षकांनी वेगवेगळे संकल्प करुन ते पूर्णत्वास नेले पाहिजेत, हे डॉ. धनंजय चितळे यांनी वेगवेगळी उदाहरणे देवून सांगितले.

देशात जे चांगले टिकून आहे ते शिक्षकांमुळेच आहे. शिक्षक मुलांवर विचार बिंबवण्याचा प्रयत्न करीत असतात. मुलं आई वडीलांपेक्षा शिक्षकांवर अधिक विश्वास ठेवून असतात. शिक्षक जे काही सांगतील त्यावर मुलं विश्वास ठेवून असतात त्यामुळे शिक्षकांनी मुलांची विश्वास जपला पाहिजे, असे पुण्यातील जडण घडण मासिकाचे संपादक श्री. सागर देशपांडे यांनी सांगितले. आताची मुले खूप हुशार असल्यामुळे यापुढील शिक्षकांना मोठे आव्हान आहे. आपला विद्यार्थी जेव्हा आपल्याला पराभूत करतो तो खरा शिक्षकांचा विजय असतो. समाजामध्ये काहीही उलथापालथ झाली तरी बदलण्याची ताकद आपल्या विद्यार्थ्यांमध्ये आली पाहिजे असेही त्यांनी सांगितले.

कोकण विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा.श्री. राजाभाऊ लिमये यांनी सर्व उपस्थित शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला कोकण विभागीय समितीचे उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर, सह्याद्री शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. शेकर निकम, अध्यक्षा श्रीम. अनुराधाताई निकम, विभागीय समितीचे सदस्य श्री. सुनिल शिर्के, जिल्हा समिती सदस्य श्री. कृ. आ. पाटील, श्री. विवेक सावंत, श्रीम. प्राची शिंदे, संदिप लवेकर, ॲड्. अमेय परुळेकर, सह्याद्री शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी, शिक्षकवर्ग बहुसंख्येने उपस्थित होते. श्री. मोडक सर यांनी उपस्थितांचे आभार मानले. श्री. पाटील सर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले.

## ज्येष्ठ नागरीकांची चालण्याची स्पर्धा :

कोकण विभागीय केंद्राचे वतीने दि. १ ऑक्टोबर 'ज्येष्ठ नागरीक दिन' निमित्त ज्येष्ठांसाठी रत्नागिरी येथील भारत शिक्षण मंडळाचे पटवर्धन हायस्कूलचे क्रींडागणावर दि. १ ऑक्टोबर २०१५ रोजी सकाळी ७.३० वा. चालण्याची स्पर्धा घेण्यात आली. ही स्पर्धा पुरुष व महिला अशा दोन गटात घेतली गेली. कोकण विभागीय केंद्राचे उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर व भारत शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष मा.श्री. विनायक हातखंबकर यांनी हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेचे उद्घाटन केले.

६५ वर्षीय ज्येष्ठांसह विशेषत: १०० वर्षीय श्री. महादेव वांदरकर गुरुजी यांनीही या स्पर्धेत उस्फूर्त सहभाग

घेतला. वांदरकर गुरुजींच्या सहभागाची उपस्थितांनी वाहवा केली.

यावेळी पटवर्धन हायस्कूलचे मुख्याध्यापक मा. श्री. विजय वाघमारे, उपमुख्याध्यापक मा. श्री. मिलींद कदम, जिल्हा समिती सदस्या श्रीम. प्राची शिंदे, मरीन सिंडीकेटचे श्री. दिलीप भाटकर आदी मान्यवर उपस्थित होते. श्री. सुभाष पाटील, श्री. राजेंद्र कांबळे, श्रीम. वैशाली वेल्हाळ आदी क्रिडा शिक्षकांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ दि. १० ऑक्टोबर २०१५ रोजी रत्नागिरी येथील कार्यालयात संपन्न झाला. विजयी स्पर्धकांना कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये व उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर यांचेहस्ते रोख रक्कम, प्रशस्तीपक्ष व गुलाब पुष्प देवून गौरविण्यात आले. तसेच महाराष्ट्र राज्याचा 'आदर्श शिक्षक' पुरस्कार विजेते खेडशी हायस्कूचे श्री. सुभाष पाटील यांचा मान्यवरांचे हस्ते शाल, श्रीफळ व गुलाब पुष्प देवून सत्कार करण्यात आला.

**ज्येष्ठ नागरीकांचा आनंद मेळावा (जि.सिंधुदूर्ग)**

कोकण विभागीय केंद्र जिल्हा समिती सिंधुदूर्गचे वतीने दि. ४ ऑक्टोबर २०१५ रोजी वेंगुर्ले येथील साई मंगल कार्यालयात ज्येष्ठांसाठी आनंद मेळावा आयोजित करण्यात आला. यावेळी कोकण विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष मा. डॉ श्रीरंग कद्रेकर, कोषाध्यश्र मा. श्री.एम. के. गावडे, विभागीय समिती सदस्य श्री. सुनिल शिर्के, सिंधुदूर्ग जिल्हाध्यक्ष मा. अॅड्. किशोर शिरोडकर, रत्नागिरी जिल्हाध्यक्ष मा. श्री. प्रकाश काणे, जिल्हा समिती सदस्य डॉ. अनिल जोशी, विभागीय समितीच्या माजी सदस्या तसेच सिंधुदूर्ग जिल्हा बँकेच्या संचालक श्रीम. प्रज्ञा परब, सिंधुदूर्ग येथील ज्येष्ठ नागरीक संघाचे अध्यक्ष मा. श्री. रा. पा. जोशी सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष मा. श्री. अशोक गावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

ज्येष्ठ नागरीकांचे आनंदमेळाव्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ नागरीकांचा मान्यवरांचे हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात सावंतवाडीतील ज्येष्ठ मालवणी कवी दादा मडकईकर यांनी गावची जत्रा, जावयाची उठबस, सुक्या पाना पानात पाऊस पडान गेलो यासह अन्य मालवणी कवितांचे सादरीकरण करुन ज्येष्ठांकडून वाहवा मिळविली.

पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यानंतर माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे नाव सुसंस्कृत नेता म्हणून घेतले जाते. त्यांचे संपूर्ण जीवन तरुणाईपर्यंत पोहोचविण्याचे कार्य यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष शरद पवार यांच्या मार्गदर्शनाने कोकण समिती करीत आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व एम. के. गावडे प्रबोधिनी यांच्यावतीने ज्येष्ठांच्या समस्या सोडविण्याचे प्रयत्न सुरु असे आश्वासन कोकण विभागीय समितीचे कोषाध्यक्ष श्री. एम. के. गावडेयांनी प्रास्ताविकात सांगितले.

'वृध्दाश्रम' ही संकल्पना आपणास मान्य नाही. जर कुटुंबे एकत्रित असतील व ज्येष्ठांना मान सन्मान दिला तर वृध्दाश्रमांची गरज भासणार नाही. वृध्दत्वाला न कंटाळता आपण आपले ज्येष्ठत्व सत्कार्यासाठी लावू शकतो' असे कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. सचिन परुळकर यांनी केले तर आभार श्री. प्रदीप सावंत यांनी मानले.

**महिला बचत गटांनी बनविलेल्या मालाचे प्रदर्शन व विक्री कार्यक्रम**

कोकण विभागीय केंद्र जिल्हा समिती रत्नागिरी आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज रनपार यांचे संयुक्त विद्यमाने बचतगट व इतर उद्योगिनी महिलांनी बनविलेल्या मालाचे प्रदर्शन व विक्री कार्यक्रम दि. ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०१५ या कालावधीत साई मंगल कार्यालय जे. ते. फाईल्स येथे संपन्न झाले.

कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ

लिमये व फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे जनसंपर्क अधिकारी मा. डॉ. आशुतोष मुळे यांनी बचतगटातील महिलांना मालाच्या प्रदर्शन व विक्रीसाठी शुभेच्छा देवून यापुढेही असेच सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. बचतगटातील महिलांना उद्योगव्यवसासाठी लागणाऱ्या अर्थसहाय्यासाठी पीएमसी बँक नेहमी सहकार्य करेल असे बँकेच्या शाखा व्यवस्थापक सौ. केतकी विद्वंस यांनी सांगितले.

दि. ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर या कालावधीत महिलांसाठी आरोग्य तपासणी, पदार्थ बनविण्याचे प्रशिक्षण व विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

प्रदर्शनाचे समारोप कार्यक्रमाला कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर, फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आशुतोष मुळे, सीटीसी कॉलेजच्या प्राचार्य श्रीम. नंदा शेलार, जिल्हा समिती सदस्या श्रीम. प्राची शिंदे, श्रीम. दिलनाज शेख आदी मान्यवर उपस्थित होते. महिला बचतगटांनी स्वत:चे पायावर उभे रहावे, घरगुती खाद्यपदार्थ, शोभेच्या वस्तू आणि गृहोपयोगी वस्तू उत्पादित करताना अशा वस्तू परदेशात निर्यात करता येतील यासाठी प्रयत्न करावेत. स्त्री शक्तीच्या जागरातून रत्नागिरीचे नाव उज्ज्वल करावे असे आवाहन कोकण विभागीय समितीचे उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनी केले.

बचतगटांना सहकार्य करण्याकरीता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान नेहमीच प्रयत्नशील राहील असे कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये यांनी सांगितले.

यानंतर चार दिवसांमध्ये घेतल्या गेलेल्या स्पर्धेच्या विजेत्यांना मान्यवरांचे हस्ते बक्षिसे देण्यात आली.

**स्व. यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी कार्यक्रम**

कोकण विभागीय केंद्राचे वतीने स्व. यशवंतराव चव्हाण यांचा ३१ वा स्मृतिदिन कार्यक्रम भारत शिक्षण मंडळ संचलित पटवर्धन हायस्कूलचे नाटेकर सभागृहात दि. २५ नोव्हेंबर २०१५ रोजी सकाळी १०.०० वा. संपन्न झाला.

कोकण विभागीय समितीचे उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रतिष्ठानतर्फे विभागीय स्तरावर प्रथमच सुरु झालेल्या 'यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कारा' संदर्भात माहिती दिली. तसेच प्रतिष्ठानचे वतीने वर्षभर होणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे यावर्षीपासून सुरु केलेल्या 'यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार' चे प्रथम मानकरी मा. श्री. अनंत धोंडू तथा अण्णासाहेब शिरगांवकर यांना माजी प्राचार्य मा. सुभाष देव यांचे हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, मानपत्र व रु. पंधरा हजार देवून गौरविण्यात आले. सत्कारमूर्तीच्या मानपत्राचे वाचन जिल्हा समिती सदस्या मा. सौ. युगंधरा राजेशिर्के यांनी केले.

'स्व. यशवंतराव चव्हाणांचे नावांनी दिला जाणारा पुरस्कार मा आदरपूर्वक स्विकारतो. ग्रामीण भागातील कार्यकर्त्याला पुरस्कार मिळणे ही अभिमानास्पद बाब आहे. पुरस्कारामुळे माणूस मोठा होतो की माणूस मोठा झाला म्हणून त्याला पुरस्कार मिळतो हे गणित मला कळले नाही. परंतु उतार वयात पुरस्कार मिळाल्यामुळे त्यानिमित्ताने जुनी मंडळी भेटतात त्यामुळे आनंद होतो. मात्र असे पुरस्कार तरुणांना योग्य वयात मिळाले तर त्यांना प्रोत्साहन मिळते. समाजात काम करताना तुमचा फायदा काय ? असे विचारले जाते मात्र समाजकार्य हे कर्तव्य असते. मला आईकडून समाजसेवेची प्रेरणा मिळाली त्यातून आयुष्यभर दीन दलितांची सेवा करता आली. समाजसेवा ही एक सेवा असून त्याला पैशाच्या तराजूत मोजता येत नाही हे समजले. श्री. राजाभाऊ लिमये व डॉ. कद्रेकर यांच्या प्रेमापोटी रत्नागिरीत आलो. खरे समाजकार्य करणारे दुर्लक्षितच राहतात. पण समाजसेवेची दखल घेणारे आजही आहेत याचे समाधान वाटते. शेवटपर्यंत कार्यरत राहण्याची इच्छा आहे, असे सांगून अण्णा शिरगांवकर यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे आभार मानले.

यानंतर 'गीतारहस्य - एक सांगोपांग परिचय' या चर्चासत्रात सादर झालेल्या निबंधाचे 'गीतारहस्य शताब्दी गौरव' या पुस्तकाचे प्रकाशन देवरुखचे माजी प्रा. डॉ. सुरेश जोशी व इतर मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. कृषी व सहकार

व्यासपीठ, पुणे यांनी शिक्षकांसाठी 'कथा जोतीबा सावित्रीची' या विषयावर राज्यस्तरीय निबंध स्पर्धा घेण्यात आली होती. या राज्यस्तकीय निबंध स्पर्धेतील रत्नागिरी जिल्ह्यातील विजेत्यांना यावेळी मान्यवरांचे हस्ते पारितोषिके देण्यात आली. त्यांची नावे पुढीलप्रमाणे :

श्री. लिलाधर मोहन कुड - द्वितीय क्रमांक

श्री. योगेश तानु पेढांबकरप - तृतीय क्रमांक

श्री. विश्वनाथ रामचंद्र चिले - उत्तेजनार्थ

या व्यतिरिक्त निबंध स्पर्धेतील सहभागी स्पर्धकांना प्रशस्तीपत्र व पुस्तक भेट देण्यात आले.

'यशवंतराव चव्हाणांना स्मृतिदिन कार्यक्रम 'यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार' देवून वेगळ्याप्रकारे साजरा होत आहे. कोकणातील पुराणपुरुष अण्णा शिरगांवकर यांना दिलेला हा पुरस्कार योग्यच आहे. अण्णांचे इतिहासातील काम फार मोठे आहे. कोकण इतिहास परिषदेची स्थापना उशिराच झाली पण अण्णांनी आयुष्यभर सातत्यांनी कोकणातील इतिहासाचे संशोधन एकलव्याच्या मार्गाने केले म्हणूनच हा पुरस्कार उतारवयात दिला तरी तो वेगळ्या मार्गाने जाणारा व त्यांच्या कार्याची घेतली गेलेली छोटीशी नोंद आहे.

यशवंतराव चव्हाण राज्यातील एकमेव माणूस जो केंद्रात महत्त्वाच्या मंत्रीपदावर होता मात्र दिल्लीतील राजकारण यशवंतरावांच्या स्वभावाला मिळते जुळते नव्हते. त्यांचे महाराष्ट्र निर्मितीचे पहिले भाषण स्फूर्तिदायक होते. महाराष्ट्र एकजिनसी करु शकलो तर लो. टिळकांच्या त्यागाला न्याया देवू शकू. नेत्याचे कार्य कार्यकर्ते घडविणे असते. यशवंतरावांनी राजकीय कारभार करताना गावपातळीपर्यंत कार्यकर्ते घडविले म्हणूनच महाराष्ट्रात पंचायत राज्याची संकल्पना यशस्वी ठरली, असे माजी प्राचार्य श्री. सुभाष देव यांनी आपल्या भाषणात सांगितले.

'गीतारहस्य शताब्दी गौरव' या पुस्तकाचे प्रकाशक माजी प्राचार्य डॉ. सुरेश जोशी यांनी यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने साहित्य रसिक होते असे सांगून बा. भ. बोरकर यांच्या कवितेवर भाष्य केले. ते म्हणाले, लोकमान्य टिळकांच्या 'गीतारहस्य' या शतकोत्सवी ग्रंथाविषयी महाराष्ट्रात कोठेच चर्चासत्र झाले नाही. लोकमान्यांच्या जन्मभूमीत दि. १ व २ ऑगस्ट २०१५ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे वतीने 'गीतारहस्य-एख सांगोपांग चर्चासत्र' हा कार्यक्रम झाला. या चर्चासत्रात सादर झालेले निबंध पुस्तकरुपात तयार करण्यासाठीही यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने पुढाकार घेतला. हाताशी कोणतीही अभ्यासाची सामग्री नसताना लोकमान्यांनी तुरुंगवासात गीतारहस्य लिहिले.

कोषाध्यक्ष मा. श्री. एम. के. गावडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला भारत शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष मा. श्री. विनायक हातखंबकर, रत्नागिरी जिल्हाध्यक्ष प्रकाश काणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अॅड्. किशोर शिरोडकर, वेंगुर्ले येथील सौ. प्रज्ञा परब व श्री. प्रमोद धुरी, पटवर्धन हायस्कूलचे प्रा. श्री. विजय वाघमारे यांच्यासह जिल्हासमिती सदस्य व अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. निशा काळे यांनी केले.

### शिक्षणकट्टा कार्यक्रम

कोकण विभागीय केंद्र व एम. के. सी. एल. च्या संयुक्त विद्यमाने दि. २४ जानेवारी २०१६ रोजी गुरुवर्य अ.आ.देसाई माध्यमिक विद्यालय हातखंबा जि. रत्नागिरी येथे शिक्षणकट्टा कार्यक्रम घेण्यात आला.

'परीक्षेला सामोरे जातान' या विषयावर इ. दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी एम. के. सी. एल. च्या लांजा राजापूर शाखेच्या प्रतिनिधी मा. श्रीम. अर्पिता कदम यांनी विद्यार्थ्यांबरोबर चर्चात्मक संवाद साधला. विद्यार्थ्यांनींही चर्चेत सहभाग घेवून आपल्या शंकांचे निरसन केले. यावेळी गुरुवर्य अ. आ. देसाई माध्य. विद्यालयाचे प्रा. चंद्रमोहन देसाई उपस्थित होते.

★★★

# विभागीय केंद्र, औरंगाबाद
# कार्यवृत्त

**रविवार, दि. ७ सप्टेंबर २०१५**

**बी. रघुनाथ स्मृतीसंध्या**

बी. रघुनाथ स्मृतीसंध्या या उपक्रमाचे हे २६ वे वर्ष होते. यंदा हा उपक्रम नाथ समुह, परिवर्तन संस्था आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला. मराठवाड्याचे भूषण असलेले ज्येष्ठ लेखक बी. रघुनाथ यांच्या स्मृतीदिनी ७ सप्टेंबर रोजी दरवर्षी हा सोहळा आयोजित करण्यात येतो.

कवी संमेलन, साहित्यिक कार्यक्रम आणि बी. रघुनाथ साहित्य पुरस्कार वितरण असे या कार्यक्रमाचे स्वरुप होते. पुरस्काराचे वितरण हे मराठी साहित्य विश्वातील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावर्षी हा पुरस्कार कादंबरीकार, चित्रकार व प्रकाशक ल. म. कडू यांच्या 'खारीचा वाटा' या कादंबरीस ज्येष्ठ कादंबरीकार मा. रंगनाथ पठारे यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला.

यावर्षीच्या कार्यक्रमात सुप्रसिध्द कादंबरीकार लेखक मिलिंद बोकील यांच्या 'एकम्' या कादंबरीवर आधारीत नाट्यप्रयोग 'घटाकाश' सादर करण्यात आला. यात प्रसिध्द अभिनेत्री रीमा लागू, ज्योती सुभाष, शुभांगी दामले, पर्ण पेठे आदींनी आपली कला सादर केली.

यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. नंदकिशोर कागलीवाल, सचिन मुळे, सुबोध जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

**बुधवार, दि. २५ नोव्हेंबर २०१५**

**मा. यशवंतराव चव्हाण साहेब यांना पुण्यतिथी दिनी अभिवादन :**

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ३१ व्या पुण्यतिथी निमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान तर्फे एमजीएम महाविद्यालयाच्या आईनस्टाईन सभागृहात अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला यशवंतराव चव्हाण साहेबांना आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी रेणुका कड, सुहास तेंडूलकर, एमजीएमच्या अपर्णा कक्कड, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे विभागीय संघटक सुबोध जाधव आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी बोलताना रेणुका कड यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याविषयी माहिती दिली तसेच आजचा पुरोगामी महाराष्ट्र हा यशवंतराव चव्हाण साहेबांच्या दूरदृष्टीमुळे घडला आहे असेही त्यांनी सांगितले. यानंतर प्रतिष्ठानतर्फे औरंगाबाद शहरामधील देवगिरी महाविद्यालयामधील नाट्यशास्त्र विभागाचे प्रा. अनिलकुमार साळवे यांनी दिग्दर्शित केलेला 'शिरमी' आणि विनय शाक्य यांनी दिग्दर्शित केलेला 'ढाण्या' हे दोन पुरस्कार प्राप्त लघुपट दाखवण्यात आले.

याप्रसंगी प्रा. अनिलकुमार साळवे आणि विनय शाक्य यांची प्रकट मुलाखत श्रीकांत देशपांडे यांनी घेतली.

**भारतीय लोकशाही पुढील आव्हाने - चर्चासत्र**

विभागीय केंद्र औरंगाबाद व सरस्वती भुवन शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या २२ व्या नामविस्तार दिनानिमित्त 'भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवार, दि. १४ जानेवारी २०१४ रोजी सकाळी ११ वा. गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमी सभागृह, सरस्वती भुवन महाविद्यालय, औरंगपुरा येथे सदर चर्चासत्र संपन्न झाले.

चर्चासत्रात डॉ. भालचंद्र मुणगेकर, खा. सुप्रिया सुळे, डॉ. जही अली यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. यावेळी आ. हेमंत टकले, आ. राजेश टोपे, आ. सतिश चव्हाण, आ. भाऊसाहेब

चिकटगावकर, आ. प्रकाश गजभिये, सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष दिनकर बोरीकर, सचिन मुळे. दिनेश गंगापूरवाला, दत्ता बाळसराफ यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. संजय मोहोड आणि त्यांच्या सहकाऱ्यांची यावेळी विद्यापीठ गीत सादर केले.

भारताची लोकशाही आता परिपक्व झाली आहे. मात्र, ही लोकशाही टिकवण्यात सर्वात मोठी भूमिका गरीबांची आहे. झोपडपट्टीतल्या ७० टक्के लोकांनी सातत्याने मतदान करुन सरकारे बदलली आहेत. त्यामुळे गरीबांमुळेच लोकशाही टिकून आहे, असे मत डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी व्यक्त केले ते पुढे म्हणाले की, कोलंबिया विद्यापीठाच्या ३०० वर्षांच्या इतिहासात सर्वात हुशार विद्यार्थी म्हणून डॉ. आंबेडकरांची नोंद आहे. मात्र, आपल्या देशातल्या मानसिकेतेने डॉ. आंबेडकर पुरेसे समजून घेतले नाहीत. प्रत्यक्षात त्यांचे विचार कृतीत उतरवले नाहीत. अनेकांना ते महागदेखील पडले असते. इसवी सन १९१८ मध्ये शेतकऱ्यांचे प्रश्न आणि त्यावरील उपयावर त्यांनी लेखाच्या माध्यमातून चर्चा केली, पण अर्थतज्ज्ञांनीदेखील डॉ. आंबेडकरांना समजून घेतले नाही. भारताच्या राजकारणावर ३० टक्के सधन आणि उच्चभ्रूंचे वर्चस्व आहे. त्यामुळे हे लोक त्यांच्या हिताचे निर्णय घेण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे देशातील अनेक भागांत विकास पोहचला नाही. मी आतापर्यंत २६ देशांचा प्रवास केला. मात्र, भारताइतकी विविधता, धर्म, भाषा, प्रांत, संस्कृती इतक्या मोठ्या प्रमामात जगात कुठेच नाही. मात्र, या विविधतेवर हल्ला करण्याचे प्रयत्न सध्या सुरु असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

डॉ. जहीर अली हे यावेळी विषयाची मांडणी करताना म्हणाले, भारतात धर्मनिरपेक्षतेबद्दल सध्या जे बोलले जात आहे तो सध्या मोठा जोक होत असल्याचे पहायला मिळत आहे. भारतात लोकशाही केवळ निवडणुकीपुरतीच पहायला मिळते. इतर वेळी मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही ही लोकशाहीची मोठी कमतरता आहे. आपल्याकडे मुस्लिमांच्या बाबतीत केले जाणारे राजकारण हे इमोशन आणि युजलेस असून केवळ मतपेटीसाठी केले जात असल्याची टीका त्यांनी केली. अलिगड विद्यापीठाच्या माध्यमातून उर्दू जतन केली पाहिजे असे सांगितले जाते. मात्र, अनेक राज्यांत मोठ्या प्रमाणात मुस्लिम आहेत. मात्र, त्या भागात मुस्लिमांची प्रमुख भाषा उर्दू नाही. त्यामुळे हा केवळ भावनेचा विषय असून त्यामधून रोजगारनिर्मिती होत नसल्याचे त्यांनी सांगितले.

खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, बाबासाहेबांना आपण एका समाजापुरते अडकवून ठेवले आहे. संविधानाचे लिखाण, समता यांच्या व्यतिरिक्तही बाबासाहेबांनी खूप काम केले आहे. परंतु त्यांच्या कामावर फारशी चर्चा होताना दिसत नाही. त्या पुढे म्हणाल्या, विद्यापीठाचा नामविस्तार हा शरद पवार साहेब यांच्यासाठी एक टर्निंग पॉईंट होता. त्यांना नामांतराचा प्रश्न सोडविण्यासाठी अनेकांनी साथ दिली. आज बहुतेकांच्या मनात जात-पात कायम आहे, यामध्ये परिवर्तन करणे आवश्यक आहे. निवडणूकांच्या पुढे जावून प्रत्येक विषय सोडविला पाहिजे.

चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-विभागीय केंद्र औरंगाबादचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, सचिव मुकुंद भोगले, कोषाध्यक्ष सचिन मुळे, निलेश राऊत, सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे सहचिटणीस श्रीरंग देशपांडे, सरचिटणीस ॲड्. दिनेश वकील यांनी प्रयत्न केले.

**गुरुवार, दि. १४ जानेवारी २०१६**
**यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार वितरण सोहळा**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबादच्या वतीने २०१५ सालापासून समाजपयोगी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एका व्यक्तीस व संस्थेस यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय करण्यात आला होता. या अनुषंगाने विविध क्षेत्रातील व्यक्ती व संस्थांचे प्रस्ताव मागविण्यात आलेले होते. या पुरस्कारांचे वितरण मा. खा. सुप्रिया सुळे व आ. राजेश टोपे यांच्याहस्ते गुरुवार, दि. १४ जानेवारी २०१६ रोजी, गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमी येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी, आ. हेमंत टकले, आ. राजेश टोपे, आ. सतिश

चव्हाण, आ. भाऊसाहेब चिकटगावकर, आ. प्रकाश गजभिये, सचिन मुळे, दत्ता बाळसराफ यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्राप्त झालेल्या प्रस्तावांमधून २०१५ सालाकरीताच्या पुरस्कारांकरीता निवड समितीने व्यक्तीगत गटातून प्रगतीशील युवा शेतकरी श्री. दिपक पांडुरंग चव्हाण, मु. पो. सुलतानपूर, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद यांची निवड करण्यात आलेली आहे. रु. अकरा हजार रोख, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व झाडाचे रोप असे या मुरस्काराचे स्वरुप होते. दिपक चव्हाण यांनी रसायनशास्त्रातून पदव्यूत्तर शिक्षण घेतल्यानंतर शेती करण्याचा निर्णय घेतला. घरी करीत असलेल्या पारंपारिक शेतीतून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत आपल्या शेतीला आदर्श शेतीचा दर्जा त्यांनी अल्पावधीत मिळवून दिला. जमिनीची बांधबधिस्ती, विहीर पुर्नभरण, विविध पिकांचे विक्रमी उत्पादन, सेंद्रिय व विद्राव्य खतांचा वापर, यांत्रिकीकरणाचा वापर, एकात्मिक पिक पध्दतीचा वापर, शेडनेट वापर, पिकाचे नियोजन करुन जोखीम व्यवस्थापन, शेततळे, सोशल मिडीयाचा शेतीसाठी वापर, आपल्या शेतीचा गुगल मॅप, प्लास्टिक आच्छादन यासारख्या अनेक अभिनव प्रयोगांचा वापर करुन त्यांची दुष्काळाच्या छायेत देखील आपली शेती नफ्यात आणली आहे. तसेच आपल्या प्रयोगांचा वापर स्वत:पुरता न करता परिसरातील युवा शेतकऱ्यांना सातत्याने आपल्या प्रयोगांचे मार्गदर्शन करणे हे देखील कार्य श्री. चव्हाण यांनी केले आहे.

संस्था गटातून दोन संस्थांना पुरस्कार देण्याचा निर्णय निवड समितीने घेतला. जलसंवर्धनात उल्लेखनीय कार्य केलेल्या ग्रामविकास संस्था व शेतकऱ्यानं एकत्र आणून शेतीगट स्थापन करुन कृषीक्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या जय जवान जय किसान शेतकरी मंडळ या दोन्ही संस्थांना यंदाचा यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार (संस्था) जाहीर करण्यात आला आहे. प्रत्येकी रु. पाच हजार पाचशे रोख, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व झाडाचे रोप असे या पुरस्काराचे स्वरुप होते.

ग्रामविकास संस्था गेल्या सतरा वर्षांपासून मराठवाडा व नाशिक विभागात शाश्वत ग्रामविकास करीता कार्यरत आहे. राज्य शासनाच्या सहकार्याने शासनाच्या विविध जलसंवर्धन, पाणलोट, आदर्श गाव, आरोग्य ग्रामीण पेयजल कार्यक्रम आदी उपक्रमांमध्ये प्रत्यक्ष अंमलबजावणी व प्रशिक्षणाच्या माध्यमातून भरीव कार्य संस्थेने केले आहे. विशेषत: जलधर पाणी व्यवस्थापन पथदर्शी प्रकल्प, आदर्श गाव संकल्प व प्रकल्प व चित्ते नदी पुनरुज्जीवन अभियान हे विशेष प्रकल्प राबवून परिसरात व प्रकल्पक्षेत्रात सर्वांगीण विकास संस्थेने घडवून आणला आहे.

जय जवान जय किसान शेतकरी मंडळ मागील दहा वर्षांपासून ३२ शेतकऱ्यांना घेऊन मु. देवगाव, पो. एकतूणी, ता. पैठण येथे कार्य करीत असून नॉन आय.एस.आय. ठिबकचा वापर, मोफत माती परीक्षण, सामुहिक खत व बियाणे पुरवठा, स्वयंसेवी संस्थांची मदत, कृषी विज्ञान केंद्र व कृषी विभागाचे सहकार्य या माध्यमातून ४०० एकरपेक्षा जास्त क्षेत्रामध्ये एकत्रित पिक लागवड केली, तसेच शेतीतंत्रज्ञानाबरोबरच शेततळ्यात मत्स्यबीज पालन, कुक्कूट पालन, दुग्धोत्पादन इ. शेतीपूरक व्यवसायास चालना शेती गटाने दिली. याचा फायदा या गटात सहभागी ३२ शेतकऱ्यांना झाला.

२०१५-१६ हे दुष्काळाच्या छायेतील वर्ष असून अनेक शेतकरी दुष्काळापायी आत्महत्या करण्याचा निर्णय घेत आहेत. परंतु या दुष्काळातदेखील खचून न जाता जोमाने उभे राहून एकीचे बळ दाखवत नव्या धैर्याने या दुष्काळाचा सामना करीत एक नवा आदर्श वरील शेतकरी व संस्था उभा करीत आहेत. त्यांच्या या प्रयत्नांना सर्वसामान्यांची साथ मिळावी व त्यांना प्रोत्साहन मिळावे हा या पुरस्कारामागचा हेतू होता.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी, निलेश राऊत, सुबोध जाधव, मंगेश निरंतर, गणेश घुले, मयुर देशपांडे आदींनी प्रयत्न केले.

**२३ जानेवारी २०१६**

**चित्रपट चावडी**

**'मालेगाव का सुपरमॅन' चित्रपट प्रदर्शन व कलाकारासोबत संवाद कार्यक्रम.**

बॉलीवूडला टक्कर देणारी फिल्म इंडस्ट्री आपल्या

महाराष्ट्राच्या मालेगावात आहे. फिल्म मेकिंगच कुठलेही प्रशिक्षण न घेतलेल्या या कलाकारांनी अनेक पुरस्कार आपल्या नावावर केलेत. त्यांच्या या सिनेमा तंत्राचा व जिद्दीचा गौरव करण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - विभागीय केंद्र औरंगाबाद व एम.जी.एम. जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या चित्रपट चावडी या उपक्रमांतर्गत विशेष शोचे आयोजन करण्यात आले होते. मालेगाव का सुपरमॅन हा बहुचर्चित आणि अनेक पुरस्कार विजेता चित्रपट दाखविण्यात आले. यावेळी चित्रपटाचे दिग्दर्शक आणि सिनेमॅटोग्राफर शेख नासेर, अभिनेता, दिग्दर्शक, सिनेमॅटोग्राफर अक्रम खान आणि अभिनेता रमजान खान हे कलाकार प्रेक्षकांशी संवाद साधला.

चित्रपट चावडी या उपक्रमांतर्गत नेहमीच वेगळ्या विषयांवरील दुर्मिळ दाखविण्यात आले होते. यावेळी मॉलीवूड फिल्म इंडस्ट्री व प्रकाशझोत टाखणारा आणि संपूर्ण जगभरातील चित्रपट महोत्सवात वेगळी छाप उपटवणारा हा चित्रपट आहे. मालेगावच्या चित्रपट निर्मितीचा रंजक प्रवास प्रेक्षकांनी अनुभवायला मिळाला. मालेगाव के शोले, कोई हिल गया, मालेगाव का सुपरमॅन या चित्रपटांनी मालेगावच काय पण संपूर्ण चित्रपट सृष्टीत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

यावेळी सिनेमॉटोग्राफर अक्रम खान, मॉलीवूडला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेणारे शेख नासीर यांनी प्रेक्षकांशी संवाद साधत आपले अनुभव कथन केले. मालेगाव का सुपरमॅन या सिनेमाने १९ पुरस्कार मिळविले आहेत. सिनेमाविषयी तयार करण्यात आलेला लघुपट यावेळी दाखविण्यात आला. आधुनिक तंत्रज्ञान नसताना या सिनेमाची कशा प्रकारे शुटींग केली, यासाठी क्रोमाचा कसा वापर करण्यात आला, केवळ ५० हजारांत कसा हा सिनेमा तयार झाला याची सगळी गुपिते त्यांनी प्रेक्षकांसमोर खुली केली. श्री. नासेर म्हणाले, सिनेमा बनविणे ही माझी आवड होती. तीच जपत सिनेमा करत गेलो. मित्रच कलाकाराप्रमाणे दिसत होते. त्यामुळे त्यातील काही गब्बर झाले. काहींना सुपरमॅन बनविले. यात क्रोमाचा वापर करीत मालेगाव कसे दाखविता येईल हे पाहिले. सगळ्यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे ही चित्रपटसृष्टी उभी राहिली. अक्रम खान म्हणाले, मी पाच वर्षे आखाती देशात होतो. तिकडून आल्यानंतर मला नासीरने मालेगाव के शोले बनविण्याचे सांगितले. यात मित्रांना रोल दिला. घोड्याऐवजी सायकलचा वापर केला. ट्रेनऐवजी बस लुटण्याचा प्लन चित्रित केला. मालेगावातील वेगवेगळे विषय या सिनेमातून मांडले. विशेष म्हणजे यात व्हीसीआर टू व्हीसीआर एडिटींग केली. हे खूप अवघड काम होते.

कार्यक्रमाचा यशस्वीतेसाठी निलेश राऊत, सुबोध जाधव, मंगेश निरंतर, गणेश धुले, मयुर देशपांडे, श्रीकांत देशपांडे आदींनी प्रयत्न केले.

★★★

# विभागीय केंद्र, नागपूर
# कार्यवृत्त

### डॉ. भालचंद्र नेमाडे सत्कार

विभागीय केंद्र, नागपूर यांच्यावतीने मंगळवार, दि. १ सप्टेंबर २०१५ रोजी वनराई कार्यालय शंकरनगर येथे ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त प्रसिध्द कादंबरीकार मा. डॉ. भालचंद्र नेमाडे यांचा सत्कार प्रसिध्द नाटककार मा. श्री. महेश एलकुंचवार यांच्या शुभहस्ते शाल, श्रीफळ देऊन करण्यात आला. याप्रसंगी मा. डॉ. गिरीश गांधी, मा. डॉ. गणेश देवी, डॉ. रंगनाथ पठारे, डॉ. अक्षयकुमार काळे, अजय पाटील, डॉ. प्रमोद मुनघाटे, विवेक रानडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

''देशीवाद आणि मराठी कादंबरी'' या राष्ट्रीय चर्चासत्राच्या निमित्ताने डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नागपूर केंद्राला भेट दिला.

### प्रकाशन समारंभ

विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने लेखक डॉ. प्रकाश खरात यांच्या 'यशोधरा' या कादंबरीचा प्रकाशन सोहळा शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०१५ सायं. ५.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला.

हा पुस्तक प्रकाशन समारंभ ज्येष्ठ विचारवंत मा. डॉ. यशवंत मनोहर यांच्या शुभहस्ते व मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी मा. डॉ. रुपाताई कुलकर्णी-बोधी व रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूरचे स्नातकोत्तर मराठी विभाग प्रमुख मा. डॉ. शैलेंद्र लेंडे हे प्रमुख वक्ते उपस्थित होते.

### हत्येचे राजकारण - राजकारणाची हत्या

रविवार दि. २० सप्टेंबर २०१५ सायं. ५.०० वाजता चिंतनकक्ष, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे 'हत्येते राजकारण-राजकारणाची हत्या' या विषयावर खुल्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी दैनिक भास्करचे समुह संपादक मा. श्री. प्रकाश दुबे हे अध्यक्षस्थानी होते.

### मुक्त चर्चा

शनिवार दि. २४ ऑक्टोबर २०१५ सायं. ५.०० वाजता चिंतनकक्ष, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आदिवासी कोण ? मूळनिवासी, हिंदू की वनवासी ? या विषयावर खुल्या चर्चेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ विचारवंत मा. श्री. नागेश चौधरी हे अध्यक्षस्थानी होते.

### पुरस्कार वितरण समारंभ

विभागीय केंद्र नागपूर व अरुणोदय साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक संस्था, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील प्रसिध्द कवयित्री स्व. अरुणाताई पवार-चवरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला नवोदितांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ मंगळवार दि. २७ ऑक्टोबर २०१५ सायं. ६.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला.

हा पुरस्कार वितरण समारंभ मा. श्री. बबन सराडकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी मा. डॉ. रत्नप्रभा अंजनगावकर-लांजेवार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

### व्यवस्था आरोग्याची-महाराष्ट्र २०२५

विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. शरद पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त 'महाराष्ट्र २०२५' या संकल्पनेवर आधारित चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्राची सुरवात रविवार, दि. १ नोव्हेंबर २०१५ रोजी ''व्यवस्था आरोग्याची-महाराष्ट्र २०२५'' या चर्चासत्राने सकाळी १०.०० वाजता श्रीमंत

बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे झाली.

प्रथम सत्राचे उद्घाटन मा. श्री. सुरेश द्वादशीवार, स्वागतपर भाषण मा. डॉ. गिरीश गांधी व प्रास्ताविक मा. श्री. शरद काळे यांनी केले, भूमिका मा. सौ. सुप्रियाताई सुळे यांनी मांडली. दुसऱ्या सत्रात सकाळी १०.५० वा. 'राष्ट्रीय आरोग्य धोरण-२०१५ व आंतरराष्ट्रीय संदर्भ' या विषयावर माजी संचालक, आरोग्य आणि विज्ञान शाखा, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक मा. डॉ. श्याम अष्टेकर यांनी मार्गदर्शन केले. 'वैद्यकीय संशोधन शिक्षण' या विषयावर चेअरमन अॅण्ड मॅनेजींग ट्रस्टी कृष्णा इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस, युनिव्हर्सिटी, कराड, पुणे डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी मार्गदर्शन केले.

तिसऱ्या सत्रात दुपारी १२.१० वा. 'खाजगी आरोग्य क्षेत्र व P.P.P.' या विषयावर चेअरमन ऑरेंजसिटी हॉस्पिटल, नागपूर मा. उदय भास्कर नायर व 'शासकीय आरोग्य व्यवस्था' या विषयावर सिनियर अॅडव्हायजर, पब्लिक हेल्थ फाऊंडेशन इंडिया, पुणे डॉ. सुभाष साळुंखे यांनी मार्गदर्शन केले.

चवथ्या सत्रात दुपारी २.३० वा. 'कुपोषण /आशा' या विषयावर संस्थापक विश्वस्त 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' गडचिरोली मा. डॉ. सतिश गोगुलवार व 'आरोग्य सेवा आरोग्य जनचळवळ' या विषयावर सहसमन्वयक जन-आरोग्य, पुणे डॉ. अनंत फडके यांनी मार्गदर्शन केले.

पाचव्या सत्रात दुपारी ४.२० वा. 'औषध धोरण' या विषयावर आय.ए.एस. मेट्रोपोलिटन रिजनल डेव्हलपमेंट ऑथोरिटी, पुणे मा. डॉ. महेश झगडे यांनी मार्गदर्शन केले. चर्चासत्राचा समारोप सायं. ५.१० वा. झाला. या चर्चासत्रासाठी मुंबई केंद्राचे दत्ता बाळ सराफ, समीर दलवाई आणि नागपूर केंद्राचे सर्व सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

### प्रात:स्वर

विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने दिवाळीनिमित्त प्रात:कालीन अनवट रागांची अनोखी मैफल या कार्यक्रमाचे आयोजन रविवार, दि. ८ नोव्हेंबर २०१५ रोजी सकाळी ६.०० वाजता किर्तनकेसरी भाऊसाहेब शेवाळकर सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे करण्यात आले.

याप्रसंगी गायक डॉ. मिलिंद मालशे (मुंबई), डॉ. साधना शिलेदार, संगीतकार श्री. सचिन बक्षी (तबला), श्री. श्रीकांत पिसे (संवादिनी), निवेदन डॉ. रजनी हुद्दा उपस्थित होते.

### कथांचे अभिवाचन

विभागीय केंद्र, नागपूर, नाविन्य कला अकादमी व आकांक्षा प्रकाशनाच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ लेखिका श्रीमती कमल देसाई यांच्या कथांचे अभिवाचन श्री. रविंद्र लाखे व डॉ. प्रिया जामकर उभयता यांनी केले. या कार्यक्रमाची निर्मिती संकल्पना डॉ.प्रिया जामकर यांची होती तर या अभिवाचनाचे दिग्दर्शन श्री. रविंद्र लाखे याचे होते.

हा कार्यक्रम शनिवार २१ नोव्हेंबर २०१५ सायं. ५.३० वा. श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे संपन्न झाला.

मा. डॉ. गिरीश गांधी होते. रंगकमळ या ध्वनिफितीचे एक औपचारिक प्रकाशन देखील यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाची प्रकाश व्यवस्था धनंजय मांडवकर यांनी सांभाळली.

### 'यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार वितरण समारंभ

विभागीय केंद्राच्यावतीने त्या विभागातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवराला २०१५ पासून 'यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार' देण्याचा निर्णय मध्यवर्ती केंद्राच्या वतीने घेण्यात आला. २०१५ चा प्रथम पुरस्कार सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या मा. डॉ. रुपाताई-बोधी-कुलकर्णी यांना देण्यात आला. हा पुरस्कार सोहळा बुधवार, दि. २५ नोव्हेंबर २०१५ रोजी प्रसिध्द साहित्यिक व विचारवंत मा. डॉ. यशवंत मनोहर यांच्या शुभहस्ते सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी होते.

### सत्कार समारंभ

८९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष महाराष्ट्रातील शिक्षणतज्ज्ञ व विचारवंत मा. डॉ. पी. डी. पाटील यांच्या सत्काराचा कार्यक्रम सोमवार दि. ७ डिसेंबर २०१५ रोजी येथे सायं. ५.०० वाजता आयोजित करण्यात आला होता. प्रसिध्द साहित्यिक व विचारवंत मा. डॉ. यशवंत मनोहर यांच्या शुभहस्ते हा अभिनंदन सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक, समिक्षक व विचारवंत मा. डॉ. वि. स. जोग होते. याप्रसंगी नामांकीत पत्रकार व विचारवंत मा. श्री. मधुकरराव भावे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभदा फडणवीस यांनी केले.

### अभिनंदन सोहळा

विभागीय केंद्र, नागपूर आणि नागपूर श्रमिक पत्रकार संघ व ट्रस्ट, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने मा. श्री. यदु जोशी यांची महाराष्ट्रराज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष झाल्याबद्दल व मा. राही भिडे यांची दैनिक पुण्यनगरीच्या मुख्य संपादकपदी नियुक्ती झाल्याबद्दल शनिवार, दि. १९ डिसेंबर अभिनंदन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

हा अभिनंदन सोहळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते व माजी खासदार मा. श्री. बनवारीलालजी पुरोहित यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

याप्रसंगी महाराष्ट्राचे ऊर्जा मंत्री तसेच नागपूरचे पालकमंत्री मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी व आभार प्रदिप मैत्र यांनी मानले.

### सुवाच्य हस्ताक्षर स्पर्धा

विभागीय केंद्र नागपूर, रायसोनी ग्रुप, रमन विज्ञान केंद्र आणि अक्षरभूषण मधुकर भाकरे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेच्या पुरस्कार वितरण समारंभाप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे ऊर्जामंत्री व पालकमंत्री नागपूर मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे ज्येष्ठ नेत्रतज्ज्ञ डॉ. विकास महात्मे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष गिरीश गांधी, संस्थापक अध्यक्ष, अण्णाजी मेंडजोगे, रायसोनी ग्रुपचे उपाध्यक्ष हेमंत सोनारे, राजाभाऊ चिटणीस, करगुटकर, मेजर हेमंत जकाते आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी परभणीचे गोविंद नामदेव पांचाळ यांना उत्कृष्ट शिक्षक जीवन गौरव देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेतील पारितोषिक विजेते गट अ-वर्ग ८ ते १० ऐश्वर्या आडे (साऊथ पॉईंट) स्कूल) हर्षल तलमले (विश्वास माध्यमिक शाळा), शीतल नंदेश्वर (जवाहरलाल नेहरु विद्यालय), उत्तेजनार्थ-तृप्ती काशीकर, विशाखा मोहिते, सोनल जोगदंड, प्रांजल सावरकर, आंचल कराडे, माध्यमिक गट - वर्ग ५ ते ७ - अनुष्का पाटील (पं. बच्छराज व्यास विद्यालय), राहुल कुंभारे (स्कूल ऑफ कॉलर्स), उत्तेजनार्थ - भारत यादव, अमृता लभाने, सना मताउल्लाह खान, सुखदा भोयर, समृध्दी भाकरे, विशेष पुरस्कार - सुश्रुती नाकाडे, सुभाष सलोखे, प्राथमिक गट - वर्ग१ ते ४ - प्राजक्ता भुजाडे (नवयुग प्राथमिक शाळा), देवश्री चुटे (बी. के. व्ही. व्ही.), वैष्णवी ठवरे (नवयुग राजाबाक्षा), उत्तेजनार्थ - एंजल वालदे, अनुष्का शेंडे, नियुक्ती शहा, नामश्री मोहुर्ले, मंथन राऊत यांचा समावेश आहे.

### प्रकाशन समारंभ

विभागीय केंद्र, नागपूर आणि रसिकराज साहित्य संस्था, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ कवी मा. श्री. भाऊराव कुऱ्हाडे यांच्या 'संत येती घरा' या पुस्तकाचे प्रकाशन सोमवार, दि. २८ डिसेंबर २०१५ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृहात सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

हा पुस्तक प्रकाशन सोहळा माजी कुलगुरु डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला मा. डॉ. शरद निंबाळकर यांच्या शुभहस्ते व सुप्रसिध्द साहित्यिक, समिक्षक मा. डॉ. प्रज्ञा आपटे, श्री. पुंडलिक महाराज संस्थान, मुर्तिजापूरचे अध्यक्ष मा. श्री. विठ्ठलराव पातोंड, संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक मा. प्रा. डॉ. नारायण निकम, उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर मा. डॉ. संजय जयस्वाल व सुप्रसिध्द कवी व संस्थापक अध्यक्ष रसिकराज, नागपूर मा. डॉ. बळवंत

भोयर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

**मुक्तचर्चा**

विभागीय केंद्र, नागपूर यांच्यावतीने शुक्रवार, दि. ८ जानेवारी २०१६ रोजी ''विद्या की अविद्या ? शिक्षण खरे कोणते-सध्याचे की १८५४ पूर्वीचे ?'' या विषयावर महिला महाविद्यालय नंदनवनच्या प्राचार्या मा. डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे सायं. ५.३० वाजता 'मुक्त चर्चेचे' आयोजन करण्यात आले.

**चालता-बोलता वर्षारंभ अंक**

विभागीय केंद्र, नागपूर व अभिव्यक्ती वैदर्भीय लेखिका संस्था यांच्या संयुक्तपणे 'चालता बोलता वर्षारंभ अंक' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वार्षिकांकाची सर्व सदरे व्यासपीठावरुन सादर होतात हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य असून यात वैचारिक आध्यात्मिक, सामाजिक, ललित, कथा, कविता, जाहिराती इ. विविध सदरांचा समावेश असतो.

शनिवार, दि. ९ जानेवारी २०१६ रोजी सायं. ५.०० वाजता राष्ट्रभाषा संकुलाच्या सभागृहात सादर करण्यात आलेल्या या कार्यक्रमात डॉ. सुनीती देव यांचे 'स्त्री शुचिता' या विषयावर वैचारिक मंथन, ॲड्. अतुल सोनक आणि प्रिती वडनेरकर यांचे अनुभव कथन, सुनंदा साठे आणि आजच्या परिस्थितीवर भाष्य करणारी नाटुकली, निखील नागपूरकर, मनोज वैद्य, वर्षा-किडे-कुलकर्णी यांच्या कविता, मिश्किल जाहिराती इ. सदरे सादर करण्यात आली. शर्मिला महादेवकर यांची खुसखुशीच कथा चि. सार्थक पाडगावकरांचे बालगीते सादर केली.

अंकाचे मुखमृष्ठ पूर्वा गंगाखेडकर यांच्या नृत्याने तर समारोपाचे पान वीणा कुलकर्णी यांच्या पसायदानाने सजले. संकल्पना आणि निवेदन स्वाती सुरंगळीकर यांचे होते. सलग तिसरे वर्षी हा अंक सादर करण्यात आला. संपादन संस्थेच्या अध्यक्षा सुप्रिया अय्यर यांचे तर संयोजन हेमा नागपूरकर यांचे होते. प्रतिष्ठानचे विभागीय अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी यांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले.

**कही-अनकही**

विभागीय केंद्र, नागपूर यांच्यावतीने रविवार, दि. १० जानेवारी, २०१६ रोजी ''कही-अनकही'' या खुल्या चर्चेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत प्रसिध्द गायक श्री. एम. ए. कादर व श्रीमती जीनत कादर यांच्या संगीताचा दीर्घ प्रवास, वरीष्ठ साहित्यकार डॉ. सागर खादीवाला यांच्याशी संवाद साधत उलगडला.

यावेळी साहित्यिक डॉ. सागर खादीवाला यांनी मुलाखत रंगवली. याप्रसंगी कादर यांनी अनेक घटना, प्रसंग यांचा उलगडा केला. तसेच त्यांनी जिगर मुरादाबादी, गालिब, दाग आणि सागर खादीवाले यांचीच एक गजल सादर केली. 'मेरे कातिल वो ही निकले जिनको मैने यार लिखा है, सीना तो बेदाग है मेरा पीठ पे मेरे वार लिखा है.' मेहंदी हसन यांची 'रंजिश ही सही' ही गजल दाद घेऊन गेली. झीनत कादर यांनी 'तुम मुझे यु भुला न पाओगे', 'यही तो जगह है' हे गीत सादर करुन उपस्थितांची दाद मिळवली.

**संविधान साक्षरता वर्ष**

विभागीय केंद्र, नागपूर, संविधान फाऊंडेशन व सकाळ परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. २५ जानेवारी 'संविधान साक्षरता वर्ष' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

मा. डॉ. गिरीश गांधी हे अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ विचारवंत मा. डॉ. यशवंत मनोहर, प्रमुख वक्ते म्हणून तर माजी सनदी अधिकारी मा. श्री. ई. झेड, खोब्रागडे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

★★★

# विभागीय केंद्र, कऱ्हाड
## कार्यवृत्त

मा. आ. प्रणिती शिंदे यांनी २७ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजता 'विरंगुळा' या स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या निवास स्थानाला भेट दिली. सन्माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे यांचा स्व. यशवंतरावजी यांच्या बरोबर ४० वर्षांपूर्वी झालेला पत्रव्यवहार त्यांनी यावेळी पाहिला. कराडच्या नगराध्यक्षा ॲड्. विद्याराणी साळुंखे याही यावेळी उपस्थित होत्या.

- थोर समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे व डॉ. सौ. मंदाकिनी यांनी विरंगुळ्याला भेट दिली. त्यांच्यासमवेत ॲड्. विद्याराणी साळुंखे, मा. आमदार बाळासाहेब पाटील आणि अनेक मान्यवर होते. डॉ. प्रकाश आमटे यांचे पिताश्री स्व. बाबा आमटे यांचा व स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांचा पत्रव्यवहार होता. तो पत्रव्यवहार डॉ. आमटे व सौ. आमटे यांनी पाहिला. त्यानंतर सौ. वेणूताई सभागृहात त्यांचे व्याख्यान झाले. नामदार मा. रामराजे नाईक निंबाळकर समारंभाचे अध्यक्ष होते. पी. डी. पाटील प्रतिष्ठान कराडतर्फे डॉ. प्रकाश आमटे यांना पी. डी. पाटील पुरस्कार, नामदार मा. रामराजे नाईक यांच्याहस्ते देण्यात आला. मा. आमदार बाळासाहेब पाटील यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले.

- स्व. यशवंतरावजी चव्हाणसाहेब यांच्या ३१ व्या पुण्यतिथी निमित्त सन्माननीय शरदचंद्रजी पवारसाहेब अध्यक्ष यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांनी सकाळी ९ वाजता विरंगुळा स्थळी भेट दिली. मा. कलाप्पा आण्णा आवाडे, मा. रामराजे नाईक निंबाळकर, मा. जयंत पाटील, मा. आमदार शशिकांत शिंदे, मा. आमदार विक्रमासह पाटणकर त्याचप्रमाणे मा. आमदार बाळासाहेब पाटील आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज कराड आणि सौ. वेणूताई चव्हाण कला वाणिज्य महाविद्यालय कराड या दोन्ही कॉलेजचे प्राचार्य सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका याशिवाय मा. प्रकाश बापू पाटील, संभाजीराव पाटील, शंकराण्णा संसुद्दी, रामभाऊणे कणसे, मुकूंदराव कुलकर्णी, नगराध्यक्षा ॲड्. विद्याराणी साळुंखे इ. प्रमुख मान्यवर यावेळी उपस्थित होते.

★★★

# विभागीय केंद्र, नाशिक
# कार्यवृत्त

**निसर्गचित्र प्रदर्शन आणि प्रकाशन सोहळा**

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यात ठाणगांव येथील पुंजाजी रामजी भोर विद्यालय व डॉ. अण्णासाहेब कनिष्ठ महाविद्यालयमधील बालचित्रकारांनी आपल्या कुंचल्यातून निसर्गचित्रण साकारले. यात निसर्गात होणारे रंगाचे बदल, वातावरण निर्मित, उत्तम रचना आणि रंगाचा समतोल या विद्यार्थ्यांनी साधला. यामध्ये बालचित्रकार गायत्री मोरे, चंचल काकड, निलेश जाधव आदींनी चित्रनिर्मिती केली.

या ग्रामीण भागातील बालकलावंतांना एक मोठे व्यासपीठ मिळावे, त्यांची कला सर्वदूर पोहचावी, कलेला वाव मिळावा यासाठी तेथील शिक्षक कर्मचाऱ्यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिक यांच्याशी संपर्क साधला. त्यानुसार प्रतिष्ठानने बालचित्रकारांकरीता दि. २७ नोव्हेंबर २०१५ रोजी ''कुसुमाग्रज दालन'' मोफत उपलब्ध करुन दिले.

तसेच विद्यालयाच्या विद्यार्थीनिर्मित काव्य संग्रह 'पारंबीचा झुला' याचे प्रकाशन प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. विनायक पाटील यांच्या शुभहस्ते यावेळी करण्यात आले.

★★★

# विभागीय केंद्र, लातूर
## कार्यवृत्त

### दि. १७ सप्टेंबर २०१५ मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन

लातूर विभागीय केंद्राच्या वतीने सालाबादप्रमाणे मराठवाड्याला मुक्ती मिळावी म्हणून ज्या थोर स्वातंत्र्यसैनिकांनी आपले बलिदान पत्करले अशा थोर स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मृतीप्रित्यर्थ 'निलंगा येथे गुरुवार, दि. १७ सप्टेंबर रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईचे विश्वस्त माजी मुख्यमंत्री डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी स्वातंत्र्यसैनिकांचा सत्कार आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे व सचिव हरिभाऊ जवळगे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एन. एरंडे यांनी केले. प्रमुख वक्ते डॉ. जनार्दन वाघमारे म्हणाले की, मराठवाडा मुक्तीसंग्रामातील थोर स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या मुलाबाळाची, घराची पर्वा न करता मराठवाड्याला मुक्ती मिळवून देण्यासाठी जे प्रयत्न केले त्या प्रयत्नाबद्दल आपल्याकडे शब्द अपुरे आहेत. आता मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांनी आपले बलिदान पत्करुन मिळवून दिलेला हा मराठवाडा कसा सुफलाम सुजलाम होईल, येणाऱ्या नैसर्गिक प्रसंगावर मात करुन जनजीवन कसे सुरळीत होईल यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर म्हणाले, मी स्वत: मराठवाडा मुक्तीसंग्रामातील सैनिक असून माझ्या शालेय जीवनात मी या लढ्यात उडी घेतली. हे मिळालेला यश आपल्या सर्वांचे आहे तेव्हा या देशाचे जोपासना माणुसकीने होणे गरजेचे आहे. सचिव हरिभाऊ जवळगे यांनी आभार मानले.

### विचार मंथन

पुरोगामी विचारवंत व अस्वस्थ समाज या विषयावर व्यापक विचार मंथन व जनजागरण या घ्यावयाच्या कार्यक्रमाच्या संदर्भात रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०१५ रोजी विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत वरील विषयाची चर्चा करुन वरील विषयाचा परिसंवाद व त्या परिसंवादात डॉ. सुर्यनारायण रणसुभे, ॲड्. मनोहरराव गोमारे, डॉ. नागोराव कुंभार, ॲड्. प्रभाकर येरोळकर, प्रा. फ. म. शहाजिंदे या मान्यवरांचा सहभाग घ्यावयाचे ठरले.

### ज्येष्ठ नागरीक आनंद सोहळा

उस्मानाबाद येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईचे कार्यकारिणी सदस्य मा. श्री. जीवनराव गोरे यांच्या अध्यक्षतेखाली लातूर विभागीय केंद्राचा जेष्ठ नागरीक आनंद सोहळा साजरा करण्यात आला. या सोहळ्याचे प्रमुख वक्ते विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे हे होते तर प्रमुख पाहुणे मा. नानासाहेब पाटील माजी नगराध्यक्ष उस्मानाबाद व मा. वसंतराव नागदे होते. याप्रसंगी डॉ. जनार्दन वाघमारे म्हणाले, जेष्ठ नागरीकांनी आहे त्या परिस्थितीत स्वत:चा संयम राखून सर्वांशी प्रेमाने वागून जीवन जगण्याचा सल्ला दिला. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी केले. तर सर्वांचे आभार विभागीय केंद्राचे उस्मानाबाद प्रमुख रमेश दापके यांनी मानले. याप्रसंगी लातूर विभागीय केंद्रातर्फे जेष्ठ बंधू भगिनींचा सत्कार करण्यात आला.

### अभिव्यक्ती स्वातंत्र्यांचा संकोच ही धोक्याची पूर्वसूचना
### डॉ. जनार्दन वाघमारे

दि. २१ ऑक्टोबर २०१५ : ''जो विचार समाजाला पढे नेण्याचा प्रयत्न करतो आणि माणूस केंद्रबिंदू मानतो तोच विचार पुरोगामी असतो. अशा विचाराला जर संपविण्याचा प्रयत्न होणार असेल तर ते पर्यायाने देशाच्या आणि समाजाच्या ऐक्याच्या दृष्टिकोनातून धोक्याचे आहे'', असे प्रतिपादन माजी खासदार तथा माजी कुलगुरु डॉ. जनार्दन वाघमारे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूरच्या वतीने आयोजित व्यापक विचारमंथन आणि जनजागरण कार्यक्रमात ते बोलत होते.

याप्रसंगी विचारपीठावर डॉ. सुर्यनारायण रणसुभे, प्रा. फ. म. शहाजिंदे, ॲड्. प्रभाकर येरोळकर, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, ॲड्. मनोहरराव गोमारे, प्रतिष्ठानचे सचिव हरिभाऊ जवळगे हे उपस्थित होते. यावेळी प्रभाकर येरोळकर म्हणाले की, ''आता डावे उजवे असा भेद उरलेला नाही. किंबहुना विचारधारांचा संघर्षच मिटलेला असल्याने दोन्ही बाजूकडील कट्टरपंथी डोके वर काढीत आहेत. निवडणूक सुधारणा आणि न्यायिक सुधारणा या कठोरपणे अंमलात आणून व्यवस्था परिवर्तन केले तरच अशा प्रकारांना भविष्यात आळा बसू शकेल.''

डॉ. नागोराव कुंभार यांनी पुरोगामी आणि प्रतिगामी यातील फरक स्पष्ट करुन विचारवंताची व्याख्या आपल्या भाषणातून समजावून दिली. प्रा. शहाजिंदे यांनी धर्मनिरपेक्षतेवर बोलताना कापरे भरावे इतकी परिस्थिती भयावह असल्याचे प्रतिपादन केले. तर डॉ. सुर्यनारायण रणसुभेयांनी मागील अनेक दशकातील खानपान संस्कृती व इतर उदाहरणे देवून अभ्यासपूर्ण पट श्रोत्यांपुढे ठेवला. ॲड्. मनोहरराव गोमारे यांनी दिवसाढवळ्या पानसरे, दाभोळकर, कलबुर्गी यासारख्या विचारवंताचे खून पडत असताना समाज पेटून का उठत नाही यावर प्रश्नचिन्ह उभे केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी मानले तर सूत्रसंचालन विवेक सौताडेकर व आभार प्रदर्शन प्राचार्य एन. एम. मोटे यांनी केले.

**गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर २०१५**

नांदेड येथे दि. ३० नोव्हेंबर २०१५ रोजी, लातूर येथे दि. २५ नोव्हेंबर २०१५ मा. चव्हाण साहेबांची पुण्यतिथी, दि. २६ नोव्हेंबर संविधान दिन, दि. २८ नोव्हेंबर महात्मा फुले यांचा स्मृतिदन यानिमित्ताने घ्यावयाच्या कार्यक्रमासंदर्भात डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात येवून या बैठकीत वरील कार्यक्रमाची सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीनिमित्त जमलेल्या सर्व मान्यवरांचे मन:पूर्वक आभार विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी मानले.

**मंगळवार, दि. २५ ऑक्टोबर २०१५**

विभागीय केंद्र लातूर व पीपल्स कॉलेज नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने समकालीन युवकांच्या समस्या या विषयावर विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे यांनी युवकांशी संवाद साधला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लातूर विभागीय केंद्राचे संचालक प्राचार्य डॉ. व्ही. एन. इंगोले उपस्थित होते. प्रास्ताविक लातूर विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अमोल काळे यांनी केले. शेवटी सर्वाचे आभार प्रा. डॉ. सिध्दार्थ सिध्देवाड यांनी मानले.

**शुक्रवार, दि. ४ नोव्हेंबर २०१५**

हिंगोली येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई शाखा नांदेडच्या वतीने मराठी राजभाषा दिनानिमित्त मराठी भाषेचा उदय आणि विषय या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष लातूर विभागीय केंद्राचे संचालक प्राचार्य डॉ. गोपाळराव सोंडगे होते तर कार्यक्रमाचे वक्ते प्रा. बालाजी पोतूलवार हे होते. त्याप्रसुंगी प्रा. डॉ. अमोल काळे, प्रा. डॉ. बाजीराव वडवले उपस्थित होते.

**रविवार, दि. ८ नोव्हेंबर २०१५**

बुधवार, दि. २५ नोव्हेंबर २०१५ यादिवशी स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या ३१ व्या स्मृतिदिनानिमित्त घ्यावयाच्या कार्यक्रमाच्या संदर्भात व सोमवार, दि. २८ डिसेंबर २०१५ रोजी नांदेड येथे मुंबई प्रतिष्ठानचे अध्यक्ष माजी कृषीमंत्री मा. खा. शरचंद्रजी पवार साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त घ्यावयाच्या कार्यक्रमाची चर्चा डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात येवून याप्रसंगी कार्यक्रमाचे स्वरुप, विषय व या स्मृतिदिनानिमित्त दि. २६ नोव्हेंबर, २८

नोव्हेंबर या तारखांचे कार्यक्रम घेण्याचे ठरले.

**दि. १४ नोव्हेंबर २०१५**

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीनिमित्त जवाहरलाल नेहरु व बालक दिन या विषयावर प्रा. एस. टी. कुलकर्णी यांचे यशवंत नगर येथे बालवाडीमध्ये विभागीय केंद्राच्यावतीने बालगीते घेण्यात आली.

**बुधवार, दि. २५ नोव्हेंबर २०१५**

यशवंतराव चव्हाण यांच्या ३१ व्या स्मृतिदिनानिमित्त लातूर महानगरपालिकेच्या समोरील यशवंतराव चव्हाण या पुर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विभागीय केंद्राचे अध्यक्ष जनार्दन वाघमारे, सचिव हरिभाऊ जवळगे, जेष्ठ संचालक मनोहरराव गोमारे, लक्ष्मीरमण लाहोटी इ. मान्यवर उपस्थित होते.

**सोमवार, दि. ३० नोव्हेंबर २०१५**

सामाजिक न्यायावर आधारलेली समाजरचनाच आधुनिक काळाशी सुसंगत व शाश्वत असून भारतासारख्या आर्थिक व सामाजिक विषमतेत बुडालेल्या राष्ट्राला एकत्र बांधून ठेवण्यासाठी महात्मा ज्योतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारच तारु शकतील, असे उद्‌गार माजी कुलगुरु व माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांनी विभागीय केंद्र लातूरतर्फे यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी २५ नोव्हेंबर, संविधान दिन दि. २६ नोव्हेंबर आणि महात्मा फुले पुण्यतिथी २८ नोव्हेंबरचे निमित्त भारतीय संविधान आणि सामाजिक न्याय या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादाचा अध्यक्षीय समारोप करताना काढले. आपल्या भाषणात डॉ. वाघमारे पुढे म्हणाले की, भारत एक विविधतापूर्ण देश असून सर्वांना न्यायाची हमी देत असतानाच वंचितांना विशेष सवलती व झुकते माप देऊन समता आणि सामाजिक न्यायाची हमी देणारी एक अत्यंत उत्तम अशी राज्यघटना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीने निर्माण केली आणि २६ नोव्हेंबर १९४६ रोजी ती घटना समितीने स्विकारली. त्यामुळे भारत हे एक सार्वभौम, प्रजासत्ताक, धर्मनिरपेक्ष, समाजवादी, गणराज्य निर्माण झाले. घटना कितीही चांगली असली तरी तिचे यश हे ती राबविणाऱ्या लोकांवर अवलंबून असते. यशवंतराव हे अशा चांगल्या राज्यकर्त्यांपैकी एक होते, त्यामुळे त्यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. याप्रसंगी डॉ. शिवराज नाकाडे, प्राचार्य डॉ. व्ही. एन. इंगोले आणि ॲड्. आण्णाराव पाटील यांनी परिसंवादात आपले विचार मांडले. डॉ. नाकाडे म्हणाले की, घटनेत अनेक चांगल्या व मानवतावादी तरतूदी आहेत, परंतु त्याची व्यवहारात अंमलबजावणी होत नाही. त्यासाठी लोकांनी जागरुक राहून सामाजिक न्यायाची प्रतिष्ठापना केली पाहिजे. पीपल्स कॉलेज, नांदेडचे प्राचार्य डॉ. व्ही. एन. इंगोले म्हणाले की, घटना समितीत अत्यंत विद्वान व आधुनिक शिक्षण घेतलेले लोक होते. त्यांनी सखोल चर्चा करुन अत्यंत विचारपूर्वक राज्यघटना निर्माण केली असून स्वातंत्र्य चळवळीतून घटनेचा आशय साकार झालेला असल्यामुळे देशात राजकीय, सामाजिक व आर्थिक न्याय निर्माण करण्याचा त्यांचा निर्धार होता. घटनेतील मुलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्त्वातील अनेक तरतूदी व १६ व्या प्रकरणातील तरतूदी दुर्बल घटकांच्या हिताचे रक्षण व विशेष संधीची व्यवस्था करतात. या सामाजिक न्यायाच्या तत्त्वामुळेच गेली ६५ वर्षे भारतात लोकशाही अव्याहतपणे चालू आहे. ॲड्. आण्णाराव पाटील यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या शैक्षणिक, सामाजिक व विकासाविषयक कामाचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी केले. सूत्रसंचलन पोफडे जी. एस. यांनी केले. ॲड्. मनोहरराव गोमारे यांनी मानले. कार्यक्रमाला लातूर शहरातील सर्व स्तरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गुरुवार, दि. २४ डिसेंबर २०१५**

परमपूज्य साने गुरुजी यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी महाविद्यालय हिंगोली येथे लातूर विभागीय केंद्राचे जेष्ठ संचालक

या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळराव सोंडगे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विभागीय केंद्राचे नांदेड जिल्हा ग्रामीण विभागप्रमुख प्रा. उत्तम सुर्यवंशी हे होते. या कार्यक्रमाचा विषय आजची शिक्षणपध्दती हे गरीब जनतेला परवडते का ? या विषयावर प्रा. उत्तम सुर्यवंशी म्हणाले, सध्या बिकट परिस्थिती आहे. जो परिस्थितीने गरीब आहे. अशा पालकांचे मुल उच्च शिक्षणापासून दूर जात आहेत. कारण, हा वाढलेला खर्च त्यांच्या अवाक्याच्या बाहेर आहे. साने गुरुजींनी ज्या विचारांनी शिक्षणाचा प्रचार प्रसार केला तो विचार सध्या लोप पावत आहे. याप्रसंगी विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी गरीब प्रतिकूल परिस्थितीत सर्व जातीपंथांच्या मुलामुलींना कशा पध्दतीने शिक्षण घेता येईल याकडे आजच्या सर्व कनिष्ठ वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांनी लक्ष देणे त्याचबरोबर आपल्या मिळणाऱ्या पगारातून अशा मुलामुलींना आर्थिक मदत करणे ही काळाची गरज आहे, असे सांगितले.

### रविवार, २७ डिसेंबर २०१५

विभागीय केंद्र लातूर व मा. शरदचंद्रजी पवार अमृतमहोत्सव समिती, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने मा. शरदचंद्रजी पवार यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने 'शेती व शेतकऱ्यांचे भवितव्य' या विषयावर विचाराचा जागर हा परिसंवाद व कविसंमेलन आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी कुलगुरु तथा जेष्ठ विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे हे होते. विचारांचा जागर या परिसंवादात प्रमुख वक्ते म्हणून सुप्रसिध्द जलतज्ञ मा. विजय अण्णा बोराडे, माजी आमदार मा. पाशा पटेल, शेतकरीनेते मा. विजय जावंदिया (वर्धा), अमर हबीब, लक्ष्मण वंगे या मान्यवरांनी सविस्तर अभ्यासपूर्ण असे आपले विचार मांडले.

या परिसंवादात प्रसिध्द जलतज्ञ मा. विजय अणा बोराडे (औरंगाबाद) म्हणाले, ''उद्योगाला नव्हे तर शेतीच्या पाण्याला प्राधान्य देणे सद्यस्थितीत काळाची गरज आहे. पिण्याच्या पाण्यानंतर शेती व शेतीनंतर उद्योगाला पाणी द्यावे असे नियोजन असतानाही महाराष्ट्रात पिण्याच्या पाण्यानंतर उद्योगाला पाणी देण्याची भाषा केली जात आहे.''

याप्रसंगी जेष्ठ शेतकरी संघटनेते नेते तथा जेष्ठ पत्रकार अमर हबीब म्हणाले की, ''शासनाने पूर्वीपासून शेतीविरुध्द कायदे केल्याने शेतकऱ्यांचे प्रश्न सुटत नाहीत. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत, तेव्हा येत्या ११ एप्रिल रोजी महात्मा फुले यांच्या जन्मदिनानिमित्त शेतकऱ्यांनी अशा शेतीविरुध्द कायद्याची होळी करावी, असे म्हटले.

थोर प्रगतशील शेतकरी नेते विजय जावंदिया (वर्धा) हे आपल्या भाषणात म्हणाले की, ''हा देश शेतीप्रधान देश आहे परंतु सर्वांच्या पोटाची काळजी करणाऱ्या बळीराजावर आज आत्महत्येची वेळ आली आहे. यासाठी निसर्गाबरोबरच येथील राज्यव्यवस्थाही तेवढीच जबाबदार आहे. लोट्याने गंगा वाहत नाही तर कृषीविषयक कायद्यात धोरणात्मक बदल करण्याची गरज आहे. तसेच शेती करताना गावच्या गरीबीचे कारण गावात नाही. शेतमालक, शेतमजूर संघर्षात नाही तर शेतीला लुटणाऱ्या व्यवस्थेत आहे.''

या महत्त्वपूर्ण परिसंवादाचा समारोप करताना या परिसंवादाचे अध्यक्ष थोर विचारवंत माजी कुलगुरु माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे म्हणाले की,''आजच्या परिसंवाद अत्यंत यशस्वी झाला असून परिसंवादात सहभागी झालेल्या सर्वच मान्यवरांनी आपले अभ्यासपूर्ण यशस्वीरित्या मांडले. या सर्व बाबींचा आवाज किंवा विचार शासनापर्यंत वृत्तपत्र व सर्व प्रसिध्दीमाध्यमातून गेला पाहिजे. कारण, या विचाराला वाचा फुटल्याशिवाय शेतकऱ्यांचे अमाप दु:ख दूर होणार नाही.'' असा आशावाद डॉ. वाघमारे यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी विचारमंचावर विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे, माजी न्यायमूर्ती विजय बोडके, प्राध्यापिका दर्शना देशमुख, ॲड्. मनोहरराव गोमारे, प्राचार्य करबर अप्पा पोपडे, विजयसिंह बोराडे पाटील इ. मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तावित हरिभाऊ जवळगे यांनी केले तर सूत्रसंचलन विवेक सौताडेकर यांनी केले. शेवटी सर्वांचे आभार जेष्ठ विधीज्ञ व विभागीय केंद्राचे जेष्ठ संचालक ॲड्. मनोहरराव गोमारे यांनी

मानले.

दुसऱ्या सत्रात प्राचार्य दर्शना देशमुख लिखित 'हिरव सपनं' या कवितासंग्रहाचे प्रकाशन जेष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे यांच्याहस्ते झाले. याप्रसंगी डॉ. नागोराव कुंभार (संपादक, विचारशलाका),प्रा. फ. म. शहाजिंदे (जेष्ठ साहित्यिक), मा. हरिभाऊ जवळगे (जेष्ठ नाटककार), मा. देविदास फुलारी (जेष्ठ साहित्यिक), रविचंद्र हडसनकर, मा. श्री. शेषेराव मोहिते (जेष्ठ साहित्यिक) व विजयकुमार बोडके पाटील (माजी न्यायमूर्ती), मा. ॲड्. मनोहरराव गोमारे इ. मान्यवर उपस्थित होते.

या प्रकाशन सोहळ्यानंतर मा. देविदासराव फुलारी (जेष्ठ साहित्यिक) यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन संपन्न झाली. या कविसंमेलनात राजेसाहब कदम (अहमदपूर), प्रा. विजय मिरासे (यवतमाळ), प्रा. प्रभाकर साळेगावकर (माजलगाव), प्रा. मुकूंद राजपंखे (अंबाजोगाई), मा. सत्यप्रेम लगड (बीड), मा. माधव गरड (उस्मानाबाद), मा. रविचंद्र हडसनकर (नांदेड), प्रा. चंद्रशेखर मलकमपट्टे (उदगीर), प्रा. सौद्य सुनिता बोडके (औरंगाबाद), मा. योगीराज माने (लातूर), प्रा. दर्शना देशमुख (लातूर), मा. प्रकाश काळे (लातूर), सौ. शैलजा कारंडे (लातूर), मा. भारत सातपुते (लातूर), प्रा. नरसिंग इंगळे (लातूर), सौ. नयन राजमाने (लातूर), सौ. विनाता पाटील (लातूर) यांनी आपला सहभाग नोंदविला.

**शरदचंद्रजी पवार यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त नांदेड येथे कार्यक्रम**

मा. यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर पहिले मुख्यमंत्री म्हणून अत्यंत प्रतिकूल राजकीय परिस्थितीत राज्याचे सूत्रे स्विकारली. त्यावेळी राज्याच्या विविध विभागांमध्ये परस्पराबद्दल अविश्वास, संशय व तणावाचे वातावरण होते. त्यामुळे प्रादेशिक एकात्मता निर्माण करण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. या सर्व बिकट अवस्थेतून महाराष्ट्राला बाहेर काढण्याचे काम यशवंतरावांनी केले मात्र त्यांच्यानंतर मात्र महाराष्ट्राचे राजकारण भरकटले असल्याचे प्रतिपादन राजकीय विश्लेषक प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी केले.

विभागीय केंद्र लातूर आणि पीपल्स कॉलेजच्या राज्यशास्त्र विभागाच्या वतीने मा. शरद पवार यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित परिसंवादात ते बोलत होते. ते म्हणाले, यशवंतरावानंतर काही मुख्यमंत्र्यांनी चांगले प्रयत्न केले. त्यात वसंतराव नाईक, शरद पवार आणि शंकरराव चव्हाण यांचा समावेश आहे. यशवंतरावांच्या वेळी जातीय व सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणावर होती. त्यामुळे सामाजिक न्यायाची प्रस्थापना करण्याचे मोठे आव्हान त्याच्यासमोर होते. परंपरागत सामाजिक मुल्ये आणि सरंजामशाही मनोवृत्तीला आधुनिकतेत रुपांतरीत करणे हाही महत्त्वाचा प्रश्न होता. त्यातून एकसंघ, विकसित, संपन्न व आधुनिक महाराष्ट्र निर्माण करण्याचा निर्धार यशवंतरावांनी केला होता. त्याची अमंलबजावणी नेटाने केली.

माजी मंत्री कमलकिशोर कदम म्हणाले, शरद पवार यांनी अत्यंत काळजीपूर्वक परिस्थीती हाताळत सहमतीचे राजकारण केले. त्यामुळे अनेक पक्षात त्यांचे मित्र आहेत. एक सहकारी या नात्याने पवार यांच्यासोबतच्या वैयक्तिक आठवणीही त्यांनी सांगितल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अशोक सिध्देवाड यांनी केले. प्रास्ताविक प्रा. उत्तमराव सुर्यवंशी तर हरिभाऊ जवळगे यांनी आभार मानले.

★★★

# देवराष्ट्रे
## कार्यवृत्त

दि. १ सप्टेंबर २०१५ ते ३१ जानेवारी २०१६ या पाच महिन्याच्या कालावधीत जन्मघर स्मारकास सुमारे १३८८ पर्यटकांनी तर ८ शाळांनी भेट दिली. या पाच महिन्याचा सविस्तर अहवाल.

- दि. १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर या कालावधीत ३२४ पर्यटकांनी तर २ शाळांनी भेट दिली.

सांगली जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक बी. बी. पाटील यांनी जन्मघरास भेट दिली. तसेच शारदा सहकारी गृहनिर्माण संस्थेचे आर्किटेक्ट श्री. प्रमोद चौगुले यांनी जन्मघरास भेट दिली.

मंत्रालय सहायक - २०१५ चा बॅचच्या एकूण ७५ अधिकाऱ्यांनी भेट दिली.

- दि. १ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत २१० पर्यटकांनी व २ शाळांनी भेट दिली.

या कालावधीत मंत्रालय सहायक २०१४ बॅचच्या एकूण ४५ अधिकाऱ्यांनी भेट दिली. दि. १६-१०-१५ रोजी मंत्रालयातील अप्पर सचिव श्री. रा. ना. मुसळे, प्र. जिल्हा माहिती अधिकारी सांगलीच्या श्रीमती संपदा द. बीडकर यांनीही भेट दिली. तसेच अॅवार्ड संस्था सातारा या संस्थेच्या अधिकाऱ्यांनी भेट दिली. हि संस्था संपूर्ण महाराष्ट्रात अंध व्यक्तीच्यासाठी कार्यरत आहे.

- दि. २५ नोव्हेंबर रोजी देवराष्ट्रे येथे स्व. यशवंतरावजीच्या जन्मघर स्मारकात स्मृतिदिनाचा कार्यक्रम पार पडला.

यावेळी क्रांती सह. साखर कारखान्याचे चेअरमन श्री. अरुण (अण्णा) लाड यांच्याहस्ते यशवंतरावजीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना श्री. अरुण आण्णा यांनी स्मारकासाठी देवराष्ट्रेच्या ग्रामस्थांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे बोलून दाखवली.

यावेळी प्रांताधिकारी श्री. दादासाहेब कांबळे, क्रांती कारखान्याचे व्हा. चेअरमन, श्री. भिमराव महिंद, सरपंच सौ. कल्पना मोरे, पत्रकार दत्ता सपकाळ, बाबासो शिंदे यांनीही स्व. यशवंतरावजीच्या प्रतिमेस पुष्पांजली वाहिली.

- १ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत जन्मघर स्मारकास ३१६ पर्यटकांनी व १ शाळेने भेट दिली. यारेळी कराडचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. डॉ. एस. टी. अल्वारिया यांनी भेट दिली.

- १ जानेवारी ते ३० जानेवारी या कालावधीत जन्मघर स्मारकास ३६७ पर्यटकांनी व ३ शाळांनी भेटी दिल्या.

★★★

# ६ वा यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - २०१६
## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व पुणे फिल्म फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आणि महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने या महोत्सवाचे आयोजनकरण्यात आले. शुक्रवार, २२ जानेवारी २०१६ ते २८ जानेवारी २०१६ दरम्यान चव्हाण सेंटर, मुंबई येथे '६ वा यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०१६' आयोजित करण्यात आला. या महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवारी २२ जानेवारी २०१६ रोजी सायंकाळी ५ वाजता प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते करण्यात आले. चित्रपट क्षेत्रात भरीव योगदानादाबद्दल दरवर्षी कलावंतास दिला जाणारा पुरस्कार यंदा ज्येष्ठ अभिनेत्री वहिदा रेहमान यांना दिला. या उद्घाटन प्रसंगी सरचिटणीस, श्री. शरद काळे, कोषाध्यक्ष श्री. हेमंत टकले, डॉ. जब्बार पटेल, मुख्य समन्वयक श्री. महेंद्र तेरेदेसाई उपस्थित होते.

जागतिक स्तरावरील दर्जेदार कलाकृतीचा आस्वाद भारतीयांना घेता यावा तसेच या कलाकृतींचे कौतुक व्हावे या मुख्य उद्देशाने चित्रपट महोत्सवाचे आयोजन केले जाते. या चित्रपट महोत्सवात अंदाजे ७५ आंतरराष्ट्रीय चित्रपट दाखविण्यात आले. गेल्या वर्षभरात जागतिक स्तरावर विविध चित्रपट महोत्सवात लक्षणीय ठरलेल्या चित्रपटांचा या महोत्सवात प्रामुख्याने समावेश होता. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना महोत्सवा दरम्यान होणाऱ्या कार्यशाळेत भाग घेण्याची सुवर्णसंधी देखील उपलब्ध आहे. महोत्सवाचे सर्वसाधारण कॅटलॉग शुल्क रु. ४००/- असून फिल्म क्लबचे सदस्य, ज्येष्ठ नागरीक व विद्यार्थ्यांसाठी रु. २००/- असे सवलत शुल्क निर्धारीत केले होते. त्याचप्रमाणे या महोत्सवा दरम्यान स्मिता पाटील स्मृती व्याख्यानमालेचे देखील आयोजन करण्यात आले. त्याचे पहिले पुष्प ज्येष्ठ दिग्दर्शक श्री. महेश भट यांनी वाहिले. यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा समारोप पटकथा लेखक श्री. अंजुम राजाबली यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावर्षी चित्रपट महोत्सवास वर्तमानपत्राद्वारे तसेच दूरचित्र वाहिणीद्वारे अतिशय चांगली प्रसिध्दी मिळाली आहे.

★★★

# !! भावपूर्ण श्रध्दांजली !!

## मा. मदन पाटील
**(आजीव सदस्य), सांगली**

दिवंगत मा. मदन पाटील यांच्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात सांगली नगरपरिषदेचे नगरसेवक ते नगराध्यक्ष या पदापासून झाले. त्यानंतर ते मे १९९६ ते डिसेंबर १९९७ संसद सदस्य म्हणून सांगली मतदार संघातून निवडून आले. त्यानंतर परत मार्च १९९८ ते एप्रिल १९९९ संसद सदस्य म्हणून निवडून गेले. मे २००० ते ऑक्टोबर २००४ पर्यंत ते विधान परिषदेचे सदस्य होते. तसेच ऑक्टोबर २००४ ते ऑक्टोबर २००९ पर्यंत ते विधानसभेचे सदस्य होते. मा. मदन पाटील डिसेंबर २००८ ते ऑक्टोबर २००९ पर्यंत महाराष्ट्र राज्याचे पणन, रोजगार हमी योजना, महिला व बालकल्याण या खात्याचे मंत्री होते. त्यानंतर जुलै २०१३ पासून उर्वरीत महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष होते.

मा. मदन पाटील यांनी वसंतदाद शेतकरी सहकारी साखर कारखाना सांगली, वसंतदादा शेतकरी सहकारी बँक सांगली, जिल्हा मध्यवर्ती बँक सांगली व महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ, महाराष्ट्र राज्य सहकारी भूविकास बँक इत्यादींचे अध्यक्षपद भूषविले. सांगली जिल्ह्यातील अनेक सार्वजनिक संस्थांचे ते अध्यक्ष होते. त्यांनी सहकारी व शैक्षणिक कार्यात मोलाचा कामगिरी केलेली आहे. त्यांच्या स्मृतींस विनम्र अभिवादन.

## मा. भंवरलालजी जैन

दिवंगत मा. भंवरलालजी जैन यांनी जैन उद्योग समूहाच्या माध्यमातून महाराष्ट्रात विज्ञानाधिष्ठित ठिबक सिंचनाच्या तंत्रज्ञानाद्वारे जे परिवर्तन घडविले आहे ते मौलिक आहे. त्यांनी जैन उद्योग समूहाचे जाळे जळगाव जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण भारत, अमेरिका व ईस्त्रायल सारख्या देशातही निर्माण करुन आपल्या कर्तृत्वांचा स्वतंत्र ठसा उमटविला आहे.

महात्मा गांधीजींचे विचार व कार्यावर त्यांची अतीव श्रध्दा व प्रेम असल्यामुळे त्यांच्या कल्पनेतून जळगावच्या जैन हिल्सवर त्यांनी 'गांधीतीर्थ' साकारले आहे. महात्मा गांधीजींच्या जीवनाचा आलेख तिथे कलात्मक रीतीने मांडल्यामुळे भावी पिढ्यांना त्या काळाचे व महात्माजींच्या जीवनमूल्यांचे दर्शन घडेल.

त्यांच्या आधुनिकतेची आणि अष्टपैलू कर्तृत्वाची दखल घेऊन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे सन नोव्हेंबर २००६ मध्ये 'यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाजरचना राज्यस्तरीय पारितोषिक' देऊन त्यांचा गौरव केला होता. त्यांच्या स्मृतींस विनम्र आदरांजली.

# !! भावपूर्ण श्रध्दांजली !!

## कविवर्य दिवंगत मंगेश पाडगांवकर

गेली सुमारे पासष्ट वर्षे आदरणीय मंगेश पाडगांवकरांच्या कवितेने मराठी रसिकांना चिंब केलेआहे. त्यांनी लिहिलेल्या भावगीतांनी अनेक पिढ्यांचे सांस्कृतिक पोषण झाले आहे, तर त्यांच्या बालगीतांनी मुलांचं भावजीवन समृध्द केले आहे. त्यांच्या सहज-सुंदर, रसिकांशी संवाद करणाऱ्या काव्याने मराठी साहित्याला समृध्द संपन्न केले. महाराष्ट्र शासनाने त्यांचा 'महाराष्ट्र भूषण' या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित केले.

तुमचं दु:ख खरं आहे.<br>
कळंत मला<br>
शपथ सांगतो, तुमच्या इतकंच छळतं मला<br>
पण आज माझ्यासाठी<br>
सगळं सगळं विसरायचं<br>
आपण आपलं चांदणं होऊन<br>
अंगणभर पसरायचं !

- दिवंगत कविवर्य मंगेश पाडगांवकर यांना भावपूर्ण आदरांजली !

## प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने

| | | किंमत रुपये |
|---|---|---|
| ०१. | यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक मराठी भाषणे – भाग १ – संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ०२. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस – विधिमंडळ – भाग २ – संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ०३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट – वाय. बी. चव्हाण – खंड १ ते ४ संपादक : राम प्रधान | प्रत्येकी २५०.०० |
| ०४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन – ना. धों. महानोर | १०.०० |
| ०५. | सह्याद्रीचे वारे – यशवंतराव चव्हाण | २५०.०० |
| ०६. | म. जोतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन – प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ०७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास – संपादक – वि. स. पागे | ३५.०० |
| ०८. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन – संपादन : अण्णासाहेब शिंदे | २००.०० |
| ०९. | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन – शरदराव पवार – भाषणसंग्रह – संपादन : दादासाहेब रुपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास – संपादन : पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा – संपादन : पी. बी. पाटील | १००.०० |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास संशोधक / लेखक – लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल – डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण – चरित्र – लेखक - अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दाचे सामर्थ्य – संपादन : राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी) (यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाउंटीफुल बनियान – डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र – खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा – (काव्यसंग्रह) लेखक : ना. धों. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | 'ई'बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य / फोटो) | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन – डॉ. वसंत काळपांडे | २००.०० |
| २३. | हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०.०० |
| २४. | उपक्रम : वेचक-वेधक – डॉ. वसंत काळपांडे | १००.०० |
| २५. | स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले – श्रीनिवास भालेराव | २०.०० |
| २६. | स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना – सुप्रिया सुळे | २०.०० |

| | | |
|---|---|---|
| २७. | 'संवादिनी' – सुप्रिया सुळे | २०.०० |
| २८. | Appraising Schools – डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |
| २९. | 'शाळांचे प्रगतिपुस्तक' – डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |
| ३०. | Yashwantrao Chavhan : an Autobiography | ३९५.०० |
| ३१. | यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र – कृष्णाकाठ | ३००.०० |
| ३२. | यशवंतराव चव्हाण व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व | ५००.०० |
| ३३. | शिक्षणव्रती – डॉ. कुमुद बन्सल | २००.०० |
| ३४. | शिक्षणकट्टा – बसंती रॉय | २००.०० |
| ३५. | वाटचाल ई-शिक्षणाची – बसंती रॉय | २००.०० |
| ३६. | हवामान बदलास आमचे उत्तर | १००.०० |
| ३७. | विचारसूत्रे – संपादन : पद्मभूषण देशपांडे | २००.०० |

## डीव्हीडी व व्हिडिओ कॅसेट्स

- मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
- प्रवासी पक्षी : सुप्रसिध्द साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
- पु. ल. वृत्तान्त : पु. ल. देशपांडे यांचा जीवनपट
- वरील चारही व्हिडिओ कॅसेट्सची निर्मिती दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांची
- कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शक – श्री. राम गबाले
- येस आय ॲम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शक : विनय नेवाळकर
- 'बशर नवाज : ख्वाब, जिंदगी और मै' माहितीपट, दिग्दर्शक – जयप्रद देसाई
- 'जागर हा जाणिवांचा.....' लघुपट, दिग्दर्शक – चंद्रकांत कुलकर्णी
- 'कृष्णाकांठ' : ऑडीओ सी.डी. (ध्वनिमुद्रिका)

## चित्रपट

- यशवंतराव चव्हाण.. बखर एका वादळाची : दिग्दर्शक – जब्बार पटेल

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई निर्मित संकेतस्थळे

- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे संकेतस्थळ – http://ybchavanpratishthan.org/
- यशवंतराव चव्हाण यांचे समग्र संदर्भ साहित्य – http://ybchavan.in
- धर्मानंद कोसंबी यांचे समग्र साहित्य – http://dharmanandkosambi.com/
- केतकरकृत महाराष्ट्रीय ज्ञानकोश – http://ketkardnyankosh.com/
- महर्षि विठ्ठल रामजी शिंदे समग्र साहित्य – http://virashinde.com/
- इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळाकडे उपलब्ध दुर्मिळ कागदपत्रांचे डिजिटायझेशन – http://vkrajwade.com

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
**नवमहाराष्ट्र युवा अभियान**

# यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार वितरण सोहळा - २०१५

मंगळवार दि.१२ जानेवारी २०१६ • मत्स्योदरी महाविद्यालय, जालना

पुरस्कारार्थी : १. सजल कुलकर्णी, २. प्रार्थना ठोंबरे, ३. स्नेहा भगत, ४. मुमताज शेख, ५. श्रीहरी तापकीर व उपस्थित समुदाय






# दुष्काळ अभिसरण शिबीर

**२५ व २६ मार्च २०१६**

**शुक्रवार–शनिवार**

**मानवलोक, अंबाजोगाई, जि. बीड**

दोन दिवसीय शिबीरात मराठवाड्यात दुष्काळ–मुक्तीसाठी कार्य करीत असणाऱ्या वीसहून अधिक संस्था, व्यक्ती, गट, संघटना यांच्या कार्याचे सादरीकरण करण्यात येईल. या कार्यास आपल्यासारख्या सुजाण कार्यकर्त्यांची गरज आहे. आपण एप्रिल व मे महिन्यात आपल्या सोयीनुसार कमीतकमी आठ दिवस इतका वेळ यापैकी कामांना उपलब्ध करून द्यावा. याकरीता ही सर्व कामे समजून घेण्यासाठी दुष्काळ अभिसरण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

- **प्रवेश** : सर्वांसाठी खुला
- **शिबीर शुल्क** : काहीही नाही
- **निवास व भोजन व्यवस्था** : संयोजकांच्यावतीने
- **प्रवास खर्च** : आपला आपण

- **पूर्व नोंदणी आवश्यक**
- **संपर्क** : सुबोध ९८२३० ६७६४६
  प्रथमेश ९८९०८ ६९३१२
  रमेश ९००४६ ५२२६२
- **ई–मेल** : navmaharashtra@gmail..com

आयोजक

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई**

**नवमहाराष्ट्र युवा अभियान,**

**मानवलोक संस्था, अंबाजोगाई**